# वसंतग

१९९२ - ९३









## श्री. स. ह. केळकर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, देवगड.

निरोप समारंभ



प्राचार्यांसमवेत तृतीय वर्ष कला विद्यार्थी



प्राचार्यांसमवेत तृतीय वर्ष वाणिज्य विद्यार्थी



प्राचार्यांसमवेत तृतीय वर्ष विज्ञान विद्यार्थी

# रसराज

वार्षिक अंक १३ वा
१९९२-९३

शिक्षण विकास मंडळ
देवगड

श्री स. ह. केळकर
कला, वाणिज्य व विज्ञान
महाविद्यालय

● संपादक मंडळ

प्राचार्य श्री. बी. एन. भोसले / अध्यक्ष
प्रा. वसंत कांबळे / कार्यकारी संपादक

● सहाय्यक संपादक

प्रा. रघुनाथ पाटील
प्रा. महेंद्र कामत
प्रा. श्रीमती लता वळसंगकर
प्रा. बाबुराव पोवार

# अंतरंग

मराठी


**सौदा** / मृणाल काळे / १
**धर्मसहिष्णुता आणि राष्ट्रीय एकात्मता** / संजय कोळंबकर / ६
**तरुणांना नवी क्षितिजे : हिन्दुस्थानी सेनादल** / रुपेश जावकर / ९
**विद्यापिठीय शिक्षणात ग्रामीण विकासाचे स्थान** / सुनील परब / संजय माने / १२
**कारण . . . . उपाय** / दत्तात्रय सातवळेकर / १४
**अर्थसंकल्प– एक दृष्टीक्षेप** / किशोरकुमार पोयरेकर / १६
**आजी** / मनोहर चव्हाण / १९
**ज्येष्ठ सेनानी– अरुणा असफअली** / रुपाली गोडसे / २१
**भूत एक भ्रम** / समीर जाधव / २३
**भारतीय घटनेतील धर्मनिरपेक्षता आणि अयोध्या प्रश्न** / आनंद कदम / २४
**रक्ताचं नातं !** / स्वाती कर्णिक / २७
**प्रदुषण** / मंजिरी लळीत / ३०
**व्यथा व्यक्त होताना** / विभावरी बांदेकर / ३५
**भारतातील शेतकरी आंदोलनाची वास्तवता** / विश्वामित्र खडपकर / ३७


कविता


**बुरखा** / आनंद कदम / ४०, **संघर्ष** / महेश घारे / ४०
**नव्या शतकात** / सतिश जोशी / ४१, **मरणावरती बंध कुणाचे** / आशा धुरी/४२
**आठवणींचा प्रवास** / विलास कदम / ४२, **माघारी फिरा** / समीर जाधव / ४३
**जागते रहो** / वर्षा मुणगेकर / ४३, **शिंग फुंकलेस तू . . . .** / आनंद कदम / ४४
**वळणावर. . .,** / विभावरी बांदेकर/४४, **अरे माझ्या बा !** / पुष्पलता इळकर/४५
**खंदक** / चेतना साटम / ४५, **मी** / नामदेव पेडणेकर / ४५
**मी कधी** / प्रकाश परब / ४६, **अबोली** / मृणाल काळे / ४६
**अस्तित्व** / विलास कदम / ४६, **अजूनही येती** / समीर जाधव / ४७
**एक प्रयत्न** / दत्तात्रय सातवळेकर / ४७, **अंधार** / मनोहर चव्हाण / ४८
**पीक** / विजयकुमार शिंदे / ४८, **माझ्या मनात आहे** / सहदेव कदम / ४९
**क्षितीजाशी नाते** / दिलीप मेस्त्री/४९, **गुरुजनांचा उपदेश** / विद्याधर तारी /५०
**वाट** / स्मिता नलावडे / ५०

## English

**Petroleum As Important Power Resource** / Nitin Mahadik / **1**
**Olympic–Gains and Pains** / Uday Dalvi / **4**
**Sleep** / Minal Ghate / **5**
**The Time Machine** / Vaijanath Kadam / **8**
**Yeats's The Tower – A Master Piece of Literature** / Kavita Kadam / **10**

## Poems

**Who is Happy ?** / Vaijanath Kadam / **13**
**A Challenge** / Vaishali Mane / **13**
**Fact** / Pradip Kadam / **14**
**The Moon** / Vaishali Joil / **14**
**Life** / Pradip Kadam / **14**

## ...............a milestone

The year under review–Academic year 1992–93 is a characteristic year in the onward march of Shri. S. H. Kelkar College of Arts, Commerce and Science, the year in which the college has emerged as a full-fledged college-second in the district-having all the three faculties viz- Arts, Commerce and Science. This year, we are sending the first batch of T. Y. B. Sc. students fo, the University Examination.

Shikshan Vikas Mandal started Arts and Commerce College in the year 1974–75 with a total strength of 85 students with the commitment of offering higher education, thus, catering to the needs of the region – Devgad taluka and nereby localities. Since then, in spite of many constraints, it continued its onward march progressively. It took nearly two decades to emerge the college as a full-fledged one. It was in the year 1988–89, the Science faculty began, the then Hon. Principal R. A. Kulkarni chose the right accasion – Yes, it was indeed the right occasion because had the Sanstha not gone for science at that time, we would never have started it. A delay by a year, would have plunged the Sanstha into tremendous financial crisis as it would have required 8 years to receive the 100% grants, instead of being eligible for it in the fourth year only. From the year 1993–94, thanks to the Government, the Science faculty is going to be the aided one. It was indeed an adventure to go for a Science wing on 'No-grant basis. This can well be understood from the fact that the Sanstha by the end of 31 st March, 1993, had to spend the huge amount nearly Rs. 50 Lakhs alone on science wing. Wasn't it an adventure ?

It is really a matter of great pride to the Sanstha for being kept its promise to make available the avenues of higher education at such an odd place–Devgad.

At present, the college has a picturesque campus – Neerabai Jagannath Parkar Vidyanagari – making the name meaningful in every respect.

So much so has been achieved, still not contained and should not be. Post graduate centre, Technical education...... ..... ....., So much so has still to be achieved. However, ofcourse a milestone is reached.

**Prin. B. N. Bhosale**

# संपादकीय

मित्र हो !
'रसराज' चा वार्षिक अंक आपल्या हाती देताना आम्हाला अत्यंत आनंद होत आहे. रसराज मधून व्यक्त झालेले विचार आमच्या विद्यार्थ्यांच्या प्रगल्भ व बहुविध व्यक्तिमत्वाची साक्ष देतील. आमच्या विद्यार्थ्यांचे साहित्य आपणास जरुर आवडेल व यातील कविता तर वास्तवाचे भान देतील. उच्च प्रतीच्या वाङ्मयीन निकषांना हे साहित्य कदाचित उतरणार नाही. परंतु यातून सामाजिक जाणिवांचा त्याने घेतलेला वेध निश्चितच कौतुकास्पद ठरेल.

जीवनात यशाची वाटचाल करण्यासाठी शिक्षण अत्यंत महत्त्वाचे आहे. तर्कशुद्ध विचार करुन आपणाला पुढचे पाऊल उचलायचे आहे. जीवनात संघर्ष अटळ आहे. तो प्रत्येकाला करावाच लागतो. संघर्षमय कसोटीच्या काळात योग्य बाजू कोणती, अयोग्य कोणती याचा वस्तुनिष्ठपणे निवाडा करायला शिका. आपण योग्य व न्यायाच्या बाजूने असाल तर विजय आपलाच आहे हे निश्चित..अर्थात सुखच प्राप्त होईल किंवा स्वतःला फार मोठे यश मिळेल या खोट्या आशेवर आपण विसंबून राहिलो तर कधीकधी आपण आपल्याच न कळत चुका करुन बसतो आणि अपयशानंतर त्या चुकांचे पुनः स्मरण होवून आपण दुःखी होतो. स्वतःचे अपयश झाकण्यासाठी आपण हरतऱ्हेने प्रयत्न करतो पण ते पिशाच्चासारखे आपला अखेरपर्यंत पाठलागच करत राहते. मित्रानो, अपयशाने खचून न जाता आत्मपरीक्षण करा आपण कुठे चुकलो हे प्रामाणिकपणे अंतर्मुख होऊन शोध घेण्याचा प्रयत्न करा. त्यातूनच मार्ग सापडेल.

आमच्या विद्यार्थ्यांनी नेहमीप्रमाणेच आमच्या आवाहनाला प्रतिसाद देऊन लेखन सहकार्य केले त्याबद्दल त्यांना मनःपूर्वक धन्यवाद.

प्राचार्यांचे मार्गदर्शन, सहकारी प्राध्यापक आणि विद्यार्थी प्रतिनिधी या सर्वांचे रसराजला वेळोवेळी सहकार्य लाभले आहे.

या अंकाला अमेय प्रिंटींग प्रेस, जामसंडे यांचे रेखीव मुद्रण लाभले आहे. 'अमेय'चे मालक श्री. पद्माकर गोगटे यांनी आपल्या कलात्मक दृष्टीने आपल्या अनुभवी व कुशल कामगार वर्गाकडून रसराजला मूर्त स्वरुप दिले आहे. कल्पक आणि सूचक मुखपृष्ठ व फोटो यासाठी मयूर इंडस्ट्रिज (ऑफसेट प्रिंटर्स), कोल्हापूर यांचे सहकार्य लाभले आहे. महाविद्यालयातील कर्मचारी वर्गानेदेखील वेळोवेळी सहाय्य करुन अंक यशस्वीरित्या प्रकाशित करण्यात सहकार्य केले आहे. याबरोबरच प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष सहकार्य करणाऱ्यांचे मनःपूर्वक आभार.

**— संपादक**

## श्री सदाशिव हरी केळकर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, देवगड

### राष्ट्रीय सेवा योजना विद्यार्थी समिती

१) श्री. मानसिंग पाटील
२) " संतोष बिर्जे
३) " अनंत रावराणे
४) " राजेश कांदळगांवकर
५) " कय्यम होलसेकर
६) कु. गीता मेस्त्री

### स्नेहसंमेलन समिती

१) प्राचार्य बी. एन्. भोसले – अध्यक्ष
२) प्रा. एस्. एस्. पाटील – कार्याध्यक्ष (वरिष्ठ विभाग)
३) प्रा. पी. बी सकटे – कार्याध्यक्ष (कनिष्ठ विभाग)
४) श्री. अमोल हिर्लेकर – जी. एस्. (वरिष्ठ विभाग)
५) श्री. मानसिंग पाटील – यू. आर. (वरिष्ठ विभाग)
६) कु. माधुरी गोरे – एल्. आर. (वरिष्ठ विभाग)
७) श्री. तुळशीदास खवळे – जी. एस. (कनिष्ठ विभाग)
८) कु. नूतन कुवडे – एल्. आर. (कनिष्ठ विभाग)

## 'रसराज' विद्यार्थी संपादन सहाय्य

१) विश्वामित्र खडपकर
२) माधुरी गोरे
३) महेश घारे
४) सुनिल खडपे
५) किशोर चव्हाण
६) रुपाली गोडसे
७) विरेंद्र जाधव
८) विभावरी बांदेकर

मुखपृष्ठ रचना
प्रा. वसंत कांबळे
प्रा. महेंद्र कामत
श्री सदाशिव हरी केळकर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, देवगड

छायाचित्रे
मयूर इंडस्ट्रिज (ऑफसेट प्रिंटर्स)
कोल्हापूर

# आमचे स्फूर्तीस्थान



जिवेत शरद : शतम्
८५ व्या वर्षात पदार्पण
माननीय श्री. शां. कृ. तथा बापूसाहेब पंत वालावलकर, अध्यक्ष, शिक्षण विकास मंडळ, देवगड

मा. सभापती



श्री. राजाभाऊ मिराशी
नियामक समिती, शिक्षण विकास मंडळ, देवगड

मा. कार्यवाह



श्री. सत्यवान जामसंडेकर
नियामक समिती, शिक्षण विकास मंडळ, देवगड

## आमचे प्राचार्य



श्री. बी. एन. भोगल

## रसराज संपादक मंडळ



डावीकडून - प्रा. महेंद्र कामत, प्रा. रघुनाथ पाटील, प्रा. वसंत कांबळे,
प्राचार्य भारत भोसले, प्रा. लता वळसंगकर, प्रा. बाबूराव पोवार.

# अभिमान

## तृत्तीय वर्ष प्रथम श्रेणी प्राप्त


प्रशांत मुंबरकर


मिरा कारभारी


चंद्रशेखर घाडीगांवकर


संजीवनी धुपकर


प्रकाश बाणे


अनुजा बापट


शरद ठुकरुल


साधना दांडेकर

## बारावी प्रथम श्रेणी प्राप्त


महेश घाडीगांवकर


विद्यागौरी ओगले


विनायक ताम्हणकर


संध्या पांचाळ


अंकुश हरम


सुषमा म्हापसेकर


प्रमोद मणचेकर


सुगंधा जामसंडेकर

# अभिमान

## बारावी प्रथम श्रेणी उत्तीर्ण



पुष्पलता इळकर



विनोद सारंग



प्रविण मोंडे



चंद्रशेखर कल्याणकर



शैलेश राऊळ



अंजली मोंडकर



मुकेश अंबेरकर



जयश्री पटेल



विजय नलवडे



निलकंठ मराठे



सुधाकर परांजपे



राजेश सुर्वे

## आदर्श विद्यार्थी



ऋतुजा भावे



दिनेश शिणगारे



कु. विमल प्रभुमिराशी

# नेतृत्व..... वरिष्ठ विभाग



**अमोल हिर्लेकर**
जनरल सेक्रेटरी,
तृतीय वर्ष विज्ञान



**कु. माधुरी गोरे**
विद्यार्थीनी प्रतिनिधी



**मानसिंग पाटील**
विद्यापीठ प्रतिनिधी

## वर्गप्रतिनिधी मंडळ



**अमित जामसंडेकर**
प्रथम वर्ष कला



**विश्वामित्र खडपकर**
द्वितीय वर्ष कला



**पंडित बांदकर**
तृतीय वर्ष कला



**महेश लिमये**
प्रथम वर्ष वाणिज्य



**राजीव भावे**
द्वितीय वर्ष वाणिज्य



**आनंद पाटणकर**
प्रथम वर्ष विज्ञान



**विपुल शहा**
द्वितीय वर्ष विज्ञान

## जनरल चॅम्पियनशिप (वरिष्ठ विभाग)



**समीर बिर्जे**



**सुजाता पाटणकर**

विभागून



**गीता मेस्त्री**

# नेतृत्व..... कनिष्ठ विभाग



तुळशीदास खवळे
जनरल सेक्रेटरी
१२ वी कला (अ)



नूतन कुबडे
विद्यार्थीनी प्रतिनिधी

## वर्गप्रतिनिधी मंडळ



विरेन्द्र जाधव
अकरावी कला (अ)



सुनील कदम
अकरावी कला (ब)



काशिनाथ करंगुटकर
बारावी कला (ब)



संदिप राणे
अकरावी वाणिज्य



सुनील तेली
बारावी वाणिज्य



दिपक शिणगारे
अकरावी विज्ञान



वैभव साळसकर
बारावी विज्ञान

## जनरल चॅम्पियनशिप (कनिष्ठ विभाग)



प्रसाद कांदळगांवकर

विभागून



प्रशांत वारीक

# राष्ट्रीय सेवा योजना


मानसिंग पाटील


संतोष विर्जे


गीता मेस्त्री


अनंत रावराणे


राजेश कांदळगांवकर


कय्यम होलसेलकर

# रसराज संपादन सहाय्य


विश्वामित्र खडपकर


माधुरी गोरे


महेश घारे


सुनिल खडपे


किशोर चव्हाण


रुपाली गोडसे


विरेन्द्र जाधव


विभावरी बांदेकर

# विविध उपक्रम



नियोजन मंडळ, व्याखान : कर्म संस्कृती, व्याख्याते : श्री. प्रकाश महाडीक



राष्ट्रीय एकता दिन, संस्थेचे कार्यवाह : श्री. सत्यवान जामसंडेकर



नियोजन मंडळ, व्याखान : भारतीय अर्थव्यवस्थेतील चालू घडामोडी, व्याख्याते : डॉ. पी. बी. कुलकर्णी

# विविध उपक्रम



☛ ऑगष्ट क्रांती, सुवर्ण महोत्सव.
डॉ. नरेन्द्र दाभोळकर
यांचे व्याख्यान



रसराज भित्तीपत्रकांचे ☛
उद्घाटन
डॉ. नरेन्द्र दाभोळकर



☛ कनिष्ठ महाविद्यालय
आंबोली शैक्षणिक सहल



तृत्तीय वर्ष बी. ए. ☛
पन्हाळा सहल

# विविध उपक्रम



तृत्तीय वर्ष कला
भूगोल विभाग सहल
कोल्हापूर वारणानगर



कनिष्ठ महाविद्यालय
आंबोली शैक्षणिक सहल



मराठी विभाग
कोल्हापूर सहल



प्रथम वर्ष वाणिज्य
कोल्हापूर सहल

# स्नेहसंमेलन




प्रमुख पाहुणे ज्येष्ठ साहित्यीक श्री. श्रीपाद काळे यांचे स्वागत प्राचार्य भोसले करताना



प्रमुख पाहुणे श्री. अ. द. भिडे बोलत असताना



पारितोषिक वितरण ज्येष्ठ साहित्यीक श्री. श्रीपाद काळे यांचे हस्ते





रांगोळी प्रदर्शन व स्पर्धा उद्‌घाटन रांगोळी प्रथम पारितोषिक

# स्नेहसंमेलन रोज डे



ज्येष्ठ प्राध्यापक श्री. पी. एस. गोठोस्कर यांना प्राचार्य गुलाबपुष्प देतांना



जनरल सेक्रेटरी श्री. अमोल हिर्लेकर प्राचार्यांच्याकडून गुलाबपुष्प स्विकारतांना



स्नेहसंमेलन कार्याध्यक्ष प्रा. एस. एस. पाटील (वरिष्ठ विभाग) जनरल सेक्रेटरी (कनिष्ठ विभाग) श्री. तुळशीदास खवळे यांस गुलाबपुष्प देतांना



मा. प्राचार्य विद्यार्थिनी प्रतिनिधी (वरिष्ठ विभाग) कु. माधुरी गोरे हीस गुलाबपुष्प देतांना

# स्नेहसंमेलन
# रोज डे



स्नेहसंमेलन कार्याध्यक्ष (कनिष्ठ विभाग) प्रा. पी. बी. सकटे विद्यापीठ प्रतिनिधीस गुलाबपुष्प देतांना

मा. प्राचार्य विद्यार्थिनी प्रतिनिधीस (कनिष्ठ विभाग) पर्स भेट देतांना





एकांकिका 'ऊन-पाऊस' उत्कृष्ट अभिनेता राजेश कांदळगांवकर पारितोषिक स्विकारताना

# स्नेहसंमेलन




एकांकिका -
'सौभद्र एके
सौभद्र'
उत्कृष्ट अभिनेता
अनंत रावराणे



उत्कृष्ट समुह
नृत्य
डिस्को
ऑपरेशन



उत्कृष्ट वैयक्तिक
नृत्य
ब्रेक डान्स
प्रवीण मेस्त्री

# स्नेहसंमेलन



फनी गेम्स

उत्कृष्ट गायक



प्रसाद रानडे

उत्कृष्ट गायिका



संध्या पांचाळ

उत्कृष्ट फॅन्सी ड्रेस



स्मिता डोंगरे

# सहवेदना

जेष्ठ स्वातंत्र्य सेनानी अच्युतराव पटवर्धन, मराठी साहित्यातील श्रेष्ठ व्यक्तिमत्व रणजीत देसाई, ऑस्कर विजेते सत्यजीत रे, ख्यातनाम हिन्दी चित्रपट अभिनेते अमजद खान, अभिनेत्री दिव्या भारती, ऑड्री हेपबर्न, विनोदी मराठी अभिनेते मधू आपटे, आमच्या महाविद्यालयाचा विद्यार्थी योगेश गोरे, शिक्षण विकास देवगड पुर्वीच्या मुंबई समितीचे खजिनदार श्री. शंकरराव माणगांवकर, तसेच देशातील दंगली व हिंसाचारात दिवंगत झालेल्या सर्वसामान्य निष्पाप व्यक्ती व काळाच्या क्रूर पडद्याआड गेलेल्या सर्व ज्ञात अज्ञात व्यक्तींना आमची भावपूर्ण श्रद्धांजली.

# ॥ मराठी विभाग ॥

प्रभू तुम्ही महेशाच्या मूर्ती । आणि मी दुबळा अचितुसें भक्ती ।
म्हणौनि बोल जऱ्ही गंगावती । तऱ्ही स्वीकाराल कीं ॥ १४॥

ज्ञानेश्वरी अध्याय ९ वा

# सौदा

**मृणाल काळे**
द्वितीय वर्ष कला

'डॉक्टर ..... अहो डॉक्टर, माझं ऐका. कसा आहे माझा भास्कर? बरा होईल ना? मला एकवार पाहूदे त्याला. डॉक्टर तुमच्या पाया पडतो. जीव रहात नाही त्याच्या शिवाय. फक्त एकदा पाहू द्या त्याला .....'

त्या प्रचंड इस्पितळात अण्णा डॉक्टरची विनवणी करीत होते. डॉक्टर गरजले, 'मिस्टर देशपांडे तुम्ही त्याला भेटू शकणार नाही. कालच त्याचं ऑपरेशन झालंय. तरी तो अजूनही अत्यवस्थ असल्यानं त्याला तुम्ही भेटणं योग्य नाही.'

'अरे... झालं ऑपरेशनसुद्धा मला न सांगता सवरता, अशा वेळी धीर देणारं असं कोणी...... असूनसुद्धा जवळ नाही. पण दया करा. मला पाहिल्यावर त्याला अधिक बळ येईल. फार बरं वाटेल.'

जरा सुद्धा लक्ष न देता खाड्–खाड् बूट वाजवीत डॉक्टर निघून गेले. हताश अण्णा भरल्या डोळ्यांनी नुसते पाहात राहिले. त्यांच्या पायातील त्राण संपत आले. डोळे डबडबले. गळा भरुन आला. वाटलं हंबरडा फोडावा...

'कुठची कोण मुंबई. कोणा दूरच्या नातलगाकडे एकटेच भास्करला घेऊन आलेले अण्णा. ना कोण पाठी ना पोटी. कोण करणार त्यांचं सांत्वन या धावपळीच्या जगात! बिच्चारे एकटे पडले होते. भास्करला नुसतं पहाण्यासाठी डोळे आसुसले होते. मनालाच विचारीत होते, 'का ...... का आणलं त्याला इथं. मुंबई म्हणजे यमपुरी, तिथं नेऊ नका म्हणून वहिनी परोपरीने सांगत होती. आपण सुद्धा काळजावर दगड ठेवून आलो. ही नादान माणसं काही भलंबुरं ..नाही...नाही .' असं मनात येताच कातर मनाने हॉस्पिटलमधून ते माघारी वळले.

आता जाणार तरी कुठे! इथेच बसणार होते. बेवारश्यासारखे. ना मायेचा...धीराचा हात. तोल जाईल असं वाटलं...पण पटकन एका बाकावर बसले.

गरीब बिच्चारे दामूअण्णा. पोटच्या पोराला कोणी करणार नाही एवढ्या काळजीनं ते भास्करला बाळगीत होते. त्यांना स्वतःला मूलबाळ नव्हतं. त्यांना नेहमी वाटायचं ..घराच्या कानाकोपऱ्यात कोणीतरी वाकड्यातिकड्या रेघोट्या ओढाव्यात. ओली जमिन पूसता–पूसता पुरेवाट व्हावी. त्या अमृताने भिजलेल्या कपड्यांची एक गोड शिरशिरी सर्वांगावर उठावी. बोबड्या बोलांचा भडीमार व्हावा. पण छे! दैवाच्या जणू मनातच नव्हतं. लग्नानंतर पाच–सहा वर्षं नवस-सायासात गेली पण त्यांचं नाव लावणारं कोणी आलं नाही.

वासू हा त्यांचा धाकटा भाऊ. त्यांनी त्याचं लग्न मात्र थाटामाटात लावून दिलं. त्यांना फार वाटायचं वासूनं घरी रहावं. मुलाबाळांनी घर भरुन जावं. पण त्यानं वाटणी करुन घेतली इस्टेटीची. आता सगळं संपलच. त्या दिवशीचा प्रसंग अण्णांना नेहमी आठवायचा. तिन्हीसांज झाली होती. दामूअण्णा उपरण्यानं कपाळावरचा घाम पुसत कराकर चपला वाजवत अंगणात आले. ते कुठून तरी बाहेरुन येत होते. घरात नक्की कसली तरी कुरबुर चालली होती. त्यांच्या वहाणांचा आवाज आला तसं सारं चिडीचूप झालं. वहिनी, त्यांची बायको डोक्यावर पदर सावरीत पटकन आत गेल्या. ते घरात आले. तरी सर्व गप्प. कुणी कुणाशी बोलेना. मग अण्णांनीच कोंडी फोडली.

'अगं कोणी मेल्यावानी सगळी गपगार का? काय झालं तरी काय!' सगळंच विपिरीत.

बायको पण त्यांना जन्माची बहिरी मिळाली होती. घरात एकटेपणात बायकोशी चार शब्द बोलावे तर ते सुद्धा सुख देवानं हिरावून नेलेलं. सारखी धूसफूसत रहावयाची तिची सवय. कधी कुणाशी जुळवून घ्यायची नाही. त्यांना वाटलं घरात काही भांडण-बिडण ..... पण वासू पुढे झाला.

'अण्णा मला काही बोलायचंय.'

'हं, सांग. अगदी मनमोकळेपणाने बोल.'

'अण्णा उद्या रत्नागिरीला जाईन म्हणतो. छोटी नोकरी मिळाली आहे तीही करीन म्हणतो.' अण्णांच्या अंगावर वीज पडल्यासारखं झालं. त्यांना फार बोलायचं होतं; सांगायचं होतं. पण त्याचा काही उपयोग नव्हता. एवढं मोठं घर, शेतीवाडी, बाग हे कशासाठी सगळं ? भकास उजाड दिसू लागले त्यांना आणि एकाएकी त्यांचे डोळे आठवणीने डबडबून आले. बसल्या जागीच त्यांनी डोळे पुसले. समोरुन १०–१५ च्या घोळक्याने सिस्टर पळत होत्या. होय. त्यानंतरची १५-२० वर्ष अशीच पांढरा व्यवहार घेऊन पळत गेली. भकास, एकाकी, ना पत्र, ना खुशाली. भावासाठी अण्णांचा जीव तीळतीळ तुटायचा. ना कुठचा पत्ता माहीत ना ठिकाण. पण एके दिवशी अचानक एक पत्र आलं आणि अण्णा तसेच रत्नागिरीला धावले. भाऊ दूर असला तरी त्यांचा जीव कि प्राण होता. उजवा हात गमावल्यासारखे वाटले त्यांना. पत्ता शोधत ते वणवण हिंडले. बाहेरच्या जगाचा ना अनुभव ना माहिती. दोन दिवस उपाशी तापाशी फिरल्यावर एका पत्रातील उल्लेखिलेल्या आळीत फिरताना त्यांचे डोळे आत शोधत होते. ते अक्षरशः रडवेले झाले. इतक्यात पाठून एक हाक आली 'भाऊजीऽऽ तुम्ही आलात ...' आणि हुंदक्यावर हुंदके .....

एवढ्या वर्षात वासूला दोन मुलं झाली होती. १५–१६ चा एक भास्कर होता आणि २ वर्षांची कमा. सारीजणं घरी रहायला आली. घरात एकरुप झाली. अण्णांनी भास्करवर जीवापाड प्रेम केलं. एकमेकांशिवाय दोघांनाही कधी करमायचं नाही. एकाशिवाय दुसऱ्याचा घास उतरायचा नाही. भास्कर मॅट्रिक होता पण अण्णांबरोबर साऱ्या कामांना आधार होता त्याचा. भास्करच्या पुढच्या शिक्षणाला अण्णानीही जबरदस्ती केली नाही. त्यांना वाटे शिक्षणाने तो दूर जाईल. त्यांना तो जवळ हवा होता कायमचा. 'इथे काय कमी आहे, सारं त्याचंच आहे.' असं. ते नेहमी म्हणायचे.

पण दैवाचे पारडे फिरले. आणि एकदा दुपारी अचानक भास्करच्या छातीत कळा यायला लागल्या. असह्य कळा ! वेदनांनी तो तळमळायला लागला. गडबडा लोळला. अण्णा डोळ्यात प्राण आणून सारं पाहात होते. दोन दिवस पोटात अन्नाचा कण न घेता ते त्याच्याजवळ बसून होते. सगळीकडे शोकाकूल वातावरण होते. डॉक्टरांच्या उपचारांनी थोडा गुण आला. आणि दोन–तीन दिवसात उतार पडला. पण आठ–पंधरा दिवसांनी हे दुखणं कायमच्यात जमा व्हायला लागलं. महिन्यातून दोनदा–तीनदा जिवाच्या आकांतानं त्याला वेदना सहन कराव्या लागायच्या. पण कोण जाणे., चांगले डॉक्टर अण्णांनी आणले आणि पुन्हा एक वर्षाच्या ट्रीटमेंटने त्याला उतार पडला. एक दोन वर्ष बरी गेली. तशी अण्णांनी पावजेवण घातलं. त्यांचा उत्साह पाहून भास्कर अण्णांना म्हणाला,

'अण्णा कुठून येतं एवढं बळ तुमच्या अंगात ! तुमच्या या हसऱ्या चेहऱ्याकडे पहात रहावसं वाटतं बघा.'

अण्णा व भास्कर तसे चार चौघात उठून दिसणारे होते. दोघेही गव्हाळी, सडपातळ, उंचपुरे, नाक-डोळ्यांनी नीटस होते. अण्णांच्या डोक्यावरचं गंध शोभून दिसायचे. खांद्यावर उपरणं, धोतर यात ते खुलून दिसायचे. भास्कर तर तगडा, कामसू होता. आत्ताही त्या आठवणीनं अण्णांना मनातल्या मनात हसू येत होतं. शेजारच्या अक्काची मुलगी यमुना त्यांच्याकडे येऊन जाऊन असायची. सुंदर, गौरवर्णाची, कामसू व तरतरीत यमुना भास्करच्या दुखण्याच्यावेळी मोठ्या हिंमतीने उभी राहून साऱ्यांची काळजी वाहात होती. आपण तिला भास्करबद्दल विचारलं तेव्हा पोरही सुंदर लाजून झटकन घरात पळाली. त्यांचा साखरपुडा केला. अगदी कृतार्थ झाल्यासारखं वाटत

होतं पण ......पुन्हा अण्णांच्या डोळ्यात पाणी तरारलं. नाही......पहावलं नाही हे सुख, का कोणी करणी केली ?......

पुन्हा काही दिवसांनी, एकाएकी पुन्हा त्याच्या छातीत कळा यायला लागल्या, आपण हवालदिल झालो, पोरीला अन्नपाणी सुचेना. लाडक्याचे हाल अण्णानाही पहावत नसत. भास्कर ओरडायचा, ' आण्णाऽऽऽ आता काही मी जगत नाही......' अण्णांच्या अंगावर सरदिशी काटा उभा राहायचा. अशावेळी यमुनाचे वडील...... सारे त्यांना भाऊ म्हणायचे, ते त्यांचे सांत्वन करायचे, धीर द्यायचे, बाकी सारे पडल्या प्रसंगाला कोण येणार! यमुना धीरानं, जबाबदारीनं सारं या कोवळ्या वयातही हाताळायची.

भाऊनी एक दिवस अण्णांना घरी बोलावून सल्ला दिला. 'भास्कर आपल्याला हवाय. म्हणून......तुला पटायचं नाही पण त्याचं ऑपरेशन करायला हवं. तूं त्याला मुंबईला घेऊन जा.' 'पण......कसं पटेल मला असं. आमची आक्का ऑपरेशनच्या नावाखालीच गेली ना रे! नाही .....मारली तिला. बिचारी तडफडून मेली रे! तुला स्वतःला अनुभव आहे बाबा आणि पुन्हा स्वतःहून फोफाट्यात जायचं.'

' दुसरा इलाज नाही त्या शिवाय. '

'पण एवढे पैसे कोठून आणू बाबा; आणि ती अगडबंब मुंबई, मी एकटा त्या कोवळ्या पोराला नेणार, अरे तिथे जित्या माणसाचे व्यापार होतात, मग मला कोणी फसवलं तर माझा पोरगा बळी जाईल रे; माझा हिरा गमवेन मी......'

' सारं काही ठिक होईल. हा विचारच तू काढून टाक. पैशाची काळजी करु नकोस. मांगराखालचा सारा मळा घ्यायला मी तयार आहे तुला रोख ६०,००० देईन '

'काय?' भाऊंच्या घशाला कोरड पडली. पाणी डोळ्यात थरेना ...... 'अरे त्या मळ्याला पोटच्या पोराप्रमाणं वाढवला, कसला रे ऽ तो विकू ! डागण्या दिल्यासारखं वाटतय मला दोनातलं काय निवडायचं पण; नाही...... नाही..... काय लोभी रे मी, अरे भास्करपेक्षा मला मळा जास्त नाही बरं ! एवढे पैसे तू रोख देणार आहेस. नाहीतर दरवर्षी आंब्याच्या पेट्यांसाठी जमणारी भूतं काही मदतीला येणार नाहीत. मुंबईत त्यांच्या दारात पाऊल पडलं तर दार लावून घेतील.'

'मग ! ठरलं ना !'

भरल्या कंठानं अण्णा हो म्हणाले. सारा व्यवहार गुपचूप पार पडला. जमीन भाऊंच्या नावे केली. अण्णा मळ्याकडे धावले. त्यांनी मातीला कुरवाळलं. लहान मुलाप्रमाणं ते स्फुंदून स्फुंदून रडले. आवेगानं मातीची चुंबनं घेतली. गुडघा टेकून मातीला पुन्हा पुन्हा नमस्कार केला. मग जड पावलांनी ते घरी परतले.

भास्करला सुद्धा भरुन आलं, 'अण्णा माझ्यासाठी तुम्ही तुमचा लाडका मळा विकला.'

'अरे तू मिळालास की सारं मिळालं मला. तुझ्यापेक्षा मला मळा अधिक नाही रे. सध्या बरं आहे तो पर्यंत मुंबईला जाऊ. शिंदे डॉक्टरनी ऑपरेशन शिवाय उपाय नाही म्हणून सांगितलं आहे.'

'तुमची इच्छा आहे ना अण्णा; मग जाऊ तर.'

उद्या मुंबईला जायचं म्हणून भास्कर सगळ्यांच्या घरोघरी फिरत होता. थोरा-मोठ्यांचे आशीर्वाद घेत होता. प्रत्येकजण त्याला जपून रहायला सांगत होते. सर्वांनाच तो लवकर बरा होवून यावा असं वाटत होतं. भास्करने भाऊंना नमस्कार केला. भरल्या डोळ्यांनी भास्करला त्यांनी आशीर्वाद दिला.

'भास्कर आयुष्यमान भव. अरे मला तू माझ्या मुलासारखाच आहेस. तू बरा होवून ये. तुझ्या वाटेकडे डोळे लावून यमुना बसून राहील एवढं लक्षात ठेव. परत आलास की मी मळा पुन्हा तुम्हाला देईन बरं. अण्णानी असेच का पैसे घेतले असते ? म्हणून ही तोड काढली.'

यमुनाकडे भास्करनं डोकावून पाहिलं. दाराआडून पाहणारी यमुना डोळ्यांनी सगळं सगळं मनातलं सांगत होती.

त्याच्या आईला सारखे अपशकून दिसत होते. उद्या मुलगा जाणार म्हणून तीही काळजीत होती. कुठे पाल चुकचुकत होती. कुठे तिला घुबड ओरडलेले ऐकायला येत होतं. तो आईला हसून म्हणाला, 'ऊगीच काळजी करतेस ग. अगं मी बरा होऊन येईन. मला अजून खूप काही कराचय, मला हे घर बांधायचय, घरासमोर मोठी बाग फुलवायची आहे. आणि आता तर सूनबाई पण येणार आहे.' " दादा मला काय आणणार रे तू ! " कमा लडीवाळपणे म्हणाली. " तुला छानसा गुलाबी जरीचा फ्रॉक, छानशी बाहुली आणिन बरं. आईला, काकूला साडी, बरंच काही घेऊन येईन हं माझ्या छकुल्या. "

जाताना कमा पुन्हा–पुन्हा फ्रॉकची आठवण करुन देत होती. यमुना, भाऊ सारीजणं गाडीवर निरोप द्यायला आली. अण्णांना यमुनाचे चकाकते हिरवे चुडे दिसले तसं त्यांना गलबलून आलं. ते म्हणाले ' पोरी संभाळून घे बरं.'

यमुना भास्करला म्हणाली, 'लवकर याल ना.'

' तुझ्यासाठी तरी नक्की येईन बरं. ' असं म्हणताच ती गोड लाजली.

बसल्या–बसल्या अण्णांना गावाकडच्या साऱ्या आठवणी चलत्‌चित्राप्रमाणे डोळ्यापुढून सरकत होत्या. मनावर खोल आघात करीत होत्या. सारीजणं आपली वाट पहात असतील अगदी आतुरतेने. त्या दिवशीची भास्करची भेट त्यांना आठवली......

भास्कर छातीतल्या कळा दाबत पडला होता. अण्णांनी त्याच्या हातावर हात ठेवला, भास्करला गदगदून आलं, तो म्हणाला,

' अण्णा, किती बाळलातं हो तुम्ही. फार काळजी करता ..... माझी. परवा माझं ऑपरेशन होणार आहे. मग आपण लवकर घरी जाऊ. माझं काय व्हायचं बरं वाईट तिथेच होऊ दे. '

' असं काय बोलतोस राजा. तू बरा तर नक्की होशील. मग जाऊ आपण. '

' नाही आण्णा, हे नराधम तसे नाही जाऊ द्यायचे. मी फार अशक्त झालोय आधीच. परवा ऑपरेशन... ती भीती नाही वाटत. पण... मला कसली तरी शंका येतेय. काही जण माझ्याकडे एका वेगळ्या तुटक नजरेनं बघतात. माझ्या विषयी कसला तरी कट शिजतोय असं वाटतं. ती सारी आपापसात कुजबुजतात. मग हसतात...... अगदी बोचरं हसतात आणि म्हणतात,

' व्हेरी गुड, फॅन्टास्टीक आयडीया, मजा येईल. बरीच कमाई होईल. ' अण्णा...अण्णा मला फार भीती वाटते त्यांची. म्हणून इथून लवकर निघूया. आई, यमुना फार वाट पहात असतील नाही?'

कातर स्वरात अण्णा म्हणाले, 'हो तर! फार काळजीत असतील.'

त्याला आपण धीर दिला. तो सुखावलाही पण आता तर त्याची माझी भेटही नाही. आता तर डॉक्टर म्हणाले, त्याचं ऑपरेशन झालं. मग कसा असेल तो. आपलं नाव घेत सारखा तळमळत असेल. पण ... लक्ष कोण देतो. कसं झालं असेल ऑपरेशन. काही...काही कळत नाही. काय आहे हा न्याय. ऑपरेशनच्या आधी माझी भेटसुध्दा होऊ दिली नाही ते नाही पण माझी परवानगी नाही. खाटीका हाती जनावर द्यावं तसं बाळाला मी ... मी अडकवलयं. उगीच एवढी घाई केली आपण. या आधी फक्त छातीचाच त्रास होता. आता काय नवीन तर नाही उद्‌भवणार! देवा ... परमेश्वरा मला तारुन ने. मी एकटा पडलो, मी दुबळा, असहाय्य, भास्करशिवाय एक घास मला उतरायचा नाही. पण मला येऊ न देण्यात त्यांचा काही हेतू तर नाही ना! मला एकट्याला पाहून पैसे घेऊन फसवणार तर नाही ना! माझा भास्कर आहे म्हणून या जगण्याला अर्थ आला...नाहीतर मी पोरका होईन पोरका. या साऱ्या घराचा तो आधारस्तंभ आहे. कुलदीपक आहे....

बराच वेळ अण्णा बाकावर बसून होते. पोटात अन्न नाही आणि डोक्यात हे भयानक विचार त्यांना त्रस्त

झाले होते. दोन तीन दिवस नातेवाईक उपयोगी पडले. पण आता अण्णांना रहावेना. ते बाहेर काहीतरी खात आणि हॉस्पीटलमध्ये सुन्न मनाने बसून रहात. आणलेली बहुतेक रक्कम संपली होती. फक्त परतीच्या प्रवासापुरते पैसे शिल्लक होते, कमाला फ्रॉक आणि साड्या तर घेतल्या, कमा किती छान दिसेल गुलाबी फ्रॉकात आणि 'ही'! तिला निळा रंग फार खुलून दिसतो, वहिनीला केशरी खुलतो. अण्णा सुखावले. परवाच भास्कर त्यांना म्हणाला होता, 'एक धोतरजोडी घ्या अण्णा, ही जुनी किती विटली आहे!' त्या मायेच्या नुसत्या शब्दांनीच त्यांना बळ आलं होतं.

अचानक अण्णांना एक सिस्टर दिसली., हां... अरे ही तर परवा भास्करच्या जवळ होती. सिस्टर धावत आण्णांच्याच दिशेने येत होती, धाप टाकत तिने अण्णांना विचारलं, 'तुम्हीच देशपांडे ना ! छातीच्या ऑपरेशनसाठी तुम्हीच पेशंटला इथे अॅडमिट केलाय ना !' कावरेबावरे झालेले अण्णा...... पटकन 'हो' म्हणाले. 'मग चला तर,' चालता चालता ती सांगत होती.

त्या शब्दांनी त्यांची पावले अचानक वेगाने पडू लागली. 'अहो तुमच्या पेशंटचं कालच ऑपरेशन केलंय, तुम्हाला सारख्या हाका मारीत होता बिच्चारा ! पण मलाही वाईट वाटलं की तुम्हाला त्याला भेटायला देत नाही म्हणून. आता त्याने विनंती केली मला, अण्णांना असतील तिथून घेऊन ये. त्यांनी हॉस्पीटलमध्ये कितीही चकरा मारल्या तरी माझी खोली कळणार नाही म्हणून आले.' अण्णांना जाताना सगळीकडे सुन्नता, मरगळ, वेदना यांचंच साम्राज्य दिसत होतं. मग थोडं त्यांना बरं वाटलं. आपणच काय फार दुःखी नाही. सिस्टर एका खोलीत शिरली. पाठोपाठ अण्णा आले आणि डोळे भरुन ते भास्करला बघू लागले. एक तगडा माणूस आज या अशा अवस्थेत ...... आणि आणखी पुढे काय मांडलयस देवा.

'अण्णा......' एक क्षीण हाक आली.

अण्णा त्याच्या बाजूला बसले त्याच्या कपाळावरुन हात फिरवीत म्हणाले, 'किती वाळलास राजा; डोळ्यावर विश्वास बसत नाही इतका.' 'अण्णा मला तुमचीच भीती वाटते. मी नसलो तर तुमचं होणार कसं ? कसं सांगू तुम्हाला ...... मी सुचत नाही ह ... अं ... अं ... आईऽऽऽ गऽऽऽ अशा कळा येतात हो छातीतून.'

त्याचे हाल अण्णांना पहावत नव्हते. ज्याला मांडीवर घेऊन जेवू घालावं असं अण्णांना अजूनही वाटायचं त्याची ही दशा ! 'भास्कर पण अरे ऑपरेशन झालं ना आता, तर तुला बरं वाटलं पाहिजे.'

'अण्णा घात झाला आहे. मी म्हणत होतो तेच खरं ठरलंय... बघा ... बघा अण्णा ही चादर ... सरकवून...' अण्णांनी त्याच्या अंगावरची चादर सरकवली तर काय हे ?

'अरे पोटालासुद्धा टाकें कसे रे ! सांग राजा हे काय झालं. ऑपरेशन छातीचं होतं आणि पोटाचं पण, कशा वेदना सहन करशील.' भास्करचा आवाज अगदी क्षीण झाला होता. डोळे किती खोल गेले होते. जीवात जीव आणून तो बोलत होता.

'कसं सांगू अण्णा मी आता दोन दिवसांचा सोबती. मी घरी जाईन असं काही... वाटत नाही. आईऽऽऽ ग.ऽऽऽ या छातीत कळा पुन्हा येताहेत, मी अगदी दुबळा, अशक्त झालोय. चार शब्द बोलताना जड जातं. मला समजलंय अण्णा .. हे – आई ग, त्यांचा कट होता. अण्णा, त्यांनी माझी किडणी काढून घेतली, मला लुळा बनवलाय... आई .. ग किडणी नसतानाही .. अजून जगलो असतो. पण... आता सारा त्राण गेलाय... छातीच्या कळा पुन्हा – पुन्हा वाढताहेत ... फार काळाचा सोबती...

नाही अण्णा... तुम्हाला बघून बरं वाटलं.... दुःख नका करु.' परत तो कळा सहन करु लागला.

अण्णा गदगदले शब्द फुटेना. काय चाललंय पहावेना, डोळ्यातील पाण्याला बांध घालता येत नव्हता. एका हाताने डोळे पुसत... दुसरा हात हळूवार भास्करच्या केसात फिरवीत पहात राहिले नुसते.... एकटक ... सारं विश्व जणू त्यांच्या भोवती गरगरत होतं... अंगाला कापरं भरत होतं.

अण्णा कसेबसे घराच्या घाटीवर आले तेच भेलकांडत. प्रवासात आणि आधीसुध्दा अन्न त्यांना सुचलेलं नव्हतं. उभं राहण्याचंही त्राण त्यांना नव्हतं. त्यांना आधार हवा होता तोच गेला होता .. दूर ......दूर.

जागरणांनी त्यांचे डोळे खोल गेले होते. घरी आलं फक्त घळलेलं शरीर. .. कशासाठी त्यांचं त्यांनाच उमजत नव्हतं. घाटीवर आले आणि भिरभिरत्या नजरेने घर... आपली नव्हे भास्करची जमीन, त्याने कुरवाळलेली झाडं बघून त्यांच्या दुःखावेगाचा बांध फुटला. जिवाच्या आकांताने त्यांनी हंबरडा फोडला....

'भाऊऽये रे.... बघ काय झालं तुझ्या अण्णाचं ये... ये...'

अण्णांचा आवाज ऐकताच सगळी धावत आली. एकटे अण्णा बघून साऱ्यांच्याच काळजाचा ठोका चुकला. साऱ्यांना बघून इतका वेळ दबलेला दुःखावेग उफाळून आला. ते स्फुंदत स्फुंदत म्हणाले,

'भाऊ...... काय रे हे झालं ...... माझा आधार गेला रे. मी पोरका झालो......
पोरका...... भास्कराचा उजेड गेला नी काळोख झाला ..... काळोख...... त्यांनी...... त्यांनी माझ्या बाळाचा सौदा केला रे .... आणि मी पोरका झालो पोरका .....- कायमचा,' असे म्हणतच अण्णा जमिनीवर दाणकन कोसळले.

हिरव्या बांगड्यांचा चूडा दगडावर खळकन आपटला गेला, सगळा चक्काचूर झाला.

★ ★ ★

---

# धर्मसहिष्णूता आणि राष्ट्रीय एकात्मता

**संजय कोळंबकर**

तृतीय वर्ष कला

रामजन्मभूमी बाबरी मशीद वादाने सर्वांत जास्त प्रकाश टाकला आहे तो हिंदू–मुस्लिम संबंधावर. बाबरी मशीद पडताच देशभर आणि प्रकर्षाने मुंबईत दंगल उसळली. अनेक निरपराध हिंदू–मुस्लिमांचे बळी त्यात गेले. हिंदू–मुस्लिम संबंध सहिष्णुतेचे, अगर सलोख्याचे कधीच नव्हते. राजकीय सोयीसाठी कधी काळी असे संबंध प्रस्थापित झाले असतील तेवढेच, परंतु सामान्यपणे दोघांची एकमेकांकडे पहायची दृष्टी संशयाचीच होती.

इ. स. ११९२ मध्ये महंमद घोरीने पृथ्वीराज चौहानाचा पराभव करुन आपली सत्ता दिल्लीच्या तख्तावर प्रस्थापित केली आणि औरंगजेबापर्यंत मुस्लिम सत्ता भारतात राहिली. एक अनिर्बंध सत्ता मुस्लिमांनी उपभोगली. इ. स. १७०७ मध्ये औरंगजेबाचा मृत्यु झाला. राजकीय दृष्ट्या दिल्लीतील मुस्लिमांची सत्ता खिळखिळी झाली. औरंगजेबानंतरचे सगळे मुगल सम्राट अतिशय दुबळे होते. त्यांच्या दुबळेपणाचा फायदा घेवून मराठ्यांनी संपूर्ण देशात

आपला दबदबा निर्माण केला. दिल्लीच्या तख्तावर कोणी बसावे हे मराठे ठरवत असत.

मुस्लिम राजवटीच्या या शेकडो वर्षांच्या कालावधीत हिंदू मुस्लिम संबंध हे निव्वळ शत्रुत्वाचे होते. कारण अकबर व शेरशहासुरी वगळता सर्वच मुस्लिम राज्यकर्त्यांनी हिंदू जनतेवर अन्याय केला. शहाजहाँची कारकीर्द मुगल साम्राज्याचे सुवर्णयुग म्हणतात परंतु "बादशहानामा" या ग्रंथांत शहाजहाँच्या हिंदू विषयी असलेल्या द्वेषाची स्पष्ट नोंद आहे. हिंदुस्थानचे सम्राट असल्याबद्दल मुस्लिम सम्राटांना नेहमीच गर्व वाटत असे. परंतु हिंदुस्थानी म्हणून घेण्यात त्यांना कमीपणा वाटे. इराणचा शहा खरे तर हिंदुस्थानी सम्राटापेक्षा अतिशय दुबळा होता. तरी हा शहा श्रेष्ठ होता. त्याचे आदेश हिंदुस्थानी सम्राटाला पाळावे लागत कारण इराणचा शहा 'इराण'चा होता. धार्मिक दृष्टया इराणचा शहा श्रेष्ठ होता.

एक शेरशहा सुरी आणि अकबर यांच्या शिवाय इतर मुस्लिम राज्यकर्त्यांनी भारतीय जनतेला समजावून घेण्याचा प्रयत्न केला नाही. अकबर हा स्वत: सहिष्णू होता. त्याने परधर्मियाना तुच्छ लेखले नाही. आपल्या साम्राज्यात सांस्कृतिक व राजकीय ऐक्य स्थापण्यासाठी 'दिनेईलाई' हा नवीन पंथ स्थापन केला. त्याचा मुख्य हेतू हिंदू-मुस्लिम यांना एकत्र आणण्याचा होता. दिनेईलाईमुळे राष्ट्रीय भावनेचा जन्म होवून बराच काळपर्यंत ती टिकून राहिली. अध्यात्मिक ऊंची व बुद्धीमत्तेबाबत अकबर आपल्या समकालीनापेक्षा ३०० वर्षे पुढे होता.

त्याचप्रमाणे बाबरानंतर हुमायुनचा पराभव करुन दिल्लीच्या तख्तावर बसलेला पठान सुलतान शेरशहा सुरी हा न्यायप्रिय सुलतान म्हणून इतिहासात प्रसिद्ध आहे. शेरशहा नि:पक्षपाती व नि:स्पृह होता. त्याने हिंदूना आदराने वागविले, हिंदूच्या धार्मिक श्रद्धा– स्थानावर त्याने आघात केले नाहीत. त्यांच्या प्रशासना बाबत कीन सारख्या नामवंत इतिहासकाराने असे म्हटले आहे की, "कोणत्याही सरकारने, ब्रिटीश सरकारने देखील शेरशहा इतकी प्रशासकीय बुध्दीमत्ता दाखविली नाही मात्र इतर राज्यकर्त्यांनी हिंदूची मालमत्ता लुटीसाठी आहे असा ठाम विश्वास करुन घेतला.

मुगल साम्राज्याचा ऱ्हास झाला. मराठेशाही बुडाली आणि ब्रिटीशांची सत्ता हिंदूस्थानावर स्थापन झाल्यावर हिंदू मुस्लिम एक झाले. कारण ब्रिटीश हे हिंदू-मुस्लिमांचे समान शत्रू होते. १८५७ च्या स्वातंत्र्ययुद्धात हिंदू मुस्लिमांनी एकत्र येवून ब्रिटीशांशी प्राणपणाने लढा दिला. ब्रिटीश सत्ता भारतातून नष्ट होते की काय अशी वेळ आली पण या स्वातंत्र्ययुद्धाला अपयश आले आणि ब्रिटीशांनी धडा घेतला तो म्हणजे भारतातील या दोन प्रमुख धर्मियांना एकत्र येण्याची संधी यापुढे कधीही द्यायची नाही. हीच ब्रिटीशांची फोडा आणि झोडा ही नीती होती आणि त्यातूनच द्विराष्ट्रवादी संकल्पनेचा उदय झाला आणि म्हणून भारतीय स्वातंत्र्य चळवळीला जातीयवादी प्रवृत्ती आणि ब्रिटीशांची दडपशाही या दोन आघाड्यावर लढावे लागले.

'मुस्लिम लीग' ही मुस्लीमांच्या राजकीय आणि सामाजिक हक्कासाठी स्थापन झाली होती. परंतु मुस्लिम लीगचा इतिहास केवळ जातीय दंगलींनी रंगलेला दिसून येतो. सुरुवातीच्या काळात खुद्द बॅ. जिनांनी या लीगची 'गुंडांची संघटना' म्हणून संभवना केली होती पण पुढे आपल्या राजकीय आकांक्षांची पूर्ती होण्यासाठी मुस्लिम लीगचे व्यासपीठ त्यांना सोयीस्कर वाटले.

कॉंग्रेसने मुस्लिस लीग बरोबर नेहमीच समझोत्याची भूमिका घेतली. कॉंग्रेस मधील मुस्लिम नेत्यांना आपल्याला भारतीय मुस्लिमांचे प्रतिनिधी मानले जात नाही याची खंत होती व कॉंग्रेसने जातीयवादी शक्तीनाच मुस्लिमांचे प्रतिनिधी मानले व त्यांच्या बरोबर समझोत्याचे राजकारण सुरु केले. कॉंग्रेस नेत्यांच्या दौर्बल्याचा पुरेपूर फायदा मुस्लिम लीगने उठवला व प्रत्येक गोष्ट आपल्या मनासारखी करुन घेतली. पाकिस्तानची निर्मिती करण्याचे धैर्य लीग दाखविणार नाही असे कॉंग्रेसला वाटत होते परंतु पाकिस्तानची निर्मिती झाली.

पाकिस्तानची निर्मिती हा भारतीयावर पडलेला

फार मोठा धाला होता. फाळणीचे दुष्परिणाम हिंदू — मुस्लिमांना भोगावे लागले. केवळ धर्माच्या पायावर ही फाळणी झाली व पाकिस्तानात राहणारे लाखो हिंदू देशोधडीला लागले. हिंदुत्ववादी संघटनांना फाळणीनंतर मिळत जाणारी मान्यता हा फाळणीचाच एक परिपाक होय.

हिंदुस्थानच्या फाळणीनंतर देशात मोठी दंगल उसळली. केवळ धर्मावरुन हिंदू—मुस्लिम संबंधात चांगलाच तणाव निर्माण झाला. शेवटी धर्म हा मानवानेच स्थापन केलेला आहे. प्रेषित महंमद पैगंबराने अनेक देवदेवतामुळे समाजात माजलेली अनागोंदी याना आव्हान दिले. एकच अल्ला व एकच अंतीम प्रेषित अशी सरळ सोपी धर्म रचना करुन त्याने समाजाची एकजूट बांधली. त्या काळात धनदांडगे चार—पाचशे स्त्रिया बाळगीत असत. त्यामुळे महमद पैगंबराने चार विवाह्यांची मर्यादा घातली. त्या काळात ती प्रचंड धर्म सुधारणा होती. प्रत्येक धर्मसंस्थापक त्या-त्या काळातील क्रांतीकारक समाज सुधारक होता. त्यांचे बंड सर्वसामान्यासाठी होते. प्रेषिताने विषमतेच्या वाळवंटात समतेचा पुरस्कार केला.

श्रीकृष्णाने अर्जुनाला युद्ध का केले पाहिजे याचे संपूर्ण तत्त्वज्ञान विशद केले. अर्जुनाला आणि निमित्त मात्र अर्जुनाच्या माध्यमातून जगताला मार्मिक विचार करायला शिकविले. वेगळ्या भाषेत सांगायचे तर समाजाला डोळस केले.

गौतम बुद्धाने वर्णवादी विषमतेला आव्हान दिले. जनसामान्यांना न परवडणाऱ्या प्रचंड खर्चाच्या यज्ञ—यागाला कडक विरोध केला. ब्राह्मणांची मक्तेदारी व मिरासदारी असलेले कर्मकांड मोडले. जन्मजात उच्चपणाची रेवडी उडविली व गुणवत्तेचा गौरव प्रस्थापित केला. मानवाने मानवाला माणुसकीची वागणूक दिली पाहिजे असा संदेश देणारा जगातील पहिला श्रेष्ठ पुरुष गौतम बुद्ध हा होय.

त्यापुढेही जावून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अत्याधुनिक विज्ञाननिष्ठ धर्म सांगितला. जगातील हाच धर्म की ज्यात विज्ञानाशी सुसंगत समाजकल्याणाची तळमळ व त्याच्या काळातील अनुभव या कसोट्या धर्मनिर्णयासाठी सांगितल्या आहेत. या धर्मात स्वातंत्र्य आहे, समता आहे, बंधुत्व आहे, विज्ञान आहे. समाजाशी बांधीलकी आहे.

प्रत्येक धर्मसंस्थापकांनी त्याच्या काळात समाज सुधारणेचा प्रयत्न केला परंतु त्यांच्या नंतर निर्माण झालेले धर्मगुरु धर्मांध झालेले दिसून येतात. मतलबी मौलवी, पुजारी व पाद्री यांनी स्वार्थ साधण्यासाठी धर्म धर्मग्रंथात गुंडाळून ठेवला. धर्मात बदल अशक्य करुन टाकले. त्यामुळे जो धर्म क्रांतीकारक सुधारणेसाठी प्रस्थापित केला तोच धर्म सुधारणांचा कट्टर शत्रू बनला व त्यातून काय निर्माण होते हे ६ डिसेंबर व त्या नंतरच्या घटनानी स्पष्ट केले आहे. स्वातंत्र्यवीर सावरकर म्हणाले की, ‘अजागळपणा कुराणीय असो वा पुराणीय असो तो झाडलाच पाहिजे. जे जे उपयुक्त ते ते स्वीकारले पाहिजे.’

या पुढे भारतीय जनतेने आपण २१ व्या शतकाकडे जात आहोत याची जाण ठेवून या नव्या शतकातील अत्याधुनिक विज्ञानाशी व तंत्रज्ञानाशी जुळवून घेतले पाहिजे. धर्मगुरुंच्या सल्ल्याने किंवा मेळाव्याने प्रश्न सुटणार नाहीत. त्याचप्रमाणे कोणत्याही सत्तारुढ सरकारने धर्मवादी शिष्ट मंडळाची भेट घेवू नये. धर्म घरापुरता व प्रार्थना स्थळापुरता मर्यादीत करावा. तो रस्त्यावर आणू नये. प्रत्येक धर्मात मूलतःच विचार स्वातंत्र्य आहे. धार्मिक सहिष्णुतेसाठी सर्वच कर्मठ धर्मगुरुंचे न ऐकता विज्ञानानुसार व गरजेनुसार निर्णय घ्यावा. त्याचप्रमाणे भारत सरकारने समाज सुधारकांना उत्तेजन द्यावे व साहाय्य करावे व धर्मांधाना ठेचावे.

राष्ट्रीय एकात्मतेच्या पोषणासाठी हत्याराच्या ऐवजी शांतीची आवश्यकता आहे. धर्मनिरपेक्षता आणि भारतीय घटनेतील कायद्यांचा स्वीकार प्रत्येक धर्मियाने ‘माणूस’ या नात्याने केला पाहिजे. मंदिर आणि मशीद पुजून मानवता निर्माण होणार नाही. त्यातून काय निर्माण होते हे ६ डिसेंबर आणि त्यानंतरच्या घटनांनी स्पष्ट केले आहे. म्हणून आज आपण सर्वांनीच एक धडा घेवूया, हा धडा मानवतावादाचा व प्रेमभावनेचा !

☆ ☆ ☆

# तरुणांना नवी क्षितिजे : हिंदूस्थानी सेनादल

**रुपेश जावकर** (संकलक)

तृतीय वर्ष विज्ञान

दहावी, बारावी अथवा पदवी परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांपुढे सतत एक प्रश्न भेडसावत असतो तो म्हणजे आता काय करायचे ? कोणता कोर्स घ्यायचा. नोकरी, व्यवसायाच्या दृष्टीने कुठले क्षेत्र निवडावे ? भरपूर पगार मिळणारे, तसेच नोकरीमध्ये शाश्वती असणारे असे क्षेत्र कुठले ? या सर्व प्रश्नानी विद्यार्थी तसेच पालक हैराण होतात.

आपल्या समाजात कोणत्याही अभ्यासक्रमाच्या उपयोगितेचे परिणाम तो पूर्ण केल्यानंतर मिळणाऱ्या पोटापाण्याच्या धंद्याच्या दर्जामध्ये केले जात असल्याने सध्या इंजिनिअरींग, मेडिकल, सी. ए. या क्षेत्रात प्रचंड प्रमाणात ॲडमिशनसाठी स्पर्धा चालू असते. डॉक्टर, इंजिनिअर, सी. ए. या व्यवसायांच इतकं जबरदस्त आकर्षण आणि महत्त्व आहे की त्यापुढे सर्व व्यवसाय कमी अशी समजूत आपल्या समाजात सर्वत्र दिसते.

आज प्रत्येक क्षेत्रात जोरदार स्पर्धा चालू आहे. एखाद्या क्षेत्रात प्रशिक्षित लोक पुरेशा संख्येने उपलब्ध झाले की नंतर त्या क्षेत्रात प्रवेश करणाऱ्या विद्यार्थ्याला नोकरीची संधी मिळत नाही. तो बेरोजगार होतो. बेकारीची समस्या टाळायची असेल तर प्रत्येक विद्यार्थ्याने कोर्स निवडताना दूरदृष्टी ठेवायला पाहिजे.

शारीरिक क्षमता, आर्थिक क्षमता, बुद्धीमत्ता, शिक्षणाच्या सोयी अशा सर्व गोष्टी अनुकुल असुनही आपले विद्यार्थी–विद्यार्थिनी वेगळ्या वाटा चोखाळण्यास तयार नसतात. परंपरेने निर्माण झालेले मानसिक ओझे फेकून देण्यासाठी तसेच कार्य कर्तृत्वासाठी भरपूर आव्हान असलेल्या नव्यानव्या क्षेत्रात प्रवेश घेण्यास आपले युवक धजत नाहीत.

हिंदुस्थानी सेनादल हे सुद्धा तरुणांसाठी एक आकर्षक क्षेत्र आहे. या क्षेत्रात भरपूर स्पर्धा असते. परंतु नोकरीची शाश्वती मात्र असते. भारतीय सेनादलाचा किंचीतही विचार आपले युवक करीत नाहीत. सेनादलात सध्या मिळणारे वेतन, फायदे आणि इतर सोयीसुविधा पहाता 'करीअर' म्हणून घ्यावे असे ते आहे. आपल्या समाजात या क्षेत्राविषयीचे फार गैरसमज पसरले आहेत. उदाहरणार्थ सैन्यात दाखल होण्यासाठी धिप्पाड पहेलवानांची गरज असते, वगैरे वगैरे. या क्षेत्रात, प्रवेश करणारा विद्यार्थी हा शारीरिक दृष्ट्या सुदृढ असायला हवा.

सेनादलात प्रवेशासाठी प्रत्येक तरुणाजवळ काही तरी वेगळे करुन दाखविण्याची जिद्द, हिंमत आणि कष्ट करण्याची तयारी असावी लागते. सेनादलात दाखल झाल्यावर कठीण परिश्रम करण्याची चिकाटी असायला हवी.

भारतीय सेनादलात प्रवेश करण्याचे दोन प्रकार आहेत. एक म्हणजे जवान म्हणून तर दुसरा अधिकारी ! लष्करी पेशाचे वैशिष्ट्य म्हणजे ज्या युवकाला हा पेशा ' करीयर ' म्हणून घ्यायचा आहे, तो युवक दहावी पास झाल्यापासून पदव्युत्तर शिक्षण उत्तीर्ण झाल्यानंतर सुद्धा लष्करी पेशा स्वीकारु शकतो. मात्र त्याचे वय २२ वर्षापेक्षा कमी असायला नको.

**भूदल ( आर्मी ) :– जवान म्हणून प्रवेशासाठी. ..**

भारतीय सेना दलात जवान म्हणून प्रवेश घेण्यासाठी किमान १० वी पास असणे आवश्यक आहे. १६ ते २१ वर्षे वयाच्या दहावी झालेल्या

युवकाला जनरल ड्युटी जवान म्हणून भरती होता येते. कारकून म्हणून भरतीसाठी किंवा स्टोअरकिपर यासाठी मात्र दहावीला इंग्रजी, गणित विषय घेतलेले हवेत. सोल्जर टेक्निकल यामध्ये प्रवेश करण्यासाठी दहावीमध्ये इंग्रजी, गणित, शास्त्र हे विषय घेतलेले पाहिजेत. यासाठी वयोमर्यादा २३ वर्षापर्यंत आहे. सेनादलात प्रवेशासाठी उंची १६४ सें.मी., वजन ५० किलो आणि छाती ७७ से.मी. व ५ से.मी. पर्यंत छाती फुगविता आली पाहिजे असे प्रमाण आहे. भरतीपुर्वी उमेदवाराला लेखी परीक्षा नंतर वैद्यकीय चाचणी यामधून पार पडावे लागते. यात ज्याचे वडील पुर्वी सैन्यात होते किंवा जिल्हा आणि राज्य पातळीवरील खेळाडू यांच्याबाबतीत उंचीत १ से.मी. व वजनाला १ किलो अशी सूट दिली जाते. भूदलाची भरती अर्जाद्वारेच होते. महाराष्ट्रात पुणे, नागपूर, औरंगाबाद आणि कोल्हापूर येथील भरती केंद्रामार्फत होते.

**भूदल ( आर्मी ):– अधिकारी म्हणून प्रवेशासाठी...**

भूदलात अधिकारी म्हणून प्रवेशासाठी बारावी पास अथवा पदवीधर असणे आवश्यक आहे. जो विद्यार्थी बारावी पास अथवा पदवीधर असेल त्याला 'नॅशनल डिफेन्स अॅकेडमी' (राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी) साठी योग्य ती लेखी परीक्षा व मुलाखतीत उत्तीर्ण झाल्यानंतर प्रवेश मिळू शकतो. मात्र या करिता १६ ½ ते १९ वयोगट असून शारीरिक प्रकृती सुदृढ असणे आवश्यक आहे. सदर प्रवेशासाठी परीक्षा वर्षातून दोन वेळा घेण्यात येतात. पहिली परीक्षा एप्रिल / मे व दुसरी परीक्षा सप्टेंबर / ऑक्टोबरमध्ये घेण्यात येतात. या परीक्षा युनियन पब्लिक सर्व्हिस कमिशनतर्फे घेतल्या जातात. राज्यातील कुठल्याही केंद्रात विद्यार्थ्यांच्या सोयीनुसार त्यांना परीक्षा केंद्र निवडता येते. लेखी परीक्षा झाल्यानंतर किमान ४ ते ५ महिन्यात लेखी परीक्षेचा निकाल लागतो. त्यानंतर उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना मेरीटप्रमाणे मुलाखतीस बोलाविले जाते. सर्व्हिसेस सिलेक्शन बोर्ड (एस्. एस्. बी.) विद्यार्थ्यांची बौद्धिक, मानसीक, शारीरिक चाचणी व मुलाखतीद्वारे निवड करते. याचा कालावधी साधारपणे ४ ते ५ दिवसांचा असतो. या चाचणीतून यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांने वैद्यकीय चाचणी उत्तीर्ण होणे आवश्यक असते. ही वैद्यकीय चाचणी किमान ४ दिवस घेण्यात येते. वरील सर्व चाचण्यांतून उत्तीर्ण झालेले विद्यार्थी अंतीम प्रवेशासाठी निवडले जातात. प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांच्या चार वर्षाच्या कालावधीचा राहणे, जेवणाचा, शिक्षणाचा खर्च केंद्र सरकार करते. हा अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांना दिल्ली येथील जवाहरलाल नेहरु विद्यापिठातर्फे पदवी दिली जाते व भारतीय सेनादलात कमिशनर ऑफिसरच्या हुद्यावर नेमणूक केली जाते.

भारतीय लष्कराच्या भूदल शाखेमध्ये 'ऑटोमेटेड कार्टोग्राफी' पद नव्याने निर्माण केले आहे. अभियांत्रिकी शाखेत हे पद भरले जाणार आहे. या शाखेत प्रवेश घेण्यासाठी २० ते २५ वर्षे वयाची अट आहे. तसेच तो विद्यार्थी गणित विषय घेऊन पदवी परीक्षा उत्तीर्ण झालेला किंवा १२ वी परीक्षा गणित व शास्त्र घेऊन उत्तीर्ण झालेला हवा. या शाखेत प्रत्येक विद्यार्थ्याला लेखी परीक्षेला सामोरे जावे लागते.

**नौदल (नेव्ही) :–जवान म्हणून प्रवेशासाठी ..**

ज्या विद्यार्थ्यांना दहावीमध्ये ५५% पेक्षा अधिक गुण आहेत त्यांना नौदलात खलाशी तसेच आर्टीफाइसर या टेक्नीकल विभागात भरती होता येते. तो विद्यार्थी १७ ते २० या वयोगटातील असावा. या विद्यार्थ्यांना सुद्धा लेखी परीक्षा तसेच वैद्यकीय परीक्षेस तोंड द्यावे लागते. नौदलाच्या तांत्रिक विभागात प्रवेश घेण्यासाठी आर्टीफाइसर अप्रेंटीस आणि डॉकयार्ड अप्रेंटीस या अखील भारतीय पातळीवरील दोन लेखी परीक्षांना सामोरे जावे लागते. दहावीमध्ये विज्ञान, गणित व शास्त्र हे विषय विद्यार्थ्यांने घेतलेले पाहिजेत. आर्टीफाइसर साठी वयोमर्यादा १७ ते १९ असून त्यांना ३½ वर्षे प्रशिक्षण दिले जाते. त्यानंतर त्यांना नौदलामध्ये सामावून घेतले जाते.

**नौदल (नेव्ही):– अधिकारी म्हणून प्रवेशासाठी ..**

महाराष्ट्र राज्यातील लोणावळा या ठिकाणी ' आय्. एन. एस. शिवाजी ' नावाची नौदलाची एक संस्था आहे. या संस्थेमध्ये भारतीय नौदलासाठी अभियांत्रिकी

अधिकारी तयार केले जातात. या संस्थेत प्रवेश मिळविण्याकरीता १२ वी शास्त्र शाखेमध्ये ७०% गुण मिळवून उत्तीर्ण झालेले असावेत. इंग्रजी या विषयांत ५०% गुणांची आवश्यकता असते. वयोमर्यादा १६½ ते १९ या दरम्यान असावी. वर्षातून एकदा हा कोर्स नोव्हेंबरमध्ये सुरु होतो. या कोर्ससाठी लेखी परीक्षा नसते. परंतु बौद्धिक, मानसीक व शारीरिक चाचण्या सर्व्हिसेस सिलेक्शन बोर्डतर्फे घेतल्या जातात. देशातील ७० ते ८० विद्यार्थ्यांना दरवर्षी प्रवेश दिला जातो. हा कोर्स ४ वर्षाचा असतो. या शिक्षणक्रमाचा खर्च केंद्र सरकार करते. उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना बी. टेक. पदवी दिल्ली येथील जवाहरलाल नेहरु विद्यापिठातर्फे देण्यात येते. यात यशस्वी झालेले विद्यार्थी नौदलात कमीशन ऑफिसर म्हणून नियुक्त केले जातात. नौदलाची भरती महाराष्ट्रात पुणे, नागपूर, औरंगाबाद आणि कोल्हापूर येथील भरती केंद्रामार्फत होते.

**वायूदल (एअर फोर्स):– जवान म्हणून प्रवेशासाठी**

ज्या विद्यार्थ्यांना दहावीमध्ये ६० % किंवा अधिक गुण मिळाले असतील त्याच विद्यार्थ्यांना वायुदलात प्रवेश मिळू शकतो. दहावीमध्ये ६०% गुण मिळविलेले विद्यार्थी वायुदलाच्या तांत्रिक विभागात घेतले जातात. वायुदलात तांत्रिक काम खूप प्रमाणात असल्यामुळे ज्या विद्यार्थ्यांनी दहावीमध्ये गणित, विज्ञान असे विषय घेतलेले आहेत अशा विद्यार्थ्यांना वायुदलाच्या तांत्रिक विभागासाठी निवडले जातात. विद्यार्थी जर १२ वी पास असेल तर त्याला प्राथमिकता देण्यात येते. दहावी पास विद्यार्थ्यांसाठी वयोमर्यादा २० वर्षांची असते तर बारावी पास विद्यार्थ्यांसाठी वयोमर्यादा २२ वर्षे इतकी असते. या विद्यार्थ्यांना योग्य ती लेखी परीक्षा तसेच वैद्यकीय चाचणीस सामोरे जावे लागते. वायुदलाची भरती मुंबई येथे होते.

**वायुदल ( एअरफोर्स ):– अधिकारी म्हणून प्रवेशासाठी**

वायुदलात अधिकारी म्हणून पायलट यांचाही समावेश होतो. टेक्नीकल शाखेत इलेक्ट्रॉनिक्स, कॉम्प्युटर सायन्स इ. विषयातील पदवीधर युवकांना खूपच वाव आहे. वायुदलात अधिकारी म्हणून प्रवेशासाठी वयोमर्यादा २२ वर्षापर्यंत असते. वायूदलात ग्राऊंड ड्युटी म्हणजे जमिनीवरील सेवा विभागात, प्रशासन, व्यवस्था, पुरवठा विभागात तसेच अकाउंटस् आणि एअर ट्रॅफिक कंट्रोलर या शाखांत अधिकारी म्हणून तरुणांना बऱ्याच प्रमाणात वाव आहे. पदवीधर तरुणांना २३ वर्षे वयाची अट आहे. पदवीधर विद्यार्थ्याला सर्व्हिसेस सिलेक्शन बोर्डाच्या (एस्. एस्. बी. ) मुलाखतीला सामोरे जावे लागते. सर्व परीक्षात उत्तीर्ण झालेल्या युवकाला वायुदलात अधिकारी म्हणून नियुक्त केले जातात. वायुदलातील भरतीमध्ये राष्ट्रीय छात्र सेनेतील ( एन्. सी. सी.) सेवेला विशेष महत्त्व आहे. पदवीधर विद्यार्थ्याला आणि एन्. सी. सी. मधील सी सर्टीफिकेट असणाऱ्या विद्यार्थ्याला भरतीमध्ये प्राधान्य दिले जाते.

★ ★ ★



# विद्यापिठीय शिक्षणात ग्रामीण विकासाचे स्थान

**सुनील परब / संजय माने**

तृतीय वर्ष कला

शिक्षणव्यवस्थेतील उच्चपातळीवर जे शिक्षण दिले जाते त्यातील काही शाखा ह्या पूर्णपणे कृषी आणि ग्रामीण विकासात स्वतःचे संपूर्ण योगदान देणाऱ्या आहेत. तर काही या दोन्ही क्षेत्रांच्या विकासासाठी पूरक ठरणाऱ्या आहेत. या उच्च शिक्षणाचा कृषी आणि ग्रामीण विकासाला कितपत फायदा झाला आहे. याचा विचार पुढील प्रमाणे करता येईल.

उच्च शिक्षणाच्या कला, वाणिज्य व विज्ञान या तीनही शाखांमध्ये आजही व्यापक पातळीवर कृषी आणि ग्रामीण विकासाला केंद्रस्थानी मानून अभ्यासक्रम शिकविला जात नाही. त्यामुळे सध्याच्या औपचारिक शिक्षणाच्या प्रक्रियेतील अगदी केंद्रस्थानी असलेले अशा स्वरुपाचे हे महाविद्यालयीन शिक्षण हे कृषी व ग्रामीण विकासाच्या दृष्टीने पूर्णपणे निरुपयोगी ठरले आहे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये कृषी व ग्रामीण विकासाचे असलेले स्थान लक्षात घेता या महत्त्वपूर्ण विषयांच्या ज्ञानाला महाविद्यालयीन शिक्षणाने दुर्लक्षित मानले आहे असे दिसते. पण त्यामुळे अशा प्रकारचे महाविद्यालयीन शिक्षण घेऊन तयार झालेला ग्रामीण युवक हा ग्रामीण अर्थव्यवस्थेवर भार होऊन पडत आहे. अशा युवकांनी मिळविलेले संबंधीत विषयातील ज्ञान आणि कृषी व ग्रामीण विकासाचे क्षेत्र यांचा काहीही संबंध राहिलेला नाही. त्यामुळे त्याच्या ज्ञानाचा काहीही उपयोग होत नाही. तो बेकार रहात आहे. आणि विनाकारण अशा निरुपयोगी लोकसंख्येचा ताण ग्रामीण अर्थव्यवस्थेवर पडत आहे. ब्रिटीश शिक्षण पद्धतीवर 'महात्मा गांधींनी' टीका करताना 'ज्या विषयी' भीती व्यक्त केली होती तसाच काहीसा प्रकार आजच्या शिक्षण पद्धतीत झालेला आहे. हे सर्व टाळण्यासाठी अथवा ग्रामीण विकासातील महत्त्व लक्षात आल्यामुळे अलिकडे कला, वाणिज्य व विज्ञान या तीनही ज्ञानशाखांमध्ये ग्रामीण विकासासंबंधी थोडासा दृष्टीकोनात बदल दिसून येत आहे. पारंपारिक विषयांची आणि ग्रामीण विकासाची सांगड घालण्याचा प्रयत्न होत आहे. त्यातून ग्रामीण विकासाला पूरक असे ज्ञान देण्याचा प्रयत्न होत आहे. उदा. कला शाखेमध्ये स्वतंत्र ग्रामीण विकास हा विषय आहे. ग्रामीण अर्थशास्त्र, ग्रामीण समाजशास्त्र, राज्यशास्त्रात ग्रामीण प्रशासन इत्यादींसारखे विषय; तर वाणिज्य शाखेत कृषी अर्थशास्त्र, कृषी व्यवस्थापन, ग्रामीण बँकींग; तर विज्ञान शाखेत ग्रामीण विकासाची प्रक्रिया लक्षात घेऊन प्राणीशास्त्र, वनस्पतीशास्त्र इत्यादींवर संशोधन केले जात आहे व नवनवीन विचारांची मांडणी केली जात आहे.

आजमितीला महाराष्ट्रात सर्वसाधारण शिक्षण देणारी 'आठ' विद्यापिठे; ( चार कृषीविद्यापिठे व एक तांत्रिक विद्यापीठ वगळून ), एक 'मुक्त विद्यापीठ (यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ नाशिक), टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे, टाटा समाज विज्ञान संस्था, भारतीय लोकविज्ञान संस्था इत्यादी विद्यापिठाचा दर्जा असलेल्या संस्था व या सर्वांना संलग्न असणारी 'बाराशे महाविद्यालये' यामधून जवळजवळ 'तीस हजार प्राध्यापक' शिकवण्याचे काम करीत आहेत. तर 'बारा लाख विद्यार्थी' त्यात शिक्षण घेत आहेत. अलिकडे काही वर्षात शिक्षण संस्थांचा विस्तार झपाट्याने होऊन राज्यातील अर्थसंकल्पाचा 'सर्वाधिक पैसा उच्च शिक्षण या घटकावर खर्च होत आहे.' १९९१–९२ या वर्षी प्राथमिक ते उच्च शिक्षणापर्यंत अंदाजपत्रकातील खर्चाची तरतुद 'अठराशे पन्नास कोटी' रुपये इतकी

त्यापैकी आहे. उच्च शिक्षणावरील अनुदान 'आठशे कोटी' रुपये आहे. एवढा उच्च शिक्षणावर खर्च करुनही दुर्दैवाने कला, वाणिज्य व विज्ञान या शाखात पदवी अथवा पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी आपल्या विषयातला एकही 'मुळग्रंथ' वाचलेला नसतो. अशी महाविद्यालये वर्षातून १०० दिवसदेखील नीट भरत नाहीत. ग्रंथालयांचे स्वरुप गोदामांचे होते प्राध्यापकांचे वर्षानुवर्षाच्या टिपणांचे कीर्तन चालू असते आणि सहजच प्रश्न पडतो की आपण उच्च शिक्षणावर एवढे कोट्यावधी रुपये का खर्च करीत आहोत ? एवढे मनुष्यबळ त्यात का गुंतवून ठेवत आहोत? प्रा. एच्. एम्. देसरडा यांनी यावरती सुचवलेले उपाय हे ग्रामीण विकासाला निश्चितच उपयुक्त ठरणारे आहेत. ते पुढील प्रमाणे -( संदर्भ–उच्च शिक्षणाची दुर्दशा व ठोस उपाय - प्रा. एच्. एम्. देसरडा. दैनिक-लोकसत्ता दि. १६।७।९२)

विद्यापीठ व विभागवार दरवर्षी १०% महाविद्यालये बंद करुन त्यासंबंधातील पैसा व नीती त्या परिसरातील खेड्यांच्या विकासासाठी लघुपाणलोट क्षेत्र विकासासाठी वळवून परिसरातील खेड्यांच्या विकासाची आखणी व अंमलबजावणीचे काम त्या बंद केलेल्या महाविद्यालयातील प्राध्यापकांवर सोपवून व त्यांच्या हाताखाली काही विद्यार्थी देवून प्रत्यक्ष कार्यानुभवावर आधारीत शिक्षण चालू करावे. अशा प्रकारच्या शिक्षणासाठी उच्च उत्पन्न गटाकडून खर्चाएवढी 'फी' आकारणी करुन वसुली करावी. समाजाच्या मुख्य समस्यांचे आकलन व सोडवणूक होईल. याप्रमाणे अभ्यासक्रमांची पुनर्रचना व्हावी. परिसर विज्ञान, समस्या यावर अभ्यासक्रमात जास्त भर असावा. विद्यार्थ्यांना पदव्यांचे वाटप करीत राहण्यापेक्षा उपयुक्त स्वरुपाचे धंदेशिक्षण, उत्पादकीय शिक्षण, शेतीसह सर्व पारंपारिक व्यवसायांचे आधुनिकीकरण यावर एकूण शिक्षणाच्या निम्मा खर्च करावा. उच्च शिक्षण क्षेत्रातील प्राध्यापक, शिक्षक व कर्मचारी ह्यांनी संपूर्ण महाराष्ट्रभर प्रत्येकी एका गावाच्या विकासाची आणि आधुनिकीकरणाची जबाबदारी आपल्या शिरावर घेतली आणि विद्यार्थ्यांना हा नवा दृष्टीकोन दिला, त्यात त्यांना प्राविण्य संपादन करुन दिले तर समग्र शिक्षणाला एक नवी कलाटणी व दिशा मिळून सबंध देशातील 'साडेपाच लक्ष' खेडी आपण विकासाच्या उच्च पातळीवर नेऊ शकतो. प्रचलित शिक्षण पद्धतीतून निर्माण झालेले सध्याचे बेकारी व दारिद्र्य हे प्रश्न अशा प्रकारच्या शिक्षणामुळे कालबाह्य ठरतील व ग्रामीण विकासाच्या शिक्षणाला एक नवी दिशा प्राप्त होईल.

प्रा. देसरडा यांनी सुचवलेले उपाय पूर्णतः अंमलबजावणीत आणता येणे शक्य होणार नाही. पण तरीदेखील ग्रामीणविकास विषयाप्रमाणे इतर विषयांच्या अध्ययनात व अध्यापनात देखील विकास प्रक्रियेत पूरक ठरेल अशा प्रकारची दिशा देणे आवश्यक आहे व ती काळाची गरज आहे. सध्याच्या कला, वाणिज्य आणि विज्ञान शाखातून ग्रामीण विकासाची सांगड घातलेल्या शिक्षणाचे प्रमाण हे एकूण शिक्षणाच्या ०.४% इतकेच आहे असे दिसते.

सध्याच्या औपचारिक शिक्षण व्यवस्थेत कृषी विद्यापिठे ही ग्रामीण विकासाच्या दृष्टीने औपचारिक आणि अनौपचारिक शिक्षणाच्या क्षेत्रात फार प्रभावीपणे काम पहात आहेत. कृषी विद्यापिठांत दिवसेंदिवस नवनवीन प्रकारच्या संशोधनाला महत्त्व दिले जात आहे. नवीन खते, बियाणांचे संकरीकरण यावर लक्ष केंद्रीत केले जात आहे. त्याबरोबरच कृषी अर्थशास्त्राला देखील कृषी विद्यापिठामधून प्राधान्य दिले जात आहे. प्रत्येक कृषी विद्यापिठाने विशिष्ट उत्पादनाच्या संशोधनासाठी स्वतंत्र संशोधन केंद्रे काढली आहेत. उदा. कोंकण कृषी विद्यापिठाचे 'वेंगुर्ले' फळ संशोधन केंद्र, म. फुले कृषी विद्यापीठ राहुरीचे ऊस संशोधन केंद्र, पाडेगाव अशा केंद्रामधून दीर्घ काळपर्यंत एखाद्या विशिष्ट उत्पादनावरती लक्ष केंद्रीत करण्याचे काम कृषी विद्यापिठे करीत आहेत.

कृषी विद्यापिठातून शेतकऱ्यांच्या मुलांनी शिक्षण घेवून त्या शिक्षणाचा वापर स्वतःच्या दैनंदीन जीवनात करावा अशी अपेक्षा आहे. पण आजही आपल्या ग्रामीण विकासाच्या प्रशासनात असे शिक्षण घेतलेल्या लोकांची जास्त गरज असल्यामुळे हे शिक्षण घेऊन तयार झालेले युवक ग्रामीण विकास प्रशासनाच्या क्षेत्रात प्रभावीपणे

काम करताना आढळत आहेत. त्याबरोबरच या शिक्षणाच्या बाबतीत अजूनही काळजी घेणे आवश्यक आहे. " नोकरीसाठी शेती शिक्षण " असा या शिक्षणाच्या बाबतीत गैरसमज होऊ नये. हे शिक्षण शेतकऱ्यांच्या मुलांनी घेऊन त्यानी या शिक्षणाचा वापर स्वतःच्या कृषी विकासासाठी करुन घ्यावा व त्या दृष्टीकोनातून या शिक्षणाकडे विद्यार्थ्यांनी आकर्षित व्हावे अशी अपेक्षा आहे. कृषी विद्यापिठातून हे जे औपचारिक शिक्षणाचे कार्य चालू आहे ते एकूण औपचारिक शिक्षण व्यवस्थेच्या १.४% इतकेच भरते. यावरुन महत्त्वपूर्ण अशा उच्च शिक्षणामध्ये कृषी व ग्रामीण विकासाचे स्थान किती शोचनीय आहे हे दिसते. त्यात सुधारणा झाली नाही तर ही शिक्षणव्यवस्था मनुष्यबळ यंत्रणेला रसातळाला नेऊन पोहोचवील असे चित्र आहे. तरी या शिक्षणाच्या सुविधांत ( कृषी व ग्रामीण विकासासाठी ) जास्तीत – जास्त वाढ होणे आज फार आवश्यक बनले आहे.

★ ★ ★

---

# कारण........उपाय

## दत्तात्रय सातवळेकर

११ वी वाणिज्य

देवगडचा रस्ता. माणसे यें जा करत होती. नेहमीप्रमाणे गर्दी नव्हती. दुपार रणरणती. आजुबाजूची काहीच दुकाने उघडी. त्याच रस्त्यावर " बिअर–बार " ची एक आलीशान इमारत. तेथेच रस्त्यावर एक फाटक्या कपड्यांचा माणूस झोकांड्या खात चालला होता. जणू काही एकूण जगाला विसरला होता. चालता चालता एका माणसाचा धक्का लागतो पण पडतो स्वतःच तो माणूस त्याला उठवतो आणि घर जवळ असल्यामुळे त्याला आपल्या घरी नेतो व झोपवतो.

संध्याकाळी बऱ्याच वेळाने तो शुद्धीत येतो. त्याची नशा पूर्णपणे उतरलेली असते. तो म्हणतो, " मी कुठे आहे ? मला इथं आणलं कुणी ?" तो माणूस जवळ बसलेला होता. तो म्हणाला, "तुम्ही इथे माझ्या घरात आहात. मी अभिजीत देसाई, सी. आय. डी. चीफ सिंधुदुर्ग डिस्ट्रिक्ट. तुम्ही कोणतरी सभ्य माणूस दिसता म्हणून मी तुम्हाला इथं आणलं. नाहीतर एवढ्यात जेलमध्ये असता. "
" खरोखरच माझ्यावर मेहेरबानी झाली. "

" आता तुम्ही आपल्या घरी जा. संध्याकाळ झालीय, घरी तुमची वाट पहात असतील."

" मला घर नाही. माझं घर होतं ते मी स्वतःच्या हातानं घालवलं. "

अभिजीत देसाई संध्याकाळी आपल्या ड्यूटीवर गेला. तो रात्री परत आला. तेव्हा हा त्याच्याच घरात होता. हा माणूस त्याच्याबरोबर त्याच्या घरात राहू लागला. त्याच्या बरोबर घरात काम करु लागला आणि त्याच्या घरात चांगलाच रुळला. हे दोघे एकमेकांचे जीवलग मित्र बनले. मात्र त्यापासून त्याने दारुच्या थेंबालासुद्धा स्पर्श केला नव्हता.

एक दिवस त्याला काय झालं कुणास ठाऊक ? तो परत आला आणि आपल्या पूर्वायुष्याबद्दल बरळू लागला. त्यावेळी अभिजीत तेथेच होता. तो ते ऐकत होता. " मी तुला जीवंत सोडणार नाही. वाटलं काय तुला, हा अजय मेला ? नाही तो

तुला मारल्याशिवाय राहणार नाही. " आणि तो झोपला. अभिजीतला काही समजेना. थोड्या वेळाने परत एकदा बरळू लागला. "तुझ्याच शोधात होतो मी वामनराव तुला आता सोडत नाही."

दुसऱ्या दिवशी सकाळी अभिजीतने त्याला रात्रीच्या प्रकाराबद्दल विचारले तेव्हा त्याने प्रथम टाळाटाळ केली नंतर सर्व प्रकार सांगितला.

"मी स्वतः एक पदवीधर आहे व बँकेत नोकरीला होतो. सर्व काम अगदी चोखरित्या बजावीत होतो पण एक दिवस बँकेत गेल्यावर सरप्राइझ चेकींग झालं आणि बँकेत तीस हजारांची अफरातफर आढळून आली. त्यातले वीस हजार आश्चर्यकारकरित्या माझ्या बॅगेत आढळून आले. मला एकदम धक्का बसला. बँकेने मला कामावरुन कमी केलं होत, हे ऐकूनच माझ्या पत्नीला धक्का बसला. त्यामुळे ती आजारी पडली. काही दिवस हॉस्पिटल मध्ये ठेवली पण शेवटी ती वारली. तोही धक्का मी कसाबसा सहन केला. पण चारच दिवसात मुंबईला माझी मुलं जी शिक्षणासाठी ठेवली होती, ती बॉम्बस्फोटात ठार झाली. मी तो धक्का सहन करु शकलो नाही आणि दारुच्या नादी लागून सर्व प्रॉपर्टी गमावली. पण ज्यावेळी बॉम्बस्फोट झाला त्यावेळी मी मुलांना आणायला मुंबईला गेलो होतो. त्यावेळी मी संध्याकाळी फिरुन येताना ही घटना घडली आणि ती मी प्रत्यक्ष डोळ्यांनी पाहिली. बॉम्बस्फोट होताना मी एका माणसाला रिमोट कंट्रोल हातात घेऊन पाहिले तर तो होता वामनराव शिंदे. आमच्याच हद्दीतील पोलीस ठाण्याचा पोलीस. मग मी पोलीस खात्यातील अधिकाऱ्यांकडे तक्रार केली पण काही उपयोग झाला नाही. पण मी त्या वामनराव शिंदेला सोडणार नाही."

अभिजीत त्यावेळी काहीही बोलला नाही. पण त्याने गुप्तरित्या तपासाला सुरुवात केली. प्रथम तो वामनरावाला भेटला. त्यानंतर पोलीस फाईल पाहिली मग त्याच्या लक्षात सारा प्रकार आला. नंतर बँकेत चौकशी केली.

त्याने संध्याकाळी सर्व प्रकार कथन केला, 'हे बघ, वामनराव दोषी नाही कारण त्याच्यावर वरिष्ठांचं दडपण होतं त्यामुळे त्याने असे केले शिवाय बँकेत जे रुपये ठेवले गेले त्या अगोदर एक माणूस तिथे येवून गेला तो तुला लाच देण्याच्या प्रयत्नात होता तू लाच घेतली नाहीस त्यामुळे त्याने तुझ्या बॅगेत तुझ्याच बँकेतील माणसाकडून रक्कम ठेवली. त्यामुळे तुझी ही अवस्था झाली. तुझ्या घराजवळ बॉम्बस्फोट झाला, त्याची मूळ कागदावर योजना, एका मोकळ्या प्रदेशात बॉम्बची चाचणी घेण्याची होती. पण ही गोष्ट रात्री करायची होती. त्यामुळे माणसांना त्याचा धक्का कळला नसता व सकाळपर्यंत आकाशही स्वच्छ झाले असते. पण अधिकाऱ्यांच्या दडपणामुळे तो बॉम्बस्फोट मोकळ्याजागे ऐवजी तुमच्या चाळीत झाला. पण त्यासाठी त्या अधिकाऱ्यांवरही दडपण होते. ते होते एका परराष्ट्रीय शक्तीचे. त्यात परराष्ट्राच्या सरकारलाही काही माहीत नव्हते अशा ह्या अमानवी शक्तीना देशात गोंधळ करायचा असतो व त्यात निरपराध माणसाचे बळी पडतात.

ह्या अमानवी शक्ती पाशवी बळाच्या जोरावर सर्व काही करु शकतात. पण देशातील काही तत्त्वे त्यांना पकडण्यास असमर्थ ठरतात. परत एकदा देशाची आर्थिक व्यवस्था ढासळू लागते. त्यांचा नाश करण्यासाठी पोलीसी यंत्रणेपेक्षा जनतेचा किंवा युवाशक्तीचा उपयोग होवू शकतो. तेव्हा एका वामनराव शिंदेचा नाश करुन काही उपयोग होणार नाही. त्या अमानवी शक्तीचा नायनाट करावा लागेल.

त्यानंतर त्यानेही प्रतिज्ञा केली की मी या शक्तींचा नायनाट करीन पण ..... या लढाईत त्याचाच अंत झाला. अमानवी शक्ती अजूनही जिवंत आहेत.

★ ★ ★

# अर्थसंकल्प एक दृष्टीक्षेप

**किशोरकुमार पोयरेकर**

द्वितीय वर्ष कला

केंद्रीय अर्थमंत्री डॉ. मनमोहन सिंग यांनी आपला सन १९९३–९४ चा अर्थसंकल्प शनिवार दिनांक २७ फेब्रुवारी १९९३ ला सादर केला. मागील दहा वर्षाशी तुलना करता या वर्षाच्या अंदाजपत्रकात जवळ जवळ १,००० कोटी रु. ने कमी तूट दाखवलेली आहे. अंदाजपत्रकामध्ये भाववाढीपासून सर्वसामान्य माणसांना दिलासा देण्याचा प्रयत्न अर्थमंत्र्यांनी केलेला आहे. अन्नावरील सबसीडी, ग्रामीण विकासावरील खर्चात वाढ, जवाहर रोजगार योजनेस प्राधान्य, शिक्षणावरील खर्चात वाढ या सारख्या अनेक तरतुदीमुळे दारिद्रय निर्मूलन होण्यास मदत होईल, असा निश्चित स्वरुपाचा दावा करता येत नसला तरीपण, त्या सर्वांचा परिणाम म्हणून सर्वसामान्य व्यक्तींचे जीवनमान उंचावेल. अर्थमंत्र्यांनी रुपया पूर्ण परिवर्तनीय केल्यामुळे भविष्यात निर्यातीच्या प्रमाणात वाढ होईल. त्याचबरोबर आयातीत घट होईल. औद्योगिक गुंतवणुकीवर मागास राज्यात करमाफी केल्याने समतोल प्रादेशिक विकासाबरोबरच देशाच्या आर्थिक विकासाचा दर उंचावेल.

**अर्थसंकल्पाचे स्वरुप:–**

सन १९९३–९४ च्या अर्थसंकल्पातील तरतुदी आणि खर्चाच्या बाबी वगैरेबाबत देशातील प्रसारमाध्यमाद्वारे बरीचशी माहिती मिळाल्याने त्याबाबतचे अधिक विश्लेषण करणे मी टाळत आहे.

अर्थमंत्र्यांनी सादर केलेल्या अर्थसंकल्पात केवळ ४,३१४ कोटी रु. ची तूट दर्शविण्यात आलेली आहे. अप्रत्यक्ष करातील सवलती, व्याजदरातील कपात, रुपयाचे पूर्णतः परिवर्तन, अन्नधान्यातील सबसीडीत वाढ, शिक्षणावरील खर्चात वाढ, ग्रामीण विकासावरील प्रचंड प्रमाणात वाढ, काही मागास प्रदेशातील गुंतवणूक, पाच वर्षाच्या कालावधिसाठी पूर्णपणे कर माफ वगैरे गोष्टीत अर्थसंकल्पाची ठळक वैशिष्टये सांगता येतील. चहा, बिस्कीटे, पादत्राणे कापड, रंगीत टि. व्ही. संच, काड्यापेटी, पंखे, साबण या वस्तूवरील कर कमी केलेले आहेत. वनस्पतीवरील करातसुद्धा घट केलेली आहे. अन्नावरील सबसीडीत गेल्यावर्षाच्या २,८०० कोटी रु. वरुन यंदा ३,००० कोटी रु. पर्यंत वाढ केलेली आहे. कर्जावरील व्याजाचा दर १८ % वरुन १७ % वर खाली आणलेला आहे. जम्मू, काश्मिर, सिक्के, हिमाचलप्रदेशमधील उद्योगांना ५ वर्षासाठी संपूर्ण करमाफी देण्यात आलेली आहे.

देशातील कुठल्याही भागातील ऊर्जानिर्मिती व प्रक्षेपण प्रकल्पांना ५ वर्षाच्या कालावधीकरिता संपूर्ण कर माफी केलेली आहे. ग्रामीण भागाच्या विकासासाठी ६२ % जास्त तरतूद केलेली आहे. त्याचप्रमाणे शिक्षण, आरोग्य व इतर समाज–उपयोगी क्षेत्रासाठी मोठ्या प्रमाणात तरतूद केलेली आहे. भांडवली वस्तूवरील करात मोठ्या प्रमाणात सूट दिलेली आहे. या सर्व गोष्टींच्या आधारे चालू वर्षाच्या अंदाजपत्रकावर एक दृष्टीक्षेप टाकण्याची आवश्यकता भासते.

**सर्वसामान्यांना दिलासा देणारा अर्थसंकल्प :–**

केंद्रीय अर्थमंत्र्यांनी आपल्या अर्थसंकल्पात अप्रत्यक्ष करात ४,५२२ कोटी रु. च्या सवलती जाहीर केलेल्या आहेत. यामध्ये चहा, बिस्कीटे, पादत्राणे, कापड, काड्यापेटी, पंखे, साबण वगैरे वस्तूंचा समावेश आहे. अर्थसंकल्प सादर केल्यानंतर काही दिवसातच अशा वस्तूंच्या किमती कमी झालेल्या दिसतात. पण प्रामुख्याने मोटार गाड्यांच्या किमती १२ ००० ते ३५,००० रु. च्या दरम्यान कमी झालेल्या आहेत. मोटार गाड्यावरील कर कपात करताना अर्थमंत्र्यांनी

सामान्यांचा विचार केलेला आहे, असे वाटत नाही. सौंदर्य प्रसाधने असोत अगर मोटारगाड्या असोत ह्या चैनीच्या वस्तू आहेत. आपल्या देशातील एकूण लोकसंख्येपैकी ४० % लोक दारिद्रयरेषेखाली जीवन जगत आहेत; ह्या कटू सत्याचा अर्थमंत्र्यांना विसर पडलेला आहे असे वाटते. दारिद्रयरेषेखाली जीवन जगणाऱ्या लोकांना मोटार गाड्यांपेक्षा अन्नधान्य व इतर जीवनावश्यक वस्तूंस प्राधान्य द्यावे लागते. त्यांचे जीवनमान उंचावण्याकरीता सार्वजनिक वितरण पद्धतीद्वारे विक्री करण्यात येणाऱ्या गहू, साखर, तांदूळ वगैरे वस्तूंच्या किंमती कमी करणे आवश्यक होते. पण अशा प्रकारची तरतूद अर्थसंकल्पात केलेली नसल्याने चालूवर्षाचे अंदाजपत्रक दारिद्रयनिर्मूलन करण्यास उपयुक्त ठरेल, असे म्हणता येणार नाही. अंदाजपत्रकामध्ये चहावरील कर कमी केल्यामुळे चहा स्वस्त होईल, पण सरकारने अंदाजपत्रक सादर करण्यापूर्वीच साखर महाग केल्यामुळे चहा कडू लागणारच; हे सांगायला नको. या सर्वांचा रोष आपणाला अंदाजपत्रकावरच ठेवून चालणार नाही, कारण यापूर्वीच सर्व वहातूक दरामध्ये वाढ झालेली आहे.

अर्थमंत्र्यांनी केलेल्या कर कपातीमध्ये विशेषत: पंखे, टि. व्ही. संच, मोटार गाड्या वगैरेचा फायदा, लाभ हा गरीबांना होणार नाही. आणि मध्यम वर्गीयांना सुध्दा त्यांची आर्थिक क्षमता कमी असल्यामुळे त्यांचा लाभ होईल असे वाटत नाही. तथापि, हे अंदाजपत्रक अनुपयुक्त आणि निराशजनक आहे असा अर्थ काढणे चुकीचे ठरेल.

अर्थमंत्र्यांनी बँकांच्या व्याजदरात कपात, भांडवली वस्तूवरील करात सूट, ऊर्जा निर्मिती व प्रक्षेपण प्रकल्पाना कर माफी, काही मागास प्रदेशातील उद्योगांना संपूर्ण कर माफी या सारख्या उपायांचा अवलंब केल्यामुळे समतोल प्रादेशीक विकासाबरोबरच भांडवली वस्तूंचे उत्पादन स्वस्त होईल. याचा अर्थ असा की, भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये अल्पावधीतच भांडवली वस्तूंच्या किंमती कमी होतील. त्याचबरोबर सरकारने अवलंबीलेल्या मुक्त व्यापार धोरणांची यास पुष्टी मिळेल. परिणामत: उपभोग्य वस्तूंचे उत्पादन सुध्दा कालांतराने कमी खर्चात होईल आणि अंतीम परिणाम म्हणून सर्वसामान्य माणसांचे राहणीमान निश्चितच उंचावेल.

अन्नावरील सबसीडीत वाढ, ग्रामीण विभाग विकासावरील ६२ % जादा तरतूद, शिक्षण, आरोग्य आणि इतर सुविधांच्या विकासासाठी जास्त तरतूद, जवाहर रोजगार योजनेस अधिक प्राधान्य या सर्वांचा परिणाम म्हणून देशात विशेषत: ग्रामीण भागामध्ये रोजगार निर्मिती होईल. त्यामुळे गरीबांना किमान गरजा भागविणे शक्य होईल. या सर्व गोष्टींच्या बाबतीत एक अर्थशास्त्रज्ञ म्हणून अर्थमंत्र्यांची दूरदृष्टी दिसून येते. त्यामुळे त्यांनी सादर केलेल्या १९९३ – ९४ चा अर्थ संकल्प सर्वसामान्यांना दिलासा देणारा आहे.

**उत्पादन व निर्यात वाढीस प्रोत्साहन :–**

अर्थमंत्र्यांनी देशांतर्गत आर्थिक व्यवहार आणि त्यांचे लोकांना मिळणारे लाभ या दृष्टीबरोबरच उत्पादन वाढ, आयात घट व निर्यात प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीकोनातून अर्थसंकल्पामध्ये अनेक तरतूदी केलेल्या आहेत. ऊर्जा निर्मिती आणि प्रक्षेपण प्रकल्पांना दिलेल्या कर सवलती, भांडवली करात सूट, ग्रामीण विकासासाठी जादा तरतूद, व्याज दरात कपात, या सारख्या तरतूदीमुळे देशातील गुंतवणूक वाढेल. उत्पादनात वाढ होईल. परिणामत: रोजगारात वाढ. झाल्याने लोकांचे राहणीमान उंचावेल. अशी नि:संकोचपणे आशा बाळगता येईल. ऊर्जा निर्मितीवर सरकारने ५ वर्षांच्या कालावधीकरिता संपूर्णपणे कर माफी दिल्यामुळे उर्जा उत्पादन वाढेल. आणि अंतीम परिणाम म्हणून कालांतराने भांडवली व उपभोग्य वस्तूंच्या किंमती कमी होतील.

देशाच्या निर्यातीला चालना देवून मोठ्या प्रमाणात विदेशी चलन प्राप्त करण्यासाठी उद्योगधंदयांना जलद विस्तार अथवा विकास होणे आवश्यक असते. उद्योगधंदयांचा विस्तार अथवा विकास भांडवल निर्मिती म्हणजेच बचतीवर अवलंबून असतो. श्रीमंत राष्ट्रामध्ये बचतीचे प्रमाण राष्ट्रीय उत्पन्नाच्या २५ ते ४०% असते. त्यामुळे बचत...... भांडवल संचय ......भांडवल निर्मितीचा दर जास्त असतो.

परिणामत: औद्योगिक विकास साध्य करता आल्याने निर्यात जास्त आणि विदेशी चलनाचा साठा वाढतो. त्यामुळे अशा राष्ट्रांना उदा. अमेरिका सारख्या राष्ट्राना आंतरराष्ट्रीय देणी नसतात. म्हणजेच त्यांच्या व्यवहार तोलात समानता असते. पण भारतामध्ये आमच्या बचतीचा दर १५ % पेक्षाही कमी आहे. बचतीच्या प्रमाणात वाढ होईल या दृष्टीकोनातून अर्थसंकल्पात खास तरतूदी केलेल्या दिसून येत नाहीत. ठेवीवरील व्याजदर वाढविण्याऐवजी कमी केलेला आहे. प्राप्ती करामध्ये फारशी सूट दिलेली नाही. त्यामुळे बचतीच्या प्रमाणात वाढ होणार नाही. या सर्व गोष्टींचा निर्यातीवर विपरित परिणाम होईल असे म्हणणे समर्पक ठरणार नाही. कारण ठेवीवरील व्याजदर कमी केल्यामुळे अशा ठेवी भांडवली गुंतवणूकीकडे आकर्षित होणार आहेत व साहजीकच उत्पादनात वाढ व नंतर निर्यातीत वाढ घडून येणे शक्य आहे.

तथापि, अर्थमंत्र्यांनी रुपया पूर्ण परिवर्तनीय केल्यामुळे गेल्या काही दिवसात भारतीय रुपयाचे मूल्य आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत वाढलेले आहे. दुसऱ्या शब्दात असे म्हणता येईल की, प्रथमच रुपया परिवर्तनाचा परिणाम म्हणून अमेरिकन डॉलरचा दर १ रु. २५ पैं. ने घसरला आहे. दिनांक २६ फेब्रुवारी पर्यंत अमेरिका आणि भारत या दोन देशातील विनिमय दर १ डॉलर बरोबर ३३ रु. ११ पैं. होता. अंदाजपत्रक सादर केल्यानंतर म्हणजे दिनांक ५ मार्च ला हा दर घसरुन ३१ रु. ८६ पैं. वर आलेला आहे. म्हणजे याचाच अर्थ असा की, आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत भारतीय रुपयाचे मूल्य वाढलेले आहे. अर्थमंत्र्यांनी रुपयाचे पूर्ण परिवर्तन केल्यामुळे काही दिवसातच आयातीच्या प्रमाणात घट झालेली आहे. त्याचबरोबर निर्यातीत वाढ झालेली आहे. कालांतराने आंतरराष्ट्रीय व्यापारापासून आपणास मोठ्या प्रमाणात परकीय चलन प्राप्त होईल. त्या आधारे विदेशी राष्ट्राचे (आंतरराष्ट्रीय नाणेनिधी, जागतिक बँक व इतर राष्ट्रे) देणे भागविता येईल. दुसऱ्या शब्दात असे म्हणू की, भारताच्या व्यवहार तोलात आपणास समानता प्रस्थापित करता येईल. ही प्रक्रीया पूर्ण होण्यासाठी जास्तीतजास्त चार वर्षांचा कालावधी लागेल असे मला वाटते. त्यानंतर देशाला विदेशी राष्ट्रांचे देणे असणार नाही. देशात उपलब्ध असलेली आणि निर्यात माध्यमाने उपलब्ध होणारी सर्व साधनसामग्री दारिद्र्य निर्मुलनास, आर्थिक व सामाजिक न्याय या सारख्या प्रमुख उद्दीष्टांच्या पुर्ततेसाठी वापरता येईल. म्हणजेच अर्थसंकल्पाचे दूरगामी परिणाम दिसून येतील.

दिर्घकालावधीचा विचार करता, अर्थसंकल्प स्वागत करण्याजोगा आहे. अशा स्वरुपाच्या अर्थसंकल्पामुळे दारिद्र्य निर्मूलन, आर्थिक विकास, आर्थिक स्थैर्य वगैरे उद्दीष्टचे साध्य होतील, अशी अपेक्षा आहे.

# आजी

**मनोहर चव्हाण**

११ वी कला

सोमवारचा दिवस, संध्याकाळचे सहा वाजले होते. मी शाळेतून घरी परतलो. शाळा गोरेगावला असल्यामुळे मला तिथून जोगेश्वरीला येण्यास फार वेळ लागायचा. गाड्या वगैरे असल्या तरी मी पायीच प्रवास करायचो. घरात पाऊल टाकताच मला एकदम घरामध्ये स्तब्धता जाणवली. नेहमी भावंडानी गजबजलेलं घर कसं मला शांत वाटत होतं. आई भावंडाना शाळेतून घरी घेऊन आली होती. मी समजून चुकलो की, आज काहीतरी प्रकार घडला असावा. आईला न विचारता अगोदर भावंडाना विचारलं परंतु ती काहीच बोलली नाहीत. वडील कामावरुन घरी परतले नव्हते. त्यावेळी मी आईला विचारले, "काय झालं ग आई, आज घर कसं सुनं-सुनं वाटत आहे." त्यावर आई रडवेला चेहरा करुन म्हणाली, "मी आता शाळेसून तुझ्या भावांका हाणीत होतंय, तेव्हा जीजी माझ्या मागसून येवन् म्हणाले, आये जास्त शिक आसा तेव्हा तुमका सगळचांका थयं येऊक होया आणि तिका मालाडाक आणलेला हां." जीजी म्हणजे माझे चुलते (काका), त्यांना आई जीजी म्हणत असे. आईने सांगितलेले बोल मी ऐकताच माझ्या काळजात एकदम धस्स् झालं. एवढं प्रेम करणारी आजी आज अचानक जास्त आजारी पडली हे मला खरंच वाटेना.

रात्रीचे ८.३० वाजले होते. आणि वडील कामावरुन परतून घरी आले. आल्या-आल्या आईने त्यांना घडलेली परिस्थिती सांगितली. आणि त्यासरशी ती म्हणाली, 'आतेक मालाडाक घेऊन इलेले हंत तेव्हा आमका थयं जावकच व्हया.' माझी आजी ही आईची सासू आणि आतेही लागत होती. तिचं आणि आईचं माहेर एकच होतं. त्यामुळे आमची आई तिला आतेच म्हणत असे. आपापसात त्यांचं हे नातं जोडलेलं होतं. एवढी ही मायेची माऊली आमच्यावर मनापासून माया करणारी आणि सर्वांच्यापेक्षा माझ्यावर आपला जास्त जीव टाकणारी. माझ्या आजीला पहाण्यासाठी माझा जीव एकदम कासावीस झाला होता. मी क्षणाक्षणाला व्याकूळ होत होतो. माझ्या वडीलांनी ताबडतोब आम्हाला घेतलं व टॅक्सी केली. घरातून बाहेर पडेपर्यंत ९.३० वाजले होते आणि मालाड या भागात जाण्यासाठी अर्धातास लागणार होता व तिथून पंधरा मिनिटे रेल्वेस्टेशनवरुन चालत जाण्यास लागत होती. आम्ही बरोबर तेथे सव्वादहा वाजता चुलत्यांच्या घरी पोहोचलो. घराजवळ येताच मला कोणाच्यातरी कन्हण्याचा आवाज ऐकू आला. त्यासरशी मी एकदम धाव घेतली. घरामध्ये आते, चुलते व चुलत्या रडत असलेल्या मला दिसल्या. आम्ही जाण्याअगोदर आतुरतेने वाट पहाणाऱ्या माझ्या आजीची प्राणज्योत मालवली होती. आईवडीलांनी घरात पाऊल टाकताच एकदम त्यांच्या काळजाचं पाणी पाणी झालं. आईने जाऊन त्या मृत देहाला मिठीच मारली. कितीही झाले तरी ते रक्ताचे नाते होते. वडिलांची तर शुद्धही गेली होती. थोड्यावेळाने त्यांना शुद्ध आली. आई रडतच आपली स्थिती त्या मृत देहाजवळ व्यथित करत होती, "आते तू आमका न सांगता, न बोलता कशी सोडून गेलस, तुझ्या माणसांका तू कशी इसारलंस. काय आम्ही तुझे कोण नाय होतावं?' अशाप्रकारचे प्रश्न ती त्या मृत देहला विचारत होती. आत्मा जरी निघून गेला तरी धड मात्र तजेलदार व टवटवीत पूर्वीप्रमाणेच दिसत होते. आम्हाला जणू काही ती अजून आमच्यासमोर जिवंत बसली आहे असेच वाटत होते.

तरीसुद्धा मी स्वतःला सावरलं होतं. मन अधिकाधिक कठोर बनत चाललं आणि एकदम भूतकाळात जाऊन शिरलं. माझी आजी ही एक परमेश्वराचा अवतार होती. माझ्यावर तिचा फारच जीव होता. ती ज्यावेळी गावी होती त्यावेळी मला सोडून तीं कुठेही जात नव्हती आणि मीही तिच्यावाचून राहू शकत नसे. प्रत्येकवेळी ती मला मनापासून प्रेम करीत असे आणि ज्ञानाचे धडे ती आपल्या भाषेत मला सांगत असे. कोणतंही काम करण्याअगोदर मी तिचा सल्ला घेतल्यावाचून रहात नसे. लहानपणी आई मुंबईला गेली असली तरी मला तिचे काही न वाटता मी आजीजवळ बिनधास्त रहात असे. मला भात भरविताना, रात्री झोपविताना ती रामकृष्णाच्या गोष्टी सांगून व अंगाई गीते गाऊन माझे मन जिंकून घेत असे. तिचे एक गीत मला फार आवडायचे ते म्हणजे, ' माझे सगुण गुणाचे बाळ ' हे गीत ती मला दररोज व इतरही म्हणून दाखवायची आणि त्याच्याबरोबर इतर भक्तिगीते, अंगाई गीते, वेगवेगळ्या कथा, ग्रंथ मला म्हणून दाखवायची. तिचे शिक्षण हे तिसरीपर्यंत जरी झाले असले तरी तिचे ज्ञान सर्वांच्या वरचे वाटायचे. तिचे माहेर कुणकेश्वरला असल्यामुळे बालपण माशांच्या सहवासातच गेले.

कुणीतरी बोलविले की, ' चल गे आये आज आमच्याकडे फुगडे घालूचे हत, तेव्हा तू ये,' असे म्हणून तिला घेऊन जात. तिची फुगड्यांधील मोठमोठी गीतेही पाठ होती. तसेच कुणाकडे बारसा असला, लग्न असलं तर पाळणी व लग्नातील गीतेही तिला तोंडपाठ असल्यामुळे कुणीही आमंत्रण देण्यास तिला विसरत नसत. मी दुसरीत असतानाची गोष्ट, एका मुलाने मला वर्गात मारले त्यावेळी मी सकाळी साडेदहाला शाळा सुटल्यावर घरी आलो व रागाने गाल फुगवून बसलो होतो. कुणाशी बोलत नव्हतो. तेव्हा आजीच म्हणाली 'कोणी माझ्या बाबाचा काय केल्यान, थांब हा बघतय' हो त्येचा,' असे म्हणताच मी तिला सर्व परिस्थिती सांगितली. त्यावेळी ती दुपारी शाळेत माझ्याबरोबर आली, आणि बाईंसमोर सर्वांना बजाऊन म्हणाली, 'जर कोणी माझ्या नातवाक मारीत त्येची माझ्याशीं गाठ हा, याद राखा ! माझो नातू नवसाचो हा, तो अश्रू हा ! ' असे सांगितल्यावर ती घरी परतली. तिचे बोलणे कठोर व ठेकेदारपणाचे असायचे परंतु हृदय मात्र हळवे होते. कोणालाही मदत करण्यास ती मागेपुढे पहात नसे. तिच्या बोलण्याने शाळेतील मुलेच काय पण बाईही मला केव्हा हात लावीत नसत. ज्यावेळी ती माहेरी जाण्यास निघायची म्हणजे माझ्या आजोळी, व पंजोळही तिथेच असल्यामुळे ती मला घेऊन जायची. परंतु घेऊन जातेवेळी मास्तरांना सांगावयास ती कधीच विसरत नसे. आमचे मास्तर (हेडमास्तर) हे आमच्या घराजवळूनच शाळेत जात असल्यामुळे ती त्यांची वाटेतच भेट घेऊन सांगायची, 'मास्तरांनो, आज माझो नातू मी त्येका आजवळाक (कुणकेश्वरला) घेऊन जाणार हयं तेव्हा तो दोन दिवस शाळेत येवचो नाय.' रविवारी सुट्टी असल्यामुळे ती मला शनिवारीच घेऊन जायची. त्यावेळी शाळा ही दोन्ही वेळी असल्यामुळे शनिवारी मात्र ती सकाळचीच असायची. हे सर्व पाहून ती मला घेऊन जायची.

अशा प्रकारची माझ्यावर जिवापाड प्रेम करणारी आजी ज्यावेळी मुंबईला गेली त्यावेळी तिची आणि माझी भेट शेवटचीच घडली. आणि मी ज्यावेळी मुंबईला गेलो त्यावेळी मला माझे वडील तिला भेटण्यासाठी घेऊन मालाडला माझ्या चुलत्याजवळ गेले, परंतु ती अंधेरीला राहायला गेल्यामुळे आम्हाला काही भेटली नाही. आणि ज्यावेळी तिला समजले की, आम्ही भेटावयास तिला मालाडला गेलो होतो त्यावेळी तिने माझ्या चुलत्याला सांगून पुन्हा मालाडला आली. मला पाहण्यासाठी तिचे डोळे अजूनपर्यंत तेवत होते. घरी येताच (मालाडला) तिच्यातील अंतरात्मा निघून गेला आणि मला दिसली फक्त तिची स्मृती, तिचे मृत शरीर आणि एकदम माझ्या डोळ्यावरचा भूतकाळ नाहीसा झाला. त्यावेळी डोळ्यातून अश्रूचे थेंब खाली कोसळत असल्याची मला जाणीव झाली. ते अश्रू नव्हते तर त्या तिच्या आठवणी होत्या.

★ ★ ★

# ज्येष्ठ सेनानी अरुणा आसफअली

**रुपाली गोडसे**

१२ वी कला

आंतरराष्ट्रीय सामंजस्यासाठी देण्यात येणाऱ्या जवाहरलाल नेहरु पुरस्कारासाठी १९९१ सालाकरिता ज्येष्ठ स्वातंत्र्यसेनानी आणि सामाजिक कार्यकर्त्या पद्मविभूषण 'अरुणा आसफअली' यांना देण्यात आला. यापुर्वी त्यांना १९६५ चा लेनिन शांती पुरस्कार, १९८७ चा इंदिरा गांधी राष्ट्रीय एकात्मता पुरस्कार, १५ लाख रुपये रोख आणि मानचिन्ह असे पुरस्कार मिळाले आहेत.

बरोबर पन्नास वर्षापूर्वी ९ ऑगस्ट रोजी मुंबईतील गोवालिया टँकवर तिरंगा झेंडा फडकवण्याचे धाडस श्रीमती अरुणा आसफअली यांनी केले. अरुणाजी आज ८२ वर्षांच्या आहेत. कापसासारखे पांढरेशुभ्र केस, सुरकुतलेला तरीही मूळच्या देखणेपणाच्या खुणा मिरवणारा चेहरा. पांढरीच खादीची साडी आणि ब्लाऊज. शरीर थकलेय पण मन अजूनही कणखर आहे. जीवन पूर्णतया त्या जगल्या आहेत. जीवनातले अनेक उतार - चढाव अत्यंत बारकाईने व जवळून बघितल्यानतर अनेक आठवणी आता अंधुक अन् पुसटही होत चालल्या आहेत. तरीही देशातील राजकीय आणि सामाजिक घडामोडी व त्यात होत चाललेली घसरण यामुळे अजूनही एकेकाळचे हे बंडखोर मन तडपून उठते.

९ ऑगस्ट १९४२ चा दिवस आणि 'चले जाव' आंदोलन काळातील काही क्षण त्या हळू वेचतात. मध्येच त्यांचे डोळे चमकतात, आवाज धारदार होतो. मध्येच तुटकही बोलतात. अरुणाजी सांगतात, 'त्या महान प्रसंगात (९ ऑगस्ट ४२) मीही सहभागी होते. देशासाठी कार्य करण्याच्या भावनेने आम्ही भारलो होतो. पण त्याचे बारीकसारीक तपशील मला आता आठवत नाहीत. काही क्षण मात्र एकदम चमकून उठतात. मला ९ ऑगस्टचा तो दिवस आठवतोय. गोवालिया टँकवर मी तिरंगा फडकावला. पोलिसांनी नंतर तेथे जमावावर अश्रूधूर सोडला. आम्ही आसपास आसरा घेतला आणि तेथून गेलो ते गांधीजींना भेटायला. त्यांचे सचिव प्यारेलाल शहा यांनी गांधीजींचा संदेश आम्हाला सांगितला. 'करो या मरो, ब्रिटीश भारत छोडो' हा संदेश घेऊन आम्ही शहरभर फिरलो. नंतर भूमिगत चळवळ संघटित केली.

ही सारी रोमांचकारी चळवळ होती. पण ते सारेच काही मी व्यक्त करु शकत नाही. पुन्हा ते वातावरण मी नाही निर्माण करु शकत. असे नाही करता येत. आम्ही म्हणजे मी, अच्युतराव पटवर्धन, जयप्रकाश नारायण, राम मनोहर लोहिया आदी अनेक जण भूमिगत चळवळीत होतो. त्यामुळे मला त्याबद्दल काही सांगायचे नाही. आम्ही आमचे काम करीत होतो. पण त्याचा ठावठिकाणा आम्ही कुणाला कळू दिला नाही. गांधीजींचा ' करो या मरो ' संदेश जनतेत पसरवीत होतो.'

आता ५० वर्षानंतर पुन्हा एकदा याच दिवशी (९ ऑगस्ट) गोवालिया टँकवर जाताना अरुणाजींच्या मनात कर्तव्याची भावना आहे. उद्विग्नता आहे, उत्सुकता फारशी नाही. त्या म्हणाल्या, ' हे माझे कर्तव्य आहे, आणि मला ते करायचे आहे. मी त्यास नाही म्हणूच शकत नाही.

भारत म्हणजे जीवनातल्या चांगल्या गोष्टी उपभोगायच्या असे मी मानत नाही. पण साऱ्यांना तसे वाटत नाही. आता होतेय काय, की सारे आपल्यात मश्गूल आहेत. मी यापासून दूर राहायचा प्रयत्न केलाय नेहमी लोकांना सांगण्याचा प्रयत्न करते, की आम्ही अशी शपथ घेतली नव्हती. शपथ घेतली ती

ब्रिटिशांना देशातून हुसकावून लावण्याची. त्या वेळच्या तरुणांचे ते ध्येय होते किंवा काय माहीत नाही, पण त्यांच्याकडून तशी अपेक्षा नक्कीच होती. त्यांनी 'चले जाव' आंदोलनात सामील व्हावं. ती एक मोहीम होती.'

★ ★ ★

---

# भूत – एक भ्रम

**समीर जाधव**

द्वितीय वर्ष विज्ञान

खेड्यातच नव्हे अगदी शहरातही माणसाला लहानपणीच भूत भेटते अर्थात कल्पनेतले, आजीच्या बटव्यातील भूतांच्या अमानवी अचाट कृत्यांचे गोष्टीरुप गुणगान न ऐकलेला माणूस विरळाच. आजीकडून नातवाकडे भूत पोहोचवताना किंवा पिढ्यांची वाटचाल करताना ते अधिक समृद्ध झालेले असते. अर्थातच अतिशयोक्तीने !

माणसाला ( मनाला ) ही भूते भेटतात ती ओसाड किंवा पडकी घरे, कोरड्या विहीरी, स्मशान, वटवृक्ष पाणवठा इ. ठिकाणी व त्यांचे प्रकार किती ? समंध, ब्रह्मराक्षस, हडळ, पिशाच्च इ. भूतपरंपरेत खेड्यात झपाटणे, भारणे इ. प्रकार घडतात. तर शहरातही हॉस्पिटल्स्, निर्मनुष्य रस्ते इ. ठिकाणी आढळतात म्हणे ! लोकांच्या मनात भूताविषयी इतकी गाढ श्रद्धा (अंध) असते की तिला लोक चिकटून राहतात. आपल्या पूर्वजांच्या वक्तृत्वावर अधिक विश्वास दर्शवतात. मृत्युनंतर आत्मा भूतशरीर धारण करतो, अतृप्त इच्छा, आशा यामुळे घडते इ. गैरसमज लोकांमध्ये आढळतात.

वास्तवात, अगदी झाडाचे पानसुद्धा विज्ञानाच्या बाहेर हलू शकत नाही. मग अदृश्य, अमानवी शक्ती इत्यादी कल्पना केवळ कल्पनाच ठरु शकतात. दररोज कित्येक बालके जन्मतात, कित्येक मरतात. मरणारा भूत बनत असता तर आज जगात आपल्याला रहायला जागा मिळाली नसती.

आदिमानवाने पाहिलेले अचाट चमत्कार उदा. वादळ, वणवे, मुसळधार पाऊस, निसर्गाचे बदलते रुप त्याच्या आकलनापलिकडील या सर्व गोष्टी. अर्थात यातूनच झाला तो भूताचा जन्म! आणि आजही तेच भूत लोकांच्या मनात थैमान घालते.

खेड्यात काही माणसे प्रसिद्धी मिळावी म्हणून भूताचा दबदबा निर्माण करतात. यातून त्यांना स्वहीतच साधायचे असते. किंवा लोकांच्या दुर्बल मनावर राज्यही करायचे असेल. या सर्व भूतांच्या गोष्टीच्या मुळाशी गेले असता आपल्याला आढळते की भूत म्हणजे दुसरे तिसरे काही नसून केवळ मानसिक आजार आहे. विज्ञानाने सिद्ध न झालेल्या या गोष्टींवर अज्ञानामुळे भीती, मनोविकृत्ती इत्यादी अनेक कारणांनी विश्वास बसतो. दैनंदिन व्यवहारात मनुष्य अनेक इच्छा, आकांक्षा, व्यथा, दुःख या मायाजालाच्या कचाट्यात सापडलेला असतो. भांडणे, अपमान, राग, द्वेष, अपयश, अपेक्षाभंग इ. अनेक कारणे माणसाच्या मनावर आघात करतात. व्यवहारात या सर्व गोष्टींना मूठमाती द्यावी लागते. म्हणजेच अंतर्मन, बहीर्मन संतुलन. हे संतुलन वरीलपैकी काही कारणांनी बिघडल्यास माणूस असंबद्ध वर्तन करतो. लोक म्हणतात भूताने

झपाटले. यात स्त्रियांचे प्रमाण जास्त आहे. कारण भारतीय संस्कृतीत स्त्रीचे दुय्यम स्थान, कौटुंबिक, सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक तणाव इ. त्यामागील कारणे असू शकतात किंवा व्यसनी नवरा,

अपत्यहीन जीवन, सासू-नवऱ्याचा जाच, आर्थिक शारीरिक आघात इ. कौटुंबिक कारणे असू शकतात. मानसिक आघात, हळवे मन इ. मानसिक आजाराची कारणे असू शकतात. भूताने झपाटलेल्या माणसाची सारासार विवेकबुद्धी नष्ट होते व असंबद्ध वर्तन हे त्याचे लक्षण ठरते. नैसर्गिक अवस्थेत बराच काळ बसणे, शरीर श्रमाची कामे करणे इ. कृती त्या व्यक्तीकडून घडतात. मनाच्या बिघडलेल्या संतुलनाचे कारण हुडकणे व दुरुस्त करणे भूतबाधा झालेल्या व्यक्तीस मांत्रिकाकडे नेणे चुकीचे ठरते. त्याला गरज असते मानसिक संतुलनाची, मनाच्या नियंत्रणाची. परंपरागत अशास्त्रीय रस्त्यापेक्षा शास्त्रीय चिकित्सक मार्ग योग्य नव्हे काय ? भूताविषयी पसरलेला, वाढलेला भ्रम योग्य मार्गांनी कमी करणे किंवा नष्ट करणे ही काळाची गरज ठरते. यात सिंहाचा वाटा ठरतो तो संस्कृती प्रचाराचा ! कृतीसह केलेला प्रचार लोकांच्या मनावर परिणाम करुन जातो. भूतबाधा होण्याविषयीची कारणे, भूत म्हणजे केवळ कल्पना मानवाच्या मनोव्यापारातून निघालेली, परंपरेचा परिणाम, अतिशयोक्ती इ. कारणे माणसाच्या मनावर बिंबविणे. अंधश्रद्धा निर्मूलन समितीसारखी खेडोपाडी तेथील उत्सुक, सुसंस्कृत तरुणांची चळवळ उभी करणे, स्वानुभव कथन करणे, भूतबाधा झालेल्या स्थळांना भेटी देणे, तेथे रात्रीचे वास्तव्य करणे. तेथे (भूत–स्थळ) आवाज वगैरे येत असतील तर ते विज्ञान निकषावर घासून पहावेत व लोकांच्या निदर्शनास आणावे. भूत नावाची अंधश्रद्धा, त्याचे दुष्परिणाम इ. विषयावर जाहीर व्याख्याने ठेवावीत. अनिसचे आव्हान जसे खात्रीयुक्त आहे याचा अर्थ निघतो की भूत नाहीच अशी खात्री लोकांवर खोल परिणाम करते. अशी छोटीमोठी बक्षिसे कार्यकर्त्यांनी लावावीत.

मांत्रिक, सिद्धमांत्रिक, जादूटोणा करणारे कसे ढोंगी असतात हे सामान्य लोकांच्या निदर्शनास आणावे. अमावास्येची दाटलेली संध्याकाळ व भूतांचा काही संबंध नसतो हे लोकांना पटवावे. अमावास्या व स्मशान यांची जी सांगड घातली जाते त्यावर प्रकाश टाकावा. मानसिक कारणांची सत्यता पटवणे, लोकांना विश्वासात घेणे, विज्ञानाची अचाट प्रगती, पाश्चात्य जगातील आधुनिकीकरण यांच्याशी तुलना करता आपले मागास विचार, मार्गहीन, दिशाहीन ठरतात, प्रगतितील अडसर ठरतात. मानसिक विकार, स्वप्ने मनोव्यापार यामुळे भूते कशी निर्माण होतात. मन स्वच्छ ठेवणे, आनंदी जीवन, कलह, भांडण इत्यादीपासून दूर रहाणे यातच भूतांचा नाश संभवतो.

महाविद्यालयीन तरुण, माध्यमिक शाळामधील विद्यार्थी या सर्वांची मने ही स्वप्नाळू, काही अंशी श्रद्धावादी, दिशाहीन असतात. त्यांच्या हृदयात योग्य विचारांची बीजे पेरणे, अंधश्रद्धा, भूते यांचा विनाश करणे म्हणजे तरुण पिढी अंधश्रद्धेच्या आहारी जाणार नाही.

★ ★ ★

# भारतीय राज्यघटनेतील धर्मनिरपेक्षता आणि अयोध्या प्रश्न

**आनंद कदम**

द्वितीय वर्ष कला

एकविसाव्या शतकाला सर्व जग नव्या उमेदीने, इर्षेने सामोरे जात असताना जगातील एक महान सामाजिक लोकशाही व धर्मनिरपेक्षता असलेल्या या भारतात आज धर्माच्या नावावर राजकारण करुन काही दांभिक राजकीय पुढारी सत्तेच्या खुर्चीसाठी आपला देश जातीय दंगलीच्या विळख्यात अडकवू पहात आहेत, आणि त्याचबरोबर भारतीय राज्य घटनेची पायमल्ली करण्याचाही प्रयत्न करीत आहेत.

एकीकडे जातीयतेचा बुरखा पांघरुन 'व्होट बँक' निर्माण करायची आणि दुसरीकडे धर्मनिरपेक्षतेचा आव आणून 'सत्ता स्पर्धा' नावाची एक नवीन चाल खेळायची — आजच्या राजकीय पुढाऱ्यांची फॅशनच झाली आहे, असे मला खेदाने नमूद करावे लागेल. कारण स्वातंत्र्य, समता व विश्व बंधुत्व या तीन तत्त्वांवर चालणारी ही भारतीय धर्मनिरपेक्ष लोकशाही आहे. याच देशात लोक अन्तर्गत बंडाळी माजवू पहात आहेत. मग हा आपला देश टिको अगर न टिको याची यत्किंचितही काळजी नसलेले हे नेते आज मोकाट सुटले आहेत, असेच म्हणावे लागेल.

ज्या महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या देशाची राज्य घटना तयार करण्यास परिश्रम घेऊन आपल्या देशाला साजेल, शोभेल अशी जगातील अति-उच्च दर्जाची लोकशाही राज्यघटना तयार केली. ती राज्यघटना २६ जानेवारी १९५० रोजी देशाच्या स्वाधीन केली त्यावेळी त्यांनी संसदेच्या सभागृहातील आपल्या भाषणात भविष्यकाळातील एका दुःखद घटनेवर उघड उघड भाष्य केले होते, ते म्हणजे "आज मी माझ्या देशाला समता, स्वातंत्र्य व विश्वबंधुत्व यांना बांधील असलेली व जगातील धर्मनिरपेक्षवादाला चालना देणारी राज्य घटना सुपुर्द करीत आहे, पण मला राहुन राहुन एक शंका वाटते आहे की, या देशात लोकशाही टीकेल की नाही?" आणि आजची एकूण परिस्थिती पाहता आपल्याला अशी भीती वाटू लागली आहे की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी वर्तविलेली शंका आज प्रत्यक्षात आम्हाला उघड्या डोळ्यांनी पहावी लागणार की काय?

आजची देशातील एकंदर परिस्थिती पाहता ती भारतातील धर्मनिरपेक्षवादाला तडा जाण्यासारखीच आहे. कारण ६ डिसेंबर १९९२ रोजी अयोध्येत प्रसंग घडला, नव्हे घडवला गेला त्याचे एक ताजे उदाहरण देता येईल. अयोध्या प्रश्नाचे देशात अवडंबन माजवून देश जातीय वादाच्या छायेत अडकविला गेला, आणि त्याचे पर्यावसान देशात जातीय दंगली उसळल्या गेल्या. अनेक घरे, सुखी संसार आणि भावी स्वप्ने रंगविणारी बालमने या सर्व प्रकाराने उध्वस्त झाली, आणि मी कोण ? या प्रश्नाचे उत्तर दंगलग्रस्तांना शोधावयास भाग पाडले. एकाच ठिकाणी राहून, एकाच कप बशीत चहा पिणारे हिंदू-मुस्लिम आज आपापल्यातील क्रूर सुप्त भावनांना चेतवून एकमेकांच्याकडे अजातशत्रूप्रमाणे पहात आहेत हे कशाचे प्रतीक आहे ? अयोध्या प्रश्नाचेच ना ?

६ डिसेंबर १९९२ म्हणजे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा ३६ वा महापरिनिर्वाण दिन भारतमातेच्या एका महान सुपुत्राची पुण्यतिथी. कोट्यावधी जनता जगाच्या कानाकोपऱ्यातून मुंबईच्या दादर येथील चैत्यभूमीवर आपल्या महान लाडक्या नेत्याला अभिवादन करण्यास जमलेली

असताना या जनतेच्या भावनेचा विचार न करता त्याच दिवशी हा अयोध्या प्रश्न भडकवून भारतीय राज्यघटनेचा अपमान करण्याचा प्रयत्न करण्यात आला. ज्या महामानवाने आपल्या अथांग बुद्धीच्या सामर्थ्यावर या देशाची राज्यघटना तयार केली, त्याच महामानवाच्या महापरिनिर्वाण दिनादिवशी अयोध्या प्रश्न उकरुन काढून या राजकीय व जातीय पुढाऱ्यांनी भारतीय राज्यघटनेच्या जन्मदात्याचा अपमान करण्याचाही प्रयत्न केला असे म्हणावे लागेल.

या राजकीय व जातीय पुढाऱ्यांनी जातीय असंतोष वाढवून काय साधले ? हे पाहता असे दिसून येईल की, दोन जातीतील शस्त्रास्त्र साठा किती आहे. जाती–जातीतील उच्च–निच्चता काढून एकमेकांवर अमानुष अत्याचार, आपल्या मनातील जातीयतेची कीड अजून मेलेली नाही हे जगाला दाखवून दिले आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे १९५० पासून १९९२ पर्यंत घटनेने एकसंघ ठेवलेल्या भारताच्या भविष्यात होणाऱ्या फाळणीची तरतूद करुन ठेवली. भविष्यकाळात अमेरिकेसारख्या बलाढ्य सत्तेला सामोरे जाणाऱ्या या एकसंघ भारतात अजूनही प्रतिगामी प्रवृत्ती डोके वर काढू पहात आहेत याला आजच पायबंद घातल्याशिवाय दुसरा पर्याय नाही.

जिथे–जिथे दंगली उसळून अन्याय, अत्याचार, जाळपोळ, लुटालूट व हाणामाऱ्या झाल्या तिथे आपले कर्मठ प्रवृत्तीचे राजकीय व जात्यंध पुढारी दंगलग्रस्तांना सहानुभूती देण्यासाठी चौकाचौकातून फिरले हे कशाचे प्रतीक आहे, हे आपण सर्वजण ओळखूनच आहोत. काही काही पुढाऱ्यांनी मनात असे जाळे विणले होते की, अयोध्या प्रश्नानंतर लवकरच मध्यावधी निवडणूका होतील व आपल्याला संसदेत निर्विवाद बहुमत मिळून आपण दिल्लीत बसून संपूर्ण देशावर राज्य करु. पण आजची एकूण परिस्थिती पाहता असे दिसून येईल की, हळूहळू त्या जाळ्याचा एक एक धागा आज विरुन होत चालला आहे. जातीय वादाचे राजकारण करणाऱ्या पुढाऱ्यांची सर्व स्वप्ने धुळीस मिळाली आहेत. भारतातील गोरगरीब जनता आता शहाणी झाली आहे. त्या जनतेला आता कळून चुकले आहे की, धर्माच्या नावावर एखाद्या गोष्टीचे राजकीय भांडवल करु पाहणारे हे लोक गरीब जनतेचा विचार न करता आपला स्वार्थच साधत आहेत.

देशातील काही राज्यात तेथील सत्ताधारी पक्षांनी व इतर पक्षांनी दंगलग्रस्तांना अनेक प्रकारची मदत केली. काही दंगल ग्रस्तांचे तर पुनर्वसन केले गेले. दंगलीत बळी पडलेल्या व जखमी झालेल्यांना आर्थिक मदत पुरविण्यात आली. यावर मी असे म्हणेन, ही आर्थिक मदत नसून पुढील निवडणूकीत होणाऱ्या मतदानाचे पैसे अगोदरच वाटून ठेवलेले आहेत. 'इकडे आड तिकडे विहीर' झालेल्या दंगलग्रस्त जनतेने याचा पुरेपूर विचार केलेला दिसून येत नाही. ही आर्थिक व इतर प्रकारची मदत घेवून आपण पूर्णपणे यांना मते देण्यासाठीच नकळत बांधील झालो आहोत. म्हणजे आधुनिक जगातील हे मते मिळवण्याचे 'आधुनिक माध्यम' म्हणावे लागेल काय ?

ज्यांचे नातेवाईक अयोध्या प्रश्नाने निर्माण झालेल्या दंगलीत बळी पडले, ज्यांच्यावर अमानुष अन्याय, अत्याचार झाले त्यांची या राजकीय व जातीय पुढाऱ्यांनी किंमत केली असेच म्हणावे लागेल. कारण दंगलीत जर एक माणूस मरण पावला तर कौटुंबिक नातेवाईकांना सरकार २५ ते ३० हजार रुपये देत होते. यावरुन असे दिसून येते की, एका माणसाची जगाच्या बाजारात सर्वसाधारण पैशाच्या स्वरुपात किंमत २५ ते ३० हजार आहे. असे इथे नमूद करावेसे वाटते. दंगलग्रस्त जनतेची बाजू समजून घेण्याऐवजी, त्यांची परिस्थिती समजावून घेण्याऐवजी त्या दंगलग्रस्त जनतेची पैशाचे व इतर मदतीचे आमिष दाखवून घोर दिशाभूल केली आहे आणि भविष्यकालीन घडामोडींची इथे नांदी साधली गेली आहे. अजून 'भारताची दुसरी फाळणी' या नाटकाचा प्रवेश सुरु होण्यास अवकाश आहे.

देश स्वतंत्र होऊन अखंड रहावा, देशात जातीय सलोखा नांदावा, देश आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक व राजकीय दृष्टीकोनातून मजबूत रहावा यासाठी भारतीय स्वातंत्र्यवीरांनी, देशभक्तांनी, सत्याग्रहींनी भारत स्वतंत्र होण्याअगोदर व नंतरही आपले प्राण

गमावले. आपले संसार, बायकापोरे देशोधडीला लावली, हे त्यांनी का केले ? या प्रश्नाचे उत्तर भारत स्वतंत्र झाल्यापासून आपल्याला मिळावयास पाहिजे होते, पण आज तर या देशात उलटीच परिस्थिती आहे. देश आज विचारप्रणालीच्या वेगळ्या दृष्टीकोनातून १ ते २ हजार वर्षे जगाच्या मानाने मागेच आहे. देश अन्तर्गत एकात्मिकदृष्ट्या खिळखिळा होत चालला आहे. पंजाब प्रश्न, काश्मीर प्रश्न, नागालँड प्रश्न, आसाम प्रश्न, तामीळ प्रश्न, बोडो आंदोलन, तिन-बिघा प्रांत प्रश्न, महाराष्ट्र व कर्नाटक सीमाप्रश्न व मराठवाडा विद्यापीठाचा नामांतराचा प्रश्न या प्रश्नांनी आज देश फार गांजून गेलेला असताना वरील सर्व प्रश्नांची उत्तरे एकदम मिळणार नाहीत हे माहीत असताना व देश आज कठिण परिस्थितीतून जात असताना काही राजकीय व जातीय पुढाऱ्यांनी ६ डिसेंबर १९९२ रोजी आणखी एक नवा अयोध्या प्रश्न निर्माण करुन देशाची स्वच्छ प्रतिमा जगात मलीन करण्याचा प्रयत्न केला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर आज हयात असते तर त्यांना हे सर्व दृश्य पाहून अतिव दुःख झाले असते. की, आपण आपल्या देशासाठी काय केले आणि आपण उघड्या डोळ्यांनी काय पहात आहोत. जगातील सर्वात मोठी आणि अर्थपूर्ण लोकशाही या भारतीय उपखंडावर विसावली असून जगातील प्रत्येक सामान्यातील सामान्य मनुष्य या सामाजिक व धर्मनिरपेक्ष लोकशाहीकडे मोठ्या आदराने पाहतो आहे आणि ज्या लोकांसाठी ही लोकशाही टिकावी म्हणून प्रचंड राज्य घटना तयार केली पण भारतातील राजकीय व जातीय पुढारी या संधीचा उपभोग घेण्यास अपात्र ठरत आहेत.
आणि आपल्या बरोबर समाजातील दुर्बल, गरीब, दलित, पिढीत जनतेलाही या संधीचा उपभोग घेण्यास अपात्र ठरवत आहेत. या वरुन या पुढाऱ्यांचा नाकर्तेपणा व कुचकामीपणाच दिसून येतो.

यावरुन असे म्हणता येईल की, राष्ट्रातील धर्मनिरपेक्षतेचे महत्त्व न कळलेले हे ढोंगी व कर्मठ प्रवृत्तीचे पुढारी देशात वाढत जाणारी आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक व बेकारीची दरी कमी करण्याऐवजी अयोध्येसारखा प्रश्न उकरुन काढून देशात अधिक आर्थिक, सामाजिक, शैक्षणीक व बेकारीची दरी वाढविण्याचा प्रयत्न केला आणि याचे प्रायश्चित्त या पुढाऱ्यांना न मिळता देशातील सामान्य जनतेला जातीय दंगलीला सामोरे जावून आपले चिमुकले संसार उध्वस्त होताना पहावे लागले.

यावर मी असे म्हणेन की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या जीवापेक्षा प्रिय असलेल्या या भारत देशाला हीच का देणगी दिली ? म्हणून त्यांच्या ३६ व्या महापरिनिर्वाण दिनादिवशी समाज विघातक कृत्ये करुन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अशी श्रद्धांजली वाहण्यात आली का ? स्वतंत्र भारत अखंड, एकसंघ रहावा म्हणून १४ ऑक्टोबर १९५६ रोजी नागपूर येथे दिक्षाभूमीवर हिंदू धर्माचा त्याग करुन याच देशात जन्म घेतलेल्या करुणा, शील व प्रज्ञा, पंचशील व अष्टांग मार्गावर आधारलेल्या बौद्ध धर्माचा स्वीकार केला, आणि जगात एक मोठी धार्मिक क्रांती घडवून आणली. जर त्यांच्या मनात स्वतंत्र भारताची फाळणी करावयाची असती तर, त्यांच्या समोर आपला धर्म स्वीकारावा अशी याचना करणाऱ्या लोकांचा त्यांनी धर्म स्वीकारला असता आणि देश आजच्या पेक्षाही जातीयतेच्या आगीत होरपळत ठेवला असता. पण हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना नको होते, त्यांना त्यांच्या स्वप्नातील जगात सर्वश्रेष्ठ, सामाजिक, धर्मनिरपेक्ष पायावर उभा असलेला व समता, स्वातंत्र्य व विश्वबंधुत्व या तीन तत्त्वावर आधारीत असलेला मानाने मिरवणारा भारत देश पहायचा होता.

पण वरील सर्व गोष्टींचा सारासार विचार करता असे दिसून येईल की, आजचे राजकीय व जातीय पुढारी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विरुद्ध राजकीय प्रणाली चालवून नको ते प्रश्न उपस्थित करुन देशात आणखी बंडाळी माजवू पहात आहेत.
आज देशातील सर्व जनतेला अन्न, वस्त्र, पाणी, शिक्षण, रोजगार व आरोग्य या गोष्टींची आवश्यकता आहे. जर एखादा प्रश्न वरील सर्व गरजांपेक्षा आजच्या परिस्थितीत भारतीय जनतेला आवश्यक वाटतो असे म्हणणे गैर होईल. कारण आज भारतीय

जनतेच्या भावना, वरील सर्व गरजांत गुरफटल्या, आहेत. पण भारतातील राजकीय व जातीय पुढाऱ्यांच्या भावना, सत्तालोभापायी या लोकांनी आखलेली ही सत्तालोभाची चाल भारतातील गरीबातील गरीब, सामान्यातील सामान्य जनता ओळखून आहे. भारतीय जनता आपल्या देशाची दुसरी फाळणी किंवा जातीय दंगली होवू देणार नाही. भारतीय जनता भारतीय राज्य घटनेतील धर्मनिरपेक्षतेचा आधार घेवून पूर्णपणे देशात शांतता ठेवील आणि धर्मनिरपेक्षतेला चालना देईल. कारण प्रत्येक भारतीय नागरिकाचा तो धर्म आहे आणि याच धर्माचे सर्वांनी पालन करावे असे मला वाटते.

★ ★ ★

---

# रक्ताचं नातं !


**स्वाती कर्णिक**

११ वी कला


घड्याळात रात्रीचे ११ चे टोले पडले व ती निरव शांतता भंग करीत एक गाडी हॉस्पीटलच्या दारात थांबली. कोणीतरी पेशंट आला असेल या दृष्टीने नर्स अनिताने बाहेर पाहिले. एका २५–२६ वर्षाच्या तरुणास काही लोक उचलून आणत होते. सर्वांची एकच धावपळ उडाली होती. त्या तरुणास कार चालवीत असताना जबर अॅक्सिडेन्ट झाला होता व त्याच्या मेंदूला मार बसला होता. त्याची शुद्ध हरपली होती. अनिताने ताबडतोब सर्जन डॉक्टरना फोन करुन हॉस्पिटलमध्ये बोलावून घेतले. त्या तरुणाचे ऑपरेशन करण्याचे ठरले. त्याला ऑपरेशन थिएटरमध्ये नेण्यात आले; परंतु त्याला त्यासाठी रक्ताची नितांत जरुरी होती. अनिता ताबडतोब रक्त द्यायला तयार झाली. आणि आश्चर्य म्हणजे अनिताचे रक्त त्याच्या रक्ताशी जुळले. तिला फार आनंद झाला. त्या तरुणाचे मेंदूचे ऑपरेशन करायचे ठरले होते, रक्त मिळताच तेही व्यवस्थित झाले. अनिताला फार आनंद झाला. रोज ती त्याची मनापासून सेवा करु लागली. त्याला सुद्धा तिची एवढी सवय लागली, की ती दिसली नाही की तो बेचैन होई.

एक दिवस अनिताला जरा बरे नसल्यामुळे ती घरी राहिली, तर त्याने अनिताला बोलावण्यास पाठविले. अनिताला त्याच्याकडून हे कळले की, तो एक श्रीमंताचा मुलगा असून त्याचे नांव अमर आहे. 'अमर' हा इंजिनिअर असून त्याच्या वडिलांच्या मालकीचे दोन इलेक्ट्रॉनिकचे कारखाने आहेत. त्याला आई–वडील दोघेही आहेत. बंगला, कार यांसह सर्वकाही. जणू लक्ष्मी त्यांच्या पायाशी हात जोडून आहे. एवढ्या कोट्याधीशाची सेवा करण्याची संधी आपल्याला मिळाली हा केवढा भाग्योदय !

अमरला डिस्चार्ज देण्याचा दिवस जवळ आला. आपण उद्या घरी जाणार. आपले व अनिताचे लागेबांधे येथेच संपणार या विचाराने तो अस्वस्थ झाला.

त्याला आपल्या गतजीवनाचा चित्रपट डोळ्यासमोर दिसू लागला .....

आपण आपल्या आई–वडिल व छोट्या बहिणीबरोबर जत्रेसाठी गेलो होतो. त्यावेळी पाच–सहा वर्षाचा

असेन आणि त्यावेळी त्या जत्रेत आपण आईचा धरलेला हात सुटल्यामुळे हा अजाण बालक जत्रेत हरवला. आई-वडिलांनी बराच शोध घेतला. नंतर आपण रडतच एका हॉटेलात शिरलो. त्या हॉटेल मालकाला दया आली. त्यांनी त्याला आपल्याकडे ठेवले. हॉटेल मालकांची तो हरतऱ्हेची कामं करीत असे. मालकांचाही त्याच्यावर विश्वास बसला.

दिवस जात होते .....

अमर मोठा होत होता. एकदा मालक कामानिमित्त बाहेर गेले होते. त्यांनी काऊंटरवर त्याला बसविले होते, ते इतर नोकरांना पहावले नाही. ते अमरचा नेहमीच पाणउतारा करीत असत. कारण मालक त्याला आपल्या मुलासारखे करीत म्हणून त्यांना ही एक संधीच चालून आली होती. त्यांनी अमरला सांगितले की, मालकांना ॲक्सिडेन्ट् झाला आहे. आम्ही सर्वजण त्यांना पाहून आलो. त्यांची परिस्थिती गंभीर आहे.

मालकांवर अतोनात जीव असलेल्या अमरला ते ऐकून सहन झाले नाही. तो ताबडतोब रस्त्यावर आला. एवढ्यात त्या नोकरांनी ड्रावरमधील पैसे लंपास केले. अमरच्या हे लक्षात आले तेव्हा फार उशीर झाला होता. मालक आल्याबरोबर नोकरांनी त्यांचे कान फुंकले. अमरने परोपरीने त्यांना सांगून पाहिले. पण मालक ऐकून घेण्याच्या मनःस्थितीत नव्हते. ते म्हणाले, तुला आणून मी तुझ्यावर उपकार केले. ते तू अशा रीतीने फेडलेस. असे म्हणून मालकांनी त्याला बेदम मारले. ते नोकर तर अग्नीत तेल ओतून भडकवीत होते.

अमरला तो अपमान फारच झोंबला.

" नशिबाच्या सोंगट्या उलट्या पडल्या की, सारीपाटाचा डाव उधळायला वेळ लागत नाही." तसेच झाले. तो पुन्हा रस्त्यावर आला. जगण्यात अर्थ नाही, अशा स्थितीत तो चालत असतानाच एका गृहस्थाच्या गाडीचा त्याला धक्का लागला. त्यांनी अमरला गाडीत बसवून घरी आणून औषध-उपचार केले. तो शुद्धीवर येताच त्याची प्रेमळ चौकशी केली. या दांपत्यालाही मूलबाळ नव्हते. सर्व ऐश्वर्य असूनही ते फार दुःखी होते ते मुलांसाठी. ते अनाथ आश्रमास भरघोस देणगी देत असत परंतु आत्ता अनायासे आलेल्या या मुलाला देवानेच पाठविले आहे अशा प्रकारे मनात विचार करुन त्यांनी त्याला दत्तकच घेतले. तो आपल्या या मानस आई-वडीलांची मनापासून सेवा करी.

आज जर हे आई-बाप नसते तर आपण कुठल्याकुठे वहावत गेलो असतो. त्यांचे माझ्यावर फार फार उपकार आहेत. 'कातड्यांचे जोडे शिवले, तरी त्यांच्या उपकाराचे ओझे फिटणार नाही.'

अशा विचारात असतानाच त्याची ती प्रेमळ माता आक्रोश करीत आली व आपल्या मुलाला अशा अवस्थेत पाहून त्या मातेची शुद्धच हरपली. धन्य ती माता पिता. खरेच रक्ताच्या मायेपेक्षा सहवासाची माया जास्त असते.

अमरचा घरी जाण्याचा दिवस उजाडला. त्याने नर्स अनिताला भेटण्याचे वचन दिले. दोघांनाही अश्रू अनावर झाले. कारण दोघांच्यात आता एक प्रेमाचा नाजूक बंध निर्माण झाला होता. अमरने अनिताचा निरोप घेतला. अनिताला दिवस सुना वाटू लागला.

आपल्या मागील जीवनाच्या आठवणी तिला सतावू लागल्या. मायेची सावली असलेली आई, आधार वाटणारे वडील व रक्षण करणारा एक भाऊ- त्यांचे सुखा-समाधानात दिवस चालले होते. पण त्या सुखी संसाराला कुणाची तरी दृष्ट लागली. एकदा ती आई, वडील व भावाबरोबर यात्रेसाठी गेली असताना तिचा भाऊ हरवला. त्याचा पुष्कळ शोध घेऊनही तो आजपर्यंत सापडला नाही. त्यावेळी ती अवघी तीन वर्षांची होती. मुलाच्या आठवणीने आई-वडील फार खिन्न असत. नंतर अनिता शिकूनसवरुन मोठी झाली. ज्यावेळी तिला हे समजले की आपण कमनशिबी म्हणून आपल्या वाट्याला हे दुःख आले त्यावेळेपासून बंधू वियोगाचे शल्य तिला सतत सलत असे. ती पुढे शिकली. दवाखान्यात नर्सिंग करुन तिने घर सावरले. आईवडिलांची तिने खूप सेवा केली. वडील पुत्रवियोगाच्या चिंतेने जग सोडून गेले. आईला ते दुःख पचवता आले नाही व तीही त्यांच्या

पाठोपाठ वर्षातच गेली. अनिता एकाकी पडली. अनिता सर्व वेळ हॉस्पीटलमध्येच राहू लागली. गरीबांची सेवा करण्यात स्वतःला धन्य मानू लागली.

या विचारात गतजीवनाचे सिंहावलोकन करण्यात ती मग्न झालेली असतानाच अमर तेथे आला. आणि म्हणाला, " एवढ्या कसल्या विचारात गढली आहेस ? " थोडावेळ ती काहीच बोलली नाही. नंतर ती दोघेही बाहेर फिरायला गेली. आपल्या भावी सहजीवनाची स्वप्ने पाहू लागली. तिला त्याची 'अमोल' साथ लाभत होती. दर चारदोन दिवसांनी तो तिला भेटायला येई. इतके दिवस ती आपल्या आशा, आकांक्षा दडपून जीवन जगत होती, पण आता तिला सुखाची चाहूल कुठेतरी लागत होती. पण अचानक.....

एक दिवस अमर असाच तिच्या खोलीवर आला. तिनेही त्या दिवशी रजा घेतली होती. त्याला बसायला सांगून ती आत चहा करण्यासाठी गेली. खोलीत इकडे तिकडे पाहात असताना सहजच त्याची नजर एका फोटोवर स्थिर झाली. एका पाच सहा वर्षाच्या मुलाच्या फोटोने त्याचे लक्ष वेधून घेतले. बराच वेळ तो त्या फोटोकडे पहात राहिला. त्याने चटकन आपल्या खिशातील कितीतरी वर्षे प्राणापलीकडे जपून ठेवलेला आपल्या छोटया बहिणीसोबतचा आपला फोटो बाहेर काढला व तो त्या दोन्ही फोटोंकडे बारकाईने पाहू लागला. त्याच्याकडील फोटो त्या खोलीतील फोटोशी तंतोतंत जुळत होता. त्याला आश्चर्याचा धक्काच बसला.

एवढ्यात अनिता बाहेर आली. त्याने तिला विचारले, " हा फोटो कोणाचा आहे ? " अनिताने सांगितले, " जत्रेत हरवलेल्या माझ्या भावाचा हा फोटो आहे. "

तो एकदम खिन्न झाला. अनिताने विचारले, " अरे, तू गप्प का ? बोलत का नाहीस ? "
" आपले दोघांचे लग्न होणे शक्य नाही. " अमरने उत्तर दिले.

तिने घाबरुन विचारले, "पण का? तुझे दुसऱ्या कोणावर प्रेम आहे काय? की तुझ्या आईवडिलांचा या लग्नास विरोध आहे?"

तिला सावरत अमर म्हणाला, " तुझा जत्रेत हरवलेला अभागी भाऊ तो मीच आहे. हरवल्यानंतर एका हॉटेल मालकाने काही दिवस माझा सांभाळ केला. पुढे त्याचा गैरसमज होऊन त्याने मला हाकलले. आता कोठे जायचे अशा विचारात चालत असता एका कारने मला ठोकर दिली. कारच्या मालकांनी पुढे माझा प्रतिपाळ केला. मला शिक्षण दिले. मोठे केले. त्यांचा मी अतिशय ऋणी आहे. त्यांनी माझा लहानपणी काढलेला फोटो व तुझ्या खोलीतील फोटो एकमेकांशी जुळताहेत बघ."

अनिताला आनंदाश्रू आवरत नव्हते. ती हर्षातिरेकाने ओरडली, "माझा भाऊ मला मिळाला! मी किती भाग्यवान आहे!"

"म्हणूनच तुझे रक्त माझ्या रक्ताशी जुळले. तू आपले रक्त देऊन हे नाते अधिकच दृढ केलेस." दोघांच्याही डोळ्यात अश्रू होते, पण ते दुःखाचे नसून आनंदाचे होते.

दूर कोठे तरी टेपरेकॉर्डवर गाणे लागले होते–
धागा जुळला, जीव फुलला
वेड्या बहिणीला भाऊ मिळाला!

★ ★ ★

# प्रदूषण

**मंजिरी लळीत**

१२ वी कला

राक्षस शब्द उच्चारला की आपल्या अंगावर नकळत शहारे उभ राहातात. महाकाय राक्षस पूर्वी असावेत असे पौराणिक आणि लोककथांमधून आपल्याला समजते. राक्षस मानवांचा संहार करीत असत. म्हणून मानवास त्याची भीती वाटत होती. आता विज्ञानयुगात अशा राक्षसांची भीती उरली नसली, तरी 'प्रदूषणरुपी' आधुनिक राक्षसाने भयानक रुप धारण केले आहे. हा राक्षस सर्वव्यापी आहे. हा राक्षस आपल्या असंख्य हातांनी मनुष्यजातीला मृत्युच्या जाळ्यात ओढत आहे; त्यामुळे विज्ञान आणि अवकाश युगातील मानवास या आधुनिक राक्षसाचा परिचय असणे अत्यावश्यक आहे.

**प्रदूषणाचा अर्थ–**

प्रदूषणाचा अर्थ आपल्याला केवळ एक–दोन वाक्यांत सांगता येणे अशक्य आहे. सर्वसामान्यपणे, 'कोणत्याही वस्तूचे वा पदार्थांचे दूषितीकरण म्हणजेच त्याचे प्रदूषण.' मग ते हवेचे असो, पाण्याचे असो, अन्नाचे असो किंवा महासागराचे असो! एखादा पदार्थ, उदाहरणार्थ, धूर, कार्बनडाय ऑक्साईड वायु, विषारी वायु, आरोग्यनाशक पदार्थ, एखादी उर्जा, उदा. उष्णता, ध्वनी इत्यादींची परिसरात, त्या परिसराच्या धारणशक्तिपेक्षा जास्त प्रमाणात वाढ होणे आणि संचय होणे याला प्रदूषण म्हणता येईल.

गेल्या दोन–तीन दशकात प्रदूषण या शब्दाचा वापर अधिकाधिक होत चाललेला दिसतो. प्रदूषणाचे घोर परिणाम सर्वत्र चर्चिले जात आहेत. प्रदूषणाचा प्रश्न हा जगातील एखाद्–दुसऱ्या देशातील लोकांचा नसून अखिल मानवी अस्तित्वाचा आहे. त्याच्या यशस्वी सोडवणुकीवर भविष्यातील मानवाचे अस्तित्व, सातत्य किंवा विनाश अवलंबून आहे.

सध्याच्या वाढत्या उद्योगधंद्यांच्या, वाढत्या लोकसंख्येच्या व सत्तासंघर्षाच्या जगात हा प्रदूषण प्रश्न फारच झपाट्याने उग्र स्वरुप धारण करीत आहे. जागतिक पातळीवरुन आंतरराष्ट्रीय तंत्रज्ञ व राजकारणी यांनी चर्चा करण्याची गंभीर परिस्थिती आज निर्माण झाली आहे.

मोठ्या शहरात उद्योगधंद्यांचे केंद्रीकरण झाले आहे. त्यामुळे लोकसंख्या बेसुमार वाढली आहे व शहरातील गर्दीही वाढत चालली आहे. यामुळे मोठमोठ्या शहरांत प्रदूषणाने फार उग्र स्वरुप धारण केले आहे. शहरातील वाढत्या गर्दीला कंटाळून बरेच लोक खेड्याकडे निघाले आहेत. पण काही ठिकाणच्या घाण, कचरा, दूषित पाणी यामुळे राहाणं आरोग्यास घातक वाटते.

जीवनात मानवाला प्रत्येक गोष्टीची किंमत मोजावी लागते. गेल्या शतकात वेगवान औद्योगीकरणाची वाढत्या जीवनाच्या राहणीमानाच्या रुपाने स्वादिष्ट फळे चाखण्यास मिळाली. आता प्रदूषणाच्या रुपाने त्या फळांची किंमत मोजण्याची गरज निर्माण झाली आहे.

अनेकमुखी राक्षसाप्रमाणे हे प्रदूषण मानवाचे अनेक ठिकाणी लचके तोडत आहे. प्रदूषणाचे एकेक प्रकारच आपला सर्वनाश करण्यास समर्थ आहेत.

**१) हवेचे प्रदूषण–**

हवेचे नैसर्गिक घटक ज्या विशिष्ट प्रमाणात असतात, त्या प्रमाणाचा समतोल बिघडला की हवा प्रदूषित झाली असे म्हटले जाते. पृथ्वीच्या उत्पत्तीपासूनच हवेचे प्रदूषण होत आहे. परंतु अलिकडे लोकसंख्येतील बेसुमार वाढ आणि औद्योगिक क्रांती ह्यामुळे दूषितांचे

हवेतील प्रमाण प्रचंड वेगाने वाढत आहे. वादळी वारे, ज्वालामुखी, भूकंप, जीवसृष्टी वनस्पतींच्या फैलावाच्या क्रिया इत्यादींमुळे धूळ, धुके, राख, धूर, सुक्ष्म कीटक, जंतू इ. निर्माण झाल्याने हवेचे प्रदूषण होते.

वातावरणातील शुद्ध हवा जीवसृष्टिच्या निर्मितीस व विकासास कारणीभूत आहे. योग्य प्रमाणात मिश्रण असलेल्या वायूंचे आवरण पृथ्वीभोवती नसते तर चंद्रपृष्ठासारखी पृथ्वीची अवस्था झाली असती. पृथ्वीचे वातावरण जीवसृष्टिचे संरक्षण करणारे एक छत्रच आहे. परंतु मानवाने आपली सुखसाधने वाढविण्याच्या प्रयत्नात या वातावरणाचे दूषितीकरण चालविले आहे.

कारखान्यांच्या धुरांड्यातून धूर आणि सल्फरडाय–ऑक्साईड वायु सोडले जातात. हे दोन्ही प्रदूषणकारी पदार्थ आहेत. इंधनाच्या ज्वलनामुळे कार्बन–डाय–ऑक्साईड वायु निर्माण होतो. वाहने हैड्रोकार्बन, कार्बन मोनॉक्साईड व नायट्रोजन ऑक्साईड प्रामुख्याने हवेत सोडतात. ह्या शिवाय प्रत्येक कारखान्यातून निरनिराळी रसायने तयार होत असल्याने त्या रसायनांनी व खाणीतून वा धातूच्या कारखान्यातून अनेक प्रकारच्या धातूंच्या कणांनी वातावरण दूषित होत असते. ही सारी दूषितके माणसांवर, इतर प्राण्यांवर, वनस्पतींवर आणि इतर पदार्थांवर अत्यंत घातक व कायमस्वरुपाचे परिणाम करतात.

**वाहनें आणि हवाप्रदूषण–**

अलिकडे बऱ्याच देशातील राहणीमान उंचावत असल्यामुळे मोटारींचा उपयोग वाढत आहे. मोठ्या शहरांत मोटारींची संख्या जास्त असते. मोटारीतून कार्बन मोनॉक्साईड वायु बाहेर पडतो. हा वायु सर्वात घातक आहे. कारण तो रंगरहित, गंधरहित असल्याने त्याची पूर्वसूचना मिळत नाही. हा वायु रक्तातील हिमोग्लोबिनशी तत्काळ संयोग पावून रक्तातील ऑक्सिजनचा पुरवठा कमी पडतो. परिणामतः चक्कर येणे, तीव्र डोकेदुखी, बुद्धिभ्रंश व मृत्यू या पायऱ्यांनी हा वायु माणसाचा अंत घडवून आणतो. उदा. जपानमधील टोकिओ या शहरात स्टेडियममधील खेळ संपल्यानंतर बाहेर येणाऱ्या मोटारींनी सोडलेल्या दूषित वायुमुळे अनेकांना घेरी आली. त्यामुळे वाहतूक थंडावली व कित्येक लोकांना हॉस्पिटलमध्ये न्यावे लागले. असा हा कार्बन मोनॉक्साईड! अशाप्रकारे वाहनांमुळेही प्रदूषण वाढत चालले आहे.

**धुम्रपान व हवेचे प्रदूषण–**

धुम्रपानानेदेखील प्रदूषण होते. विडी आणि सिगारेटमध्ये ३०० घातक पदार्थ असतात. सर्वांत घातक घटक 'निकोटिन' होय.
सिगारेटला विष करण्याची भट्टी म्हणणे योग्य ठरेल. सिगारेटच्या धुराने प्रदूषण होते. बाहेर पडणाऱ्या धुरामुळे हृदयविकार, अल्सर, आंधळेपणा, फुफ्फुसाचा कॅन्सर इत्यादी रोग होतात. म्हणूनच डॉ. जॉन्सन यांनी सिगारेटची व्याख्या पुढीलप्रमाणे दिली आहे, सिगारेट म्हणजे कागदात गुंडाळलेला तंबाखू, ज्याच्या एका टोकाला धूर असतो आणि दुसऱ्या टोकाला असतो 'महामुर्ख.'

हवेतील प्रदूषणाच्या तावडीतून पक्षी आणि प्राणी–देखील सुटत नाही. फ्ल्युओरीनसारखी द्रव्ये हवेत सोडल्याने गुरांच्या अवयवांवर परिणाम होऊन गुरे कायमची निकामी झालेली आहेत. ॲसिडयुक्त धुरामुळे वनस्पती जळून जातात. फळांची व झाडांची वाढही खुंटते.

भारतात केवळ हवामानाच्या प्रदूषणामुळे सहाकोटी लोकांवर अनिष्ट परिणाम झाला आहे. शहरातील धुरामुळे अपघातांचे प्रमाण वाढत आहे. अमेरिकन वातावरण संशोधन शास्त्रज्ञ असे भाकित वर्तवितात. ' सध्याच्या प्रदूषणाच्या गतीने येत्या १०–१५ वर्षात भूगोलावरील प्रत्येकाला श्वासोच्छवासासाठी संरक्षण कवच वापरावेच लागेल ! '

**२) जलप्रदूषण –**

जल म्हणजे जीवन. नदीकाठावरच मानवी वस्त्या, संस्कृती वसल्या आणि त्यांचा विकास झाला. एकाच नदीच्या काठावर अनेक वसाहती वसल्यावर दूषित पाण्याचा प्रश्न निर्माण झाला व उद्योगधंद्यांची वाढ

झाल्यावर दूषित पाण्याच्या प्रश्नाची तीव्रता वाढू लागली आहे. प्रत्येक कारखान्याने आपले पाणी नदीत सोडले तर खालच्या कारखान्यास आणि शहरांस अधिकाअधिक घाण पाणी मिळत जाते. हे रोगास आमंत्रक ठरते. बहुतेक नद्या व सरोवरे आज घाणीची आगरे झाली आहेत. भारतीयांच्या जीवनात नद्यांना अत्यंत पवित्र मानले जाते. परंतु दुर्दैवाने भारतातील एकही नदी आज शुद्ध राहिलेली नाही. गंगा, यमुना, गोदावरी यांचे पावित्र्य केवळ काल्पनिक ठरत आहे. गंगेच्या किनाऱ्यावरील तेल कारखान्यातून गंगेत वाहत गेलेले तेलमिश्रित पाणी पेटून गंगेला ऑक्टोबर १९७३ मध्ये आग लागल्याचा अजब प्रकार घडला. त्यामुळे प्रदूषणावर थोडासा प्रकाश पडला. नदीतील सांडपाण्यामुळे कावीळ आणि टायफॉइडसारख्या रोगांच्या साथी फैलावतात.

सांडपाण्याशिवाय आपण स्वत: आपल्या कृतीने परंतु नकळत या पाण्याच्या दूषितीकरणाला हातभार लावत असतो. दैनंदीन शारीरिक आणि कपडे धुणे, भांडी घासणे, गुरेढोरे पाण्यात धुणे इत्यादींमुळे पाण्याचे प्रदूषण होते. साखरेच्या कारखांन्यातील मळीमुळे, औषध कारखान्यांतील रासायनिक पाण्यामुळे पाण्याचे प्रदूषण अतिशय वेगाने होत आहे. मासेमारी व्यवसायावर देखील याचा विपरीत परिणाम होत आहे. यामुळे प्रदूषित पाण्यात मेलेले किंवा दूषित झालेले मासे खाऊन माणसाच्या पोटात पाऱ्याचा अधिक तीव्र परिणाम होतो तसेच मेंदूवरही परिणाम होतो.

**कचरा प्रदूषण–**

प्रत्येक देशात शहरीकरण आणि औद्योगिकरण यामुळे आणखी एक पर्यावर्णीय संकट आले आहे. ते म्हणजे रोज प्रचंड प्रमाणात निर्माण होणारा कचरा. पाश्चिमात्य देशातील "Use and Throw" 'वापरा आणि फेकून द्या' या धोरणामुळे कचऱ्याचे निर्मूलन ही प्रमुख समस्या बनली आहे व आरोग्य सुरक्षितताही धोक्यात आली आहे. वाढणारी लोकसंख्या व पसरत जाणारी शहरे यांमुळे 'कचऱ्याचा महाराक्षस' निर्माण झाला आहे.

**कीटकनाशके व तणनाशकांचे प्रदूषण–**

शेतीच्या व्यवसायाचे व्यापारीकरण होऊन अधिक उत्पादनासाठी प्रयत्न सुरु झाले व पिकांवर पडणाऱ्या रोगाचा नाश करण्यासाठी असंख्य प्रकारची कीटक–जंतुनाशके वापरण्यात येऊ लागली. ही कीटकनाशके कीटकांचा नाश करुन पूर्णपणे नाश पावत नाहीत, ती जमीनीत साठून, पाण्याबरोबर सभोवतालच्या प्रदेशात पसरली जातात. बऱ्याचवेळा ही कीटकनाशके अन्नकणातून मानवाच्या व इतर प्राण्यांच्या शरीरात प्रवेश करतात व अनेक प्राणी प्राणाला मुकलेले आढळतात. ही कीटकनाशके एखाद्या सरोवरात मोठ्या प्रमाणात मिसळली तर मासे, कासव, खेकडे इ. जलचर प्राणी मारले जातात व असे मेलेले जलचर खाल्ल्यामुळे अनेक माणसांनीही आपले प्राण गमविले आहेत.

**३) ध्वनी–प्रदूषण:–**

मोठ्या आवाजाने, गोंगाटानेदेखील प्रदूषण होते असे सांगितले तर आश्चर्य वाटायला नको. कारण हे एक खरोखर हृदयविदारक कटू सत्य आहे. आवाजामुळे माणसाचे आरोग्य धोक्यात येत आहे. गेल्या ४०–५० वर्षात वाहतुकीच्या विकासामुळे गोंगाट ज्या प्रमाणात वाढला, त्या प्रमाणात तो वाढत राहिला तर या शतका अखेर तो प्राणघातक ठरु शकेल.

मनुष्याचे जीवन नवे तंत्र व विकासामुळे गतिमान होत आहे. गती तिथे आवाज आलाच ! ' Silence is gold ' अशी एक म्हण आहे. मात्र सध्या शांतता खरोखरीच महाग व दुर्मिळ होत चालली आहे. गोंगाट सर्वव्यापी आहे. दिवसा गोंगाट तीव्रतेची परिसीमा गाठतोच, पण रात्रीसुद्धा शहरात गोंगाट सुरुच असतो. माणसाच्या कानावर कारखान्यांतील यंत्रांचे, आगगाड्या, मोटार, विमानांचे आवाज, गिरण्यांचे भोंगे, फेरीवाल्यांचे आवाज, टि. व्ही., रेडिओ, टेलिफोन कॉल यांचे आवाज, भांडणे, ओरडणे असे कितीतरी आवाज सारखे होत असतात, आणि मनुष्य निमुटपणे ते सगळे सहन करतो.

**शरीरावर परिणाम:–**

गोंगाटाच्या परिणामाचा अलिकडे काही देशांतील

शास्त्रज्ञांनी सखोल अभ्यास केला आहे. माणूस साधारणत: ८० डेसिबल (ध्वनिची तीव्रता मोजण्याचे परिमाण) इतका आवाज बराच काळ सहन करु शकतो, (उदा०– घड्याळाच्या गजराचा आवाज) त्यापेक्षा जास्त आवाज अधिक काळ कानावर पडला तर बहिरेपणा येण्याची शक्यता जास्त असते. भोवतालच्या गोंगाटामुळे डोक्याला त्रास होतो. रक्तदाब वाढतो, डोके गरगरते, अस्वस्थ वाटू लागते. उदा० – महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या गोंगाटामुळे बऱ्याच शिक्षकांना डोके दुखीचा विकार जडतो. तसेच कारखान्यातील यंत्रांच्या खडखडाटामुळे अनेक मजूराना बहिरेपणा येतो.

**प्रदूषण नियंत्रण–**

प्रदूषणरुपी आधुनिक राक्षसाचा नायनाट कसा करावा यावर बरेच शास्त्रज्ञ आता विचार करत आहेत. मानवनिर्मित प्रदूषण अमानुष आहे. सुधारीत सं. संस्थाने, इंग्लंड जपान आदी राष्ट्रांनी वैज्ञानिक आणि औद्योगिक प्रगती केली. त्यांनी निसर्गावर मात करण्याचा प्रयत्न केला परंतु ऐहिक सुख आणि समाधान हळूहळू ओसरु लागले आहे. याचे मुख्य कारण प्रदूषण. प्रदूषणामुळे या देशातील माणसे दिवसेंदिवस रोगी होत चालली आहेत.

त्यासाठी अविकसित व विकसनशील राष्ट्रांनी प्रदूषणाचा धोका टाळून औद्योगिक आणि वैज्ञानिक प्रगती करण्याचा संकल्प वेळीच केला पाहिजे. लोकसंख्येच्या आणि शहरांच्या अनिर्बंध वाढीवर मर्यादा घातल्या पाहिजेत. निसर्गाचा संहार कोणत्या पातळीवर चालू ठेवायचा ती पातळी वेळीच ठरवणे आवश्यक आहे.

**निसर्गाची यंत्रणा–**

निसर्गाची प्रदूषण नियंत्रणाची स्वयंचलित प्रेरणा आहे. मानवप्राणी हवेतून ऑक्सिजन घेतात आणि विषारी कार्बनडाय ऑक्साईड सोडतात वनस्पती मात्र ऑक्सीजन बाहेर सोडतात यामुळे हवेतील प्राणवायू चे आणि विषारी वायुचे प्रमाण समतोल राहते. वेगवान औद्योगिकरणामुळे विषारी वायु मोठ्या प्रमाणात बाहेर पडत असल्यामुळे निसर्गाची यंत्रणा अपुरी पडत आहे. शहरांच्या बेसुमार वाढीमुळे व जंगलतोडीमुळे विषारी वायुंचे भक्षण करणारी यंत्रणा दिवसेंदिवस कमी पडत आहे.

**झाडे खालीलप्रमाणे कार्य करतात –**

१) प्रदूषित हवेत शुद्ध हवा मिसळून झाडे तिचा दूषितपणा कमी करतात.
२) दुर्गंधीयुक्त हवा झाडे सुगंधित करतात.
३) जादा प्राणवायू सोडून झाडे हवा शुद्ध ठेवतात.
४) हवेतील विषारी कण झाडे पकडून ठेवतात.
५) झाडांमुळे तापमानाची तीव्रता कमी होते व थंड, उत्साहवर्धक हवेत लोकांची कार्यक्षमता वाढते.

झाडे वरील महत्त्वाची कार्ये करुन प्रदूषण कमी करतात.

**जलीय प्रदूषणाचा प्रश्न सोडविणे –**

जलीय प्रदूषणाचा प्रश्न सोडविण्याचे दोन मार्ग आहेत. १) जलीय प्रदूषण मर्यादित ठेवणे २) दूषित पाण्याचा वापर करण्यापूर्वी तिच्यावर प्रक्रिया करणे. महाराष्ट्र सरकारने १९७१ पासून जलप्रदूषण नियंत्रण कायदा पास करुन नदीनाल्यांचे पाणी चांगले राखण्याचा प्रयत्न केला आहे. सागरी प्रदूषण होऊ नये म्हणून किनाऱ्यावर देखरेख करण्यासाठी आणि खबरदारी घेण्यासाठी, एक किनारी, समुद्र निगा महामंडळ नियुक्त केले पाहिजे.

**कचऱ्याची व्यवस्था–**

प्रदूषण कमी करण्यासाठी कचऱ्याची योग्य प्रकारे व्यवस्था करणे आवश्यक आहे. आज लहान–मोठ्या शहरांतून उघड्या कचराकुंड्या असल्यामुळे कचरा कुंड्याबाहेर विस्कटला जातो. मोकाट जनावरे आणि डुकरे कचरा अस्ताव्यस्त पसरवितात. त्यामुळे दुर्गंधी सुटते. त्यासाठी बंदिस्त कचराकुंड्या वापराव्या. शेती उत्पादनातून वाया जाणाऱ्या पदार्थांचा उपयोग खते, जनावरांचे खाद्य, कागद तयार करण्यासाठी करता येईल. असे अनेक मार्ग आहेत. वाण आहे ती

स्वयंप्रेरणेची, संशोधनाची.

**कारखान्यांचे विकेंद्रीकरण-**

आज यांत्रिक आणि तांत्रिक ज्ञानाच्या सहाय्याने प्रदूषण कमी करणे शक्य आहे. कारखान्यांमुळे जे प्रदूषण होते, त्यापासून बचाव करण्यासाठी त्यांना शहरापासून दूर जागा दिली पाहिजे. त्यामुळे कारखान्यांचे केंद्रीकरण थांबेल. प्रादेशिक औद्योगिक विकासात संतुलन निर्माण होईल. कारखान्यातून बाहेर पडणाऱ्या सांडपाण्याची किंवा विषारी मळीची विल्हेवाट योग्य मार्गाने होते की नाही हे पाहिले पाहिजे. त्यासाठी वातावरणशास्त्र, पाण्याचे शास्त्र व पर्यावरण, समाजशास्त्र याचा अभ्यास करणे जरुरीचे आहे.

आठवड्यातून एक तरी दिवस वाहनांच्या वाहतुकीने गजबजणारे रस्ते, मोटारी, ट्रक्स यांना बंद ठेवणे, सार्वजनिक जागी लाउडस्पिकर्स, रेडिओ यांच्या वापरावर बंदी घालणे, प्रदूषण निर्माण करणारे एक कारण, जे वाढत्या अपेक्षा, ह्यावर मर्यादा घालून आपल्या जीवनव्यवहारात साधेपणा, नैसर्गिकपणा आणणे. प्रदूषणाच्या संकटाकडे सर्व जनतेचे लक्ष वेधुन निसर्गपरिसर न बिघडवता, सांभाळण्याची जाणीव करुन देणे, आवश्यक आहे. निसर्ग व मानव ह्या एकाच नाण्याच्या दोन बाजू पूरक व आवश्यक आहेत.

थोडक्यात, प्रदूषणाच्या समस्येबद्दल निराश मनाने चिंता करीत बसण्यापेक्षा उत्साहाने तिच्याशी सामना करावयास हवा. आजच्या युवकांनी यासाठी सक्रिय सहकार्य करावयास हवे. राष्ट्रीय छात्रसेना आणि राष्ट्रीय सेवा-योजनेतील विद्यार्थ्यांची शिबीरे प्रदूषणग्रस्त भागात आयोजिली पाहिजेत. सर्वसामान्य जनतेनेदेखील या बाबतीत जागरुक राहिजे पाहिले. प्रदूषणाविरुद्ध ओरडा करुन, शासनास हलविले पाहिजे. प्रदूषण हटाव मोहीम काढली पाहिजे. आपण जर वेळेवर जागे झालो नाही तर आपणास जगणे अशक्य होईल.

★ ★ ★

# व्यथा व्यक्त होताना

## विभावरी बांदेकर

१२ वी वाणिज्य

विद्यार्थीदशा ही खूप महत्त्वाची. या वयात योग्य संगत लाभली तर आयुष्याची गाडी यशोमंदिरापर्यंत पोहोचेल. अन्यथा कुसंगतीने समाजाला प्रश्न बनून राहण्याचीच शक्यता. अशाच गुन्हेगारांच्या संगतीत दुर्दैवानं सापडलेला आमच्या महाविद्यालयाचा अकरावी कला शाखेत शिकणारा विद्यार्थी विद्याधर तारी मोठ्या धाडसानं सुटतो आणि प्रयत्नपूर्वक चांगला मार्ग स्वीकारतो. संपादक मंडळाने त्याची मुलाखत घेऊन त्याचा हा प्रवास तुमच्यासमोर ठेवला आहे.

**प्रश्न–** विद्याधर तुझ्या बालपणाविषयी जरा सांग.
**विद्याधर–** इतर मुलांसारखाच बालपणी मी बऱ्यापैकी हुषार होतो. देवाची पूजा, झाडाना पाणी, शाळा, अभ्यास करताना इतरांना लागणारे घरगुती सामान, रॉकेल आणून देऊन मी १०००/– रु. मिळविले. घरी ४ भाऊ, १ बहीण, आई–वडील आहेत. आम्ही वडाळ्याला रहात होतो. मला सायनला प्रवेश मिळाला. मी एकटाच या भागातून जात होतो.

**प्रश्न–** या गुन्हेगारी जगाशी तुझी ओळख कशी झाली?
**विद्याधर–** मला शाळा व घर एवढेच माहीत होते. तीन महिने झाल्यावर एके दिवशी अचानक मी बसस्टॉपवरुन जात असता मला कुणीतरी बोलवत असल्याचे दिसले. मी थांबलो. माझ्याजवळ आल्यावर त्यापैकी एकजण म्हणाला, नवीन दिसतोस. कुठे रहातो ? त्यांनी फिरायला येतोस का असे विचारल्यावर मी नाही म्हणून शाळेत गेलो. पण शाळेत लक्षच लागेना. सारखे ते लोक दिसत. शाळा सुटल्यावर बसस्टॉपवर आलो तर ते सर्व तिथेच होते. दुसऱ्या दिवशीही ते तिथेच होते. माझी बसही चुकली होती. मी त्यांच्याबरोबर हॉटेलात गेलो. भजी, शिरा असे खूप पदार्थ खाल्ले. माझ्याशी ते खूप आपुलकीने वागले. नंतर मी घरी गेलो पण घरच्यांना काहीच सांगितले नाही. नंतरच्या दिवसापासून मी बसमधून उतरलो की, ते मला बोलवीत व मी त्यांच्याबरोबर जाई. शाळेच्या वेळात त्यांच्याबरोबर, शाळा सुटण्याच्या वेळी घरी जात होतो.

**प्रश्न–** पण या संबंधात तुला घरात काही सांगावे असे वाटत नव्हते का ?
**विद्याधर–** ते माझे मलाच कळत नव्हते. घरी मी थोडाफार अभ्यास करत होतो. शाळेच्या वेळेनुसार घरातून दप्तर घेऊन बाहेर पडणे व वेळेवर घरी येणे यामुळे घरच्या लोकांनाही माझा संशय आला नाही. त्यांनी मला काही विचारले नाही. तसे मीही काहीच सांगितले नाही.

**प्रश्न –** त्या माणसांनी तुला काय करायला सांगितले?
**विद्याधर–** सर्वच माणसे थोडीफार उग्र, राकट, काळ्या वर्णाची होती. त्यांचा पोशाख रुबाबदार होता. ते त्या परिसरातीलच असावेत. १०–१५ मिनिटावर त्यांची एक खोली होती. त्या खोलीत काही पिशव्या, बॅगा, पावडरचे पाकीट, हातचाकू, बटणचाकू, सुऱ्या, अत्यंत बारीक, कमी लांबीची धारदार सूरी अशाप्रकारचे साहित्य होते. मला ते चाकू कसा धरावा, पाकीट कसे मारावे हे शिकवण्याचा प्रयत्न करीत. पण मला करण्याचे धाडसच होत नव्हते. त्यांनी सांगितल्याप्रमाणे मी चोऱ्या करत नव्हतो म्हणून मला ते खूप मारत. कुणाला सांगावे तर ते धमकी देत की जर कुणाला सांगितलंस तर तुला कायमची वाट. दाखवू आम्ही सांगू तसेच तू वागले पाहिजेस. म्हणून घरी सांगायची भीती वाटे. मार तर खूपच खात होतो. अंग खूप दुखत असे. मी दररोज यावे तर ते वाट पाहात उभेच असत. मी भीतीने त्यांच्या मागोमाग जात असे. एकदा चोरी करण्याचा प्रयत्नही केला पण ते लोकांना समजले व सर्वांनी मला खूप मारले.

**प्रश्न –** यातून सुटका कशी झाली ?
**विद्याधर–** एकदा त्यांनी मला टॅक्सीतून खूप लांब नेले. पनवेलच्या पुढे लांब एक झोपडी होती. तिथली शस्त्रे पाहून मी खूप घाबरलो. मला त्यांनी खूप मारले. जेवणही नाही. मी खूप घाबरलो. मला आत ठेवून कडी लावून ते निघून गेले. खिडकीतून कशीतरी दाराची कडी काढली व मी इकडे

तिकडे पहात बाहेर पडलो व कुणी नाहीसे पाहून पळत सुटलो. तहान लागली म्हणून एका घरात जाऊन पाणी मागितले तर त्या घरातला माणूस मलाच मारायला धावला. तसाच पुढे पळत सुटलो. रस्त्यावर आल्यावर दिसेल त्या गाडीला हात केला. एकाला दया आली व मला त्यांनी पनवेलवरुन मानखुर्दला आणलें. तिथे तिकीट काढून पुढच्या गाडीत बसवून दिले. त्यावेळी जर असे काही करु शकलो नसतो तर आज एक गुन्हेगारच झालो असतो. तो दिवस आठवला की आजही अंगावर शहारे येतात. रात्री ११-१२ वाजता घरी पोहोचलो. मी सकाळपासून घरी नसल्याने सर्वजण काळजीत होते. मोठ्या भावाने शाळेत जाऊन चौकशी केली तर मी महिनाभर शाळेत येत नसल्याचे त्यांनी सांगितले. आजूबाजूचे लोकही माझा शोध घेत होते. पोलीसस्टेशनवरही कळवले होते. मला पाहून सर्वांना आनंद झाला. जो तो चौकशीला येत होता. या सर्व प्रकाराने मी खूपच घाबरलो. मुंबईत रहावे वाटत नव्हते. गावी मणच्याला जाऊन शिकावे असे ठरवले. तोपर्यंत मधली ३ वर्षे गेली.

**प्रश्न** – मधली ३ वर्षे काय केलेस ?
**विद्याधर**– या लोकांनी मला खूपच मारले होते. डोक्यावर खूप मारले असल्याने माझे डोळे खूप दुखत. कान दुखत असे. हे सर्व कमी झाल्याशिवाय शाळेत जाऊन उपयोग नव्हता. उपचार चालू होते. त्याचा परिणाम थोडाफार जाणवू लागल्यावर ३ वर्षांने पुन्हा शाळा सुरु केली. शाळेतही अनेकदा डोळे दुखणे, चक्कर येणे असे प्रकार होत असत. मणच्याला डॉ. श्रीधर रघुनाथ लेले हायस्कूल मधील सर्व शिक्षकांनी खूप मदत केली म्हणून मी दहावी पास होऊ शकलो. अभ्यास करताना सतत कान दुखणे, पोटात दुखणे असा त्रास होतोच.

**प्रश्न** – आता कॉलेजमध्ये काय अनुभव येतो?
**विद्याधर**– माझ्या वयाची मुलें पदवीपरीक्षेला बसत असलेली पाहून मला वाईट वाटते. कॉलेजला गेल्यावर आपले कसे होईल असे वाटायचे. पण माझी व्यथा समजल्यावर सर्वच प्राध्यापक मला सहानुभूतीने वागवतात. कॉलेजमध्येही मला चक्कर येते, डोळे दुखतात, डोकं गरगरायला लागतं पण प्रत्येक वेळी सर्वजण मला मदत करतात. अभ्यास केलेला लगेच विसरला जातो. त्यामुळे जास्त शिक्षण घेणे मला शक्य होणार नाही. म्हणून मी बारावीपर्यंतचे शिक्षण पूर्ण करुन एखादा व्यवसाय करण्याचे ठरवले आहे. मत्स्यशेती व कुक्कुटपालनामध्ये मला विशेष रस आहे. मात्र माझा हा अनुभव इतरांना सांगताना मला लाज वाटत नाही. असा प्रसंग कुणावर येऊ नये असे मला वाटते. परमेश्वराने मला पुन्हा योग्य मार्गावर आणले आहे. ज्या विचित्र अनुभवातून मी गेलो आहे त्याचा माझ्या शरीरावर खूपच परिणाम झाला आहे. मला सतत कोणाची ना कोणाची मदत लागते. अगदी स्वतंत्रपणे मी काही करु शकत नाही. त्यामुळें सतत सर्वांशी मिळून मिसळून राहणे मी पसंत करतो. परमेश्वराने अशा अवस्थेत का होईना मला जीवनात सुख–समाधान द्यावे एवढीच माझी इच्छा आहे.

★ ★ ★

# भारतातील शेतकरी आंदोलनाची वास्तवता

**विश्वामित्र खडपकर**

द्वितीय वर्ष कला

नुकतेच शेतकरी संघटनेने मध्यंतरी गहू आयात रोखण्यासाठी आंदोलन उभारले होते. शेतकरी संघटना वेळोवेळी ही आंदोलने उभारते पण त्यात किमत वाढवून द्या हीच मागणी प्रामुख्याने असलेली दिसते.

या किंमतवाढीने काय साध्य होणार आहे ? गरीब शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती सुधारु शकेल काय ? या दृष्टीने शेतकरी आंदोलनाचा आढावा घेण्याचा प्रयत्न मी येथे करणार आहे.

भारतातील गेल्या साठ–सत्तर वर्षातील इतिहासाचा मागोवा घेताना असे आढळते की भारताच्या आर्थिक इतिहासात जी शेतकऱ्यांची आजपर्यंत केलेली आंदोलने व कार्यक्रम राबवले गेले त्याचा परिणाम एवढाच झाला की एक बड्या शेतकऱ्यांचा वर्ग उदयास आला व ते गरीब शेतकऱ्याना पुढे करुन आपला फायदा करुन घेत आहेत. भारत स्वतंत्र झाल्यानंतर जमीनदारी पद्धतीचे उच्चाटण करण्यात आले. परंतु त्यावेळी मध्यस्थानी चांगल्या जमिनी आपल्याकडे ठेवल्या व कुटुंबाच्या सर्व व्यक्तींच्या नावावर जमिनी वढवल्या. याचा परिणाम असा झाला की प्रत्यक्षात कुळाना कमी प्रमाणात जमिनी मिळाल्या व जुने जमीनदार व मध्यस्थ यांचा एक नवीन भांडवली वर्ग उदयास आला व देशात नवीन राजकीय वारे वाहण्यास सुरुवात झाली. त्याचवेळी उत्तरप्रदेशमध्ये १९६५ नंतर कै. चौधरी चरणसिंह यांनी गहू आणि कापूस पिकवणाऱ्या शेतकऱ्यांना एकत्र जमवून, मेळावे भरवून एक राजकीय ताकद निर्माण केली. अशाप्रकारे सर्व राज्यात राजकीय ताकद निर्माण होण्यास सुरुवात झाली. पंजाबमध्ये अकाली दल तर महाराष्ट्रात साखर कारखानदार व गुजरात मध्ये पटेलानी गोडेतेलाच्या बाजारावर नियंत्रण ठेवून जनतेची पिळवणूक केली. अशाप्रकारे १९६५ नंतर स्वार्थी राजकारणास सुरुवात झाली.

महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाल्यानंतर महाराष्ट्राच्या राजकारणाची सर्व सुत्रे ही साखर कारखानदारांच्या हाती होती. त्यामुळे त्यांचे ग्रामीण महाराष्ट्राच्या राजकारणात वर्चस्व होते व त्याना विरोध करणाऱ्या संघटना ग्रामीण भागामध्ये नव्हत्या. तर शहरामध्ये नवीन कामगार संघटना उदयास आल्या. परंतु १९६७ नंतर मुंबईत शिवसेना उदयास आली व कामगार संघटनांचा विरोधी पक्षाला असणारा पाठिंबा कमी झाला व साखर सम्राटांचे वर्चस्व हळूहळू कमी होवू लागले. महाराष्ट्रातील राजकारणात एक पोकळी निर्माण झाली. त्यानंतर पक्षनिरपेक्ष संघटना उदयास आल्या व त्यांचे नेतृत्व हे प्रामुख्याने उच्च शिक्षित तरुणांकडे होते. आर्थिक हितसंबंध जावून त्या जागी जात, पात, धर्म, लिंग यासारख्या सामाजिक विशेषणांना प्राधान्य मिळू लागले. अशा सामाजिक वातावरणात महाराष्ट्रातील शेतकरी संघटनेने पाया रोवला व देशात विविध भागात शेतकऱ्यांच्या नावाने बड्या शेतकऱ्यांच्या अल्पसंख्य गटाने आपले राजकारणाचे घोडे पुढे दामटविण्यास सुरुवात केली. ग्रामीण भागातील वाढते दारिद्रय हे त्यांचे लढयाचे भांडवल होते. त्यांची वाढत जाणारी आर्थिक ताकद हीच त्यांच्या लढयाची शक्ती आहे.

महाराष्ट्रात शरद जोशी यानी ऊसाला किमान ३०० रु. टनाला भाव मिळावा तरच शेतकऱ्याचा उत्पादन खर्च भरुन निघेल असे सांगून शेतकऱ्यांचे आंदोलन पेटवले व ३०० रु. टनाचा भाव पदरात पाडून घेवून जोशी यानी महाराष्ट्रात शेतकऱ्यांचे नवे नेतृत्व निर्माण केले. ऊसाचा भाव वाढवून घेण्यात जसा जोशींनी पवित्रा घेतला तसाच त्यानी कांदा,

कापूस, तंबाखू यांचे उत्पादन घेणाऱ्या शेतकऱ्यांचेही आंदोलन उभारले. या ठिकाणी एक गोष्ट नमुद करावीशी वाटते, ती म्हणजे नगदी पिकांमुळे जास्त उत्पादन मिळते त्यामुळे शेतकरी हा धान्य पिकवण्याऐवजी नगदी पिकाकडे जास्त वळतो. परंतु जोशी यानी ग्रामीण शेतकऱ्यांचा अभ्यास सखोलपणे केलेला दिसून येत नाही. कारण त्यानी मे महिन्यात 'दुध—भात' आंदोलनाची हाक दिली. परंतु या हंगामात गरीब शेतकऱ्याकडे त्याच्या स्वतःच्या उदरनिर्वाहापुरतेही धान्य शिल्लक नसते. अशावेळी सरकारने जर तांदळाचा भाव वाढविला तर त्याचा फायदा कोणाला होणार ? याचा विचार जोशींनी केलेला दिसून येत नाही. तसेच महाराष्ट्रात कोरडवाहू पिके घेणाऱ्या (ज्वारी, बाजरी, मूग, मटकी) शेतकऱ्यांच्या उत्पादनखर्चाचा शेतकरी संघटनाना अजिबात अंदाज आलेला नाही. ज्यावेळी त्यांना संपूर्ण ग्रामीण शेतकऱ्यांच्या संदर्भातील अभ्यास पूर्णपणे ज्ञात होईल त्याचवेळी शेतकऱ्यांच्या मागण्या घेवून ते रस्त्यावर येतील. अशाप्रकारचा हा शेतकरी संघटनांचा व्यवहार आहे.

शेतकरी संघटनेच्या बाबतीत दुसरी महत्त्वाची जाणवणारी गोष्ट म्हणजे 'शेती—विकास' संदर्भात. या प्रश्नावर शरद जोशी गप्प बसलेले दिसतात. महाराष्ट्रातील शेती ही कोरडवाहू असल्याने पूर्णतः निसर्गावर अवलंबून आहे. त्यामुळे जास्तीत जास्त शेतकऱ्यांची पाण्याची समस्या सुटावी यासाठी शासनाने जलसिंचनाच्या योजना राबवाव्यात. आधुनिक तंत्राचा वापर करुन पाण्याचा काटकसरीने वापर तसेच गरीब व छोट्या शेतकऱ्यांना पाण्याचे समान वाटप होणे आवश्यक आहे. या व इतर स्वरुपाच्या मागण्यांसाठी काही संघटना आंदोलन करीत आहेत. परंतु शरद जोशी याना वरील सर्व गोष्टींचे वावडे असल्याचे जाणवते. कारण गरीब शेतकऱ्याना आज ज्या काही थोड्याफार प्रमाणात सवलती मिळत आहेत. म्हणजेच शेती विकास, दुर्बल घटकांचा विकास, छोट्या शेतकऱ्यांना संरक्षण या विषयी त्यांना बिलकुल आस्था नाही. अर्थात शासनकर्त्यांना अशा जनसमुदायाकडे दुर्लक्ष करणे परवडण्यासारखे नाही. त्यासाठी अर्थतज्ज्ञानी कितीही बोंब मारली तरी सामाजिक हीत आणि त्यापेक्षा महत्त्वाचे राजकीय हीत सांभाळण्यासाठी सरकारला रासायनिक खते,ग्रामीण भागातील विजेचे दर हे रास्तच ठेवावे लागणार आहेत. देशातील अर्थशास्त्रज्ञानी असे प्रतिपादन केले आहे की अशा खर्चास आता कात्री लावणे आवश्यक आहे. त्यामुळे अशा स्वरुपाच्या सवलतींमध्ये वाढ होणे कठीण आहे. तेव्हा शरद जोशींनी आपले लक्ष भाववाढीकडे वळवून इतरांवर कुरघोडी केली आहे.

ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या इतिहासाचा मागोवा घेताना आणखी एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते ती म्हणजे ग्रामीण 'दारिद्र्य' होय. आजपर्यंतच्या शेतकरी आंदोलनामध्ये या दारिद्र्यामागील कारणांचा कोणीही ऊहापोह केलेला दिसून येत नाही त्यामुळे आजपर्यंत केलेल्या उपाययोजनांमुळे ग्रामीण भागात उलट बड्या शेतकऱ्यांचे वर्चस्व वाढीस लागलेले दिसते जर या बड्या शेतकऱ्यांचे वर्चस्व कमी झाले नाही तर ग्रामीण मजूर, भूमिहीन शेतमजूर आणि अल्पभूधारक यांची परिस्थिती दिवसेंदिवस हलाखीची बनत जात आहे. तसेच वाढत्या बेकारीमुळे देशात अर्धपोटी लोकांची संख्या वाढीस लागली आहे. म्हणुनच या समस्यांचा विचार करण्यासाठी सरकारने रोजगार हमी योजना, निराधार सहाय्य योजना, बेकारांना छोटे उद्योग सुरु करण्यासाठी कर्जवाटप, स्वयंरोजगार इत्यादी उपाययोजना दारिद्र्य कमी करण्यास राबवल्या आहेत. परंतु यावरही काही मर्यादा आहेत. त्या म्हणजे सरकारी कर्मचाऱ्यांची भ्रष्टाचार करण्याची प्रवृत्ती त्यामुळे अशा योजना या सरकारी अधिकाऱ्याना चरण्यासाठी एक प्रकारचे मोकळे कुरणच सोडलेले असते व या ज्या सरकारी योजना आहेत त्या तळागाळातील शेतकऱ्यांपर्यंत पोहचतच नाहीत. त्यामुळे शेवटी शासन आणि जनता यांच्यामध्ये संघर्ष, मोर्चे निर्माण होतात व याचा पुरेपूर फायदा बडे शेतकरी उचलतात कारण अशा संघर्षात ते जनतेबरोबर लढचात उतरतात. त्यामुळे शासनाला अशा बड्या शेतकऱ्यांचा पराभव करणे परवडणारे नसते कारण यात शासनाचा पराभव होणे अटळ असते. त्यामुळे आजही ग्रामीण भागातील संघर्षाचे स्वरुप बड्या शेतकऱ्यांच्या हातात

एकवटलेले आहे.

शेतकरी संघटना शेत मालाचे भाव दामदुप्पट करुन मागत असतात. परंतु प्रत्यक्षात शेतमालाचे भाव वाढवून दिल्यास काय परिणाम होईल याचा कोणीही विचार करत नाही. तरी पण आपल्याला शेतकरी संघटनांचे प्राबल्य वाढत असताना दिसते. याचे एक ऐतिहासिक उदा. देता येईल ते म्हणजे फ्रांसमध्ये राज्यक्रांती यशस्वी झाली परंतु क्रांतीनंतर पुढे आलेला कार्यक्रम भांडवलदारांच्या फायद्याचाच होता. तशीच परिस्थिती आज भारतातील शेतकरी आंदोलनाची आहे. यामध्ये शेतकरी आंदोलने जरी यशस्वी झाली तरी त्याचा फायदा बड्या शेतकऱ्यानाच होणार. केवळ प्रचंड जनसमुदायावरुन चळवळीचे स्वरुप समजून येत नाही तर ह्या आंदोलनाचा खरोखर कोणाला फायदा होणार आहे याचा विचार करणे आवश्यक आहे. या न्यायाने जर आजपर्यंत झालेल्या शेतकरी आंदोलनाचा, लढ्याचा फायदा कोणाला मिळाला ? या प्रश्नाचे उत्तर शोधून काढून शेतकरी संघटना कोणाचे हितसंबंध जोपासते व कोणत्या वर्गाचे प्रतिनिधीत्व करते हे ठरवावे लागेल. शेतकरी संघटनेच्या आजपर्यंतच्या लढ्यामुळे किती जणांचे दारिद्र्य नष्ट झाले ? ऊसाचा भाव दुप्पट झाला म्हणून कितीजणांच्या मजुरीत किती वाढ झाली ? भाववाढीने आर्थिक विकासाला किती प्रमाणात चालना मिळाली ? ग्रामीण जीवनाचा कायापालट किती प्रमाणात झाला ? या सर्व प्रश्नांचा शोध ग्रामीण भागातील कार्यकर्त्यांनी तसेच जनतेनें घेणे आवश्यक आहे. आणि अशा प्रकारे आत्मपरीक्षण करुन शेतकरी संघटनेच्या कार्यक्रमाचे मुल्यमापन करणे गरजेचे आहे.

आजही भारतातील ७६% लोकसंख्या ही अल्प व अत्यल्प भूधारक आहे. त्यांच्याकडे फक्त ३०% एवढी जमीन आहे. तर २४% लोकसंख्या ही बड्या शेतकऱ्यांची असून त्यांच्याकडे ७०% जमीन आहे. यामध्ये अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांकडे येणारे उत्पादन हे त्यांनाच उदर निर्वाहासाठी पुरत नाही व त्याना विक्रीही करता येत नाही. उलट कमी पडल्यास त्याना जादा दराने विकत घ्यावे लागते. याच्या उलट बहुतांश बाजारातील शेती उत्पादन हे बड्या शेतकऱ्यांचेच असते. त्यामुळे त्याना भाववाढीचा फायदा मिळतो. तर सरकारी निमसरकारी नोकर यांना दरवर्षी महागाई भत्ता वाढवून मिळतो त्यामुळे वाढीव किंमतीचा माल ते थोड्या फार प्रमाणात खरेदी करु शकतात. परंतु या ७६% लोकसंख्येपैकी बहुसंख्य जनता ही अशिक्षित आणि अर्धपोटी आहे. त्यांच्या निवाऱ्याची सोय अजूनही होऊ शकत नाही. तसेच त्याना लज्जारक्षणापुरते कपडेही घेणे परवडत नाही. आणि अशा बिकट परिस्थितीत जर शेतमालाला किंमत वाढवून दिली तर त्याचा फायदा फक्त बड्या शेतकऱ्यानाच होईल व गरीब लोकाना या अन्नधान्य किंमतवाढीचा फटका बसेल आणि आज हे चित्र आपल्या नजरेस पडत आहे.

म्हणजे शेती उत्पादनाची किंमत वाढवून घेण्याची शेतकरी संघटनेची मागणी आणि तीही विशेषत: ( ऊस, कापूस, इत्यादी नगदी पिकांच्या बाबतीत ) ती या देशातील गरीब शेतकऱ्याला, ग्रामीण, दारिद्र्यात पिचलेल्या लोकांना अधिकाधिक खाईत लोटणारी ठरेल.

★ ★ ★



# कविता

## बुरखा

ज्यावेळी तु तुझ्या काळ्या बुरख्या आडून,
जग न्याहाळत असतेस,
त्याचवेळी जग तुला न्याहाळत असते,
पण, दोघांच्यामध्ये बुरखा येत नसून,
फक्त कुराणच येत असते,
तुला पाहिजे आहे मुक्त स्वातंत्र्य,
आणि, तू रडू शकत नाहीस त्या काटेरी पिंजऱ्यात,
म्हणून, त्या बुरख्याचा एक एक धागा विलग करण्यास,
तू जन्मा घाल एक एक ज्ञानी विचारवंत
एक शब्द तीन वेळा उच्चारल्यास,
तुझे आयुष्य बरबाद होते,
आणि जरी तू कोर्टात धाव घेतल्यास,
शहाबानो तुझ्या आड येते,
इतरांचा दिवस मावळताना,
तुझी फक्त अजून पहाट होत आहे,
आणि या पहाटेच्या संधी प्रकाशात
तुझे जगणे – मरणे लिहीले आहे.

**आनंद कदम**

द्वितीय वर्ष कला

## संघर्ष

हक्कासाठी झगडणाऱ्या
एकाच रक्ताच्या नात्यामध्ये
एकमेकांवर लाठ्या पाहून,
त्यातून उठणाऱ्या ठिणग्या बघून
मन गहीवरुन आले.

चालत आलेले हे
जातीयतेचे वेटोळे;
आणि या वेटोळ्यातून निर्माण होणारी
स्पृष्य, अस्पृष्यता आणि उच्चनिचता पाहून
मन गहिवरुन आले.

धार्मिक वादातून
निर्माण होणाऱ्या या संघर्षात
निरपराध लोक
बाँब स्फोटात बळी पडतात
त्यांच्या बायकांचे आक्रोश ऐकून
मन गहिवरुन आले.

एकीकडे भाकरीच्या
तुकड्यासाठी भीक मागणारे,
आणि दुसरीकडे काळ्या पैशाचे
रांजण भरुन खुर्चीसाठी झगडणाऱ्यांचे
निर्लज्ज चेहरे पाहून
मन गहिवरुन आले.

**महेश घारे**

तृतीय वर्ष कला

# नव्या शतकात

ढोल धडाडले, दुंदुभी निनादल्या
एकविसाव्या शतकाला पायघड्या घातल्या
अहो, चला पाय उचला, बाजार बंद होईल
दुकानात ठेवलेला कॉम्प्युटर महाग होईल
त्याच्याविना राहू कसा ? अवकाशात पाहू कसा
पृथ्वीवरच्या बँका साऱ्या, ओसांडून वाहिल्या
आज मातृदिन, मदर्स डे
उद्या पितृदिन, फादर्स डे
सवडीने वृद्धाश्रमात फोन करायला हवा
भेटायला जमेल का .....?
प्रश्न कॉम्प्युटरला फिड करायला हवा !
त्याच्या उत्तरावर आमची क्रिया .....
माणुसकीच्या पेशी पेशी
जळून गेल्या आंतल्या !
आमच्याकडे दुष्काळ आहे
तिकडे पूर लोंढा आला
दोन्हीकडे बेकारीचा
कपाळावर धोंडा आला
ओंजळभर पाण्यासाठी
टँकरची वाट पाह्यली
साखरेच्या सम्राटांनी,
नद्या साऱ्या आटविल्या
चाळीस वर्षे राज्य आमचे
निर्णय आमचे, नेते आमचे
एक राजा, कोटी चमचे
पोट फुटून गेले तरी,
अजून खूप जगायचे खायचे
नातू पणतू यांच्यासाठी
घरे बंगले घ्यायचे
मते आम्ही विकत घेतो
आश्वासने फूकट देतो
झोपडपट्ट्या गावोगावी,
बेसुमार वाढल्या.
जगण्यासाठी अस्त्र हवे
बोफोर्स देते शस्त्र नवे
कुणी पाणबुड्या कुणी तोफा
युद्धाच्या उठती वाफा
कुणी कुणास किती दिले
आळीमिळी कुणी घेतले ?
मध्यस्थांच्या दलालीच्या
हिशेबवह्या फाटल्या !
कुठला बाप, कुठली आई ?
कुठला भाऊ, कुठली ताई ?
आमचे आम्ही मस्त आहोत
खाऊन पिऊन सुस्त आहोत
टीव्हीवरच्या रामायणाने,
उगीचच पापण्या दाटल्या
एकविसाव्या शतकाला......
पायघड्या घातल्या !

**सतीश जोशी**
तृतीय वर्ष विज्ञान



## मरणावरती बंध कुणाचे

मरणावरती बंध कुणाचे
मरणाशी या द्वंद्व कुणाचे
कुणा न कळले असे एक ते
विधिलिखीत देवाघरचे

ग्रंथ एक एक आयुष्याचा
सरणावरती जळतांना
कुणी ढाळतो अश्रू चितेवर
तर कुणी उजळतो स्मृतींना

तुझ्यासारखा अवलिया
त्यातही शोधी ............

सळसळणाऱ्या पानांमधुनी
लिहिलेली ती जीवनगाथा

खळखळणाऱ्या लाटांचे ते
जीवन असते क्षणाक्षणांचे
किनाऱ्यावर येतांना परी
पाऊल त्यांचे थरकत असते.

मरण असले जरी शाश्वत
तरीही जगणे प्राप्त असते
जगता जगता मरणाची
सोडून द्यावी ती गूढ भाषा

मग जीवनाच्या अनमोल ग्रंथी
लिहिशील तुला जे हवे हवे ते
मरणावरती बंध कुणाचे
मरणाशी या द्वंद्व कुणाचे !

**कु. आशा धुरी**
तृतीय वर्ष कला

## आठवणींचा प्रवास

स्वप्नातल्या त्या कल्पना स्वप्नात राहिल्या
आणि आठवणींचे पक्षी झाले .....
चारी दिशांना भरारी घेतल्या,
मागे वळून पाहिले नाही.
त्यातील तू एक भरकटलेली पक्षीण .....
नजरेसमोर असतो अफाट विस्तृत समुद्र
– आणि येते आठवणींना उधाण,
सारा समाजच झाला भ्रष्टाचारी त्याला; तू
तरी कशी अपवाद.
आठवणींच्या फुलांची विणतो आहे माळ आज
ती माळ विणून संपली नाही .. ..
त्या आठवणी केव्हा संपणार ?
मला तर आठवणींनी ग्रासले.
अफाट विश्व पायाखाली घालतो तरी सापडत
नाही प्रेमाचे फुल.
विसरण्याचा प्रयत्न करतो पण दिसतो
तो सारा प्रवास,
त्या प्रवासाबरोबर – आठवणीबरोबरच
संपणार आहे– एक प्रवासी
– आणि होणार आहे उष:काल
नव्या उष:कालाबरोबर साकार होणार नवी स्वप्ने.
स्वप्नांची–स्मृतींची तिथेच जुळणार आहे माळ
–आणि या भवसागरात मीही या
माळेबरोबर गुंफलेला असेन.
त्याचवेळी नव्या उष:कालाचा नव्या
प्रतिमांचा उदय होणार आहे.
गतकाळाच्या स्मृती तेथेच पेटणार आहेत.
त्याच स्मृतींच्या आधारे जगणारा
मी त्यात संपेन –
तुझ्या स्मृती बरोबर !

**विलास कदम**
द्वितीय वर्ष कला

## माघारी फिरा

माघारी फिरा शब्दांनो
इथे संपते सीमा अक्षरांची.
होता इथे फुलपंखी झुला
वेलींनी लपेटलेला स्वप्नांनी भारलेला
गात असे पारिजात इथे
चांदण्याने फेसाळलेला, भावनांनी गंधाळलेला;
शब्दांपलिकडील भाषेची–
इथे संपते सीमा अक्षरांची.
हवेत लहरे इथल्या
मंद गंधाचा हिंदोळा सुखावणारा
अशा रम्य संध्यासमयी
आकाश मांडे रंगाचा सोहळा भूलवणारा;
स्मृतींमधल्या संधिकालाची–
इथे संपते सीमा अक्षरांची.
छायेत झाडांच्या विसावे
तृप्त धरणी मंतरलेली
भटकत रानातून स्वरांच्या
दचके तार गुंगलेली;
चांदण्याच्या स्पर्शाची–
इथे संपते सीमा अक्षरांची.
आतातरी लाडक्या शब्दांनो
विसरा मोह फुलण्याचा
कळ्यात न राहिला
वेडा छंद उगीच हसवण्याचा;
क्षितीजाच्या कुंपणाची–
इथे संपते सीमा अक्षरांची.

**समीर जाधव**
द्वितीय वर्ष विज्ञान



## जागते रहो !

ते येत आहेत ........ !
हातात शिला घेऊन,
–मंदिरे बांधण्यासाठी
राम-नामाचा जप करीत
ते येत आहेत, जागते रहो ॥१॥

ते येत आहेत ...... .. !
हातात हिरवे झेंडे घेऊन,
नव्या मशिदी उभारण्यासाठी
पंजा, अल्लाच्या आरोळ्या ठोकत
ते येत आहेत, जागते रहो ॥ २ ॥

ते येत आहेत ...... !
हातात मशिनगन घेऊन
सर्व धर्मीय भारतीयांची, मानवतेची
त्यातल्या त्यात गरिबांची कतल करीत
ते येत आहेत, जागते रहो ॥३॥

**वर्षा मुणगेकर**
तृतीय वर्ष कला

# शिंग फुंकलेस तू ........

शिंग फुंकलेस जेव्हा तू समाज सुधारणेचे
तेव्हा सारा समाज अंधारात होता
आणि जाळे पसरविलेस आपल्या विचारांचे
ते नष्ट करण्या प्रतिगाम्यांचा हात होता.
पाणी चाखलेस जेव्हा तू चवदार तळ्याचे
तेव्हा मिळाले तहानलेल्यांना पाणी
आणि ठोठावलेस तू दरवाजे काळाराामाचे
तेव्हाच सर्वांना कळली तुझी अबोल वाणी
तू तुझ्या तिक्ष्ण वाघनखांनी
प्रतिगामी विचारांची चिरफाड केलीस
आणि, तुझी परखड लेखणी
तुझ्या आयुष्याची सोबतीन बनविलीस
गांवकुसाबाहेरच्या वस्तीला
तू गावात आणलेस
आणि माणसातील माणूसकीला
तू त्यांना जागविण्यास शिकविलेस.

**आनंद कदम**

द्वितीय वर्ष कला



# वळणावर ........

वाट चुकलेल्या युवका
परतुनी ये तुझ्या पहिल्या जगात
आज समजतोस ज्या फुलांच्या वाटा
तेथे आहेत माळा काट्यांच्या
कधी कळेल हा मार्ग मोहमायेचा
सवाल आहे तुझ्या जीवनाचा.

जगात असतात अशी प्रलोभने
पण गुंतायचे नसते तन–मनाने
सुधारण्याची संधीही एकदाच मिळते
पण तेव्हा नसतात कसलीच बंधने.
प्रिय व्यक्तिही दुरावल्या जातात
अनोळखी, दुर्गुणी जीवनात येतात
अशीच एक व्यक्ती तुझ्यासाठी झुरत असेल
पण तुला याची कधीही कल्पनाच नसेल.

अशाच कातरवेळी या जगाची आठवण होते
केलेल्या चुकीची धुंदी उतरुन जाग येते
पण, तेव्हा वेळ निघून गेलेली असते
कारण परिमार्जनाची संधी एकदाच मिळत असते.
आणि म्हणूनच तुला जाग आणाविशी वाटते
तुझ्या निद्रिस्त मनाला साद घालाविशी वाटते
पण या अज्ञानी मनाला जाग येईल का ?
त्यासाठी मला वाट पहावी लागणार आहे
हे वळण पार होईपर्यंत
अगदी जगाच्या अंतापर्यंत .. ....

**विभावरी बांदेकर**

१२ वी वाणिज्य

# अरे माझ्या बा !

अरे माझ्या बा
तुला बा म्हणताना लाज वाटते
अन् देव्हाऱ्यातल्या देवाला
हात जोडताना शरम वाटते.

तुझ्या तोंडच्या वासावर
चंदनही मात करु शकत नाही
बिचारी माय माऊली
सुखाने घडीभर पडू शकत नाही.

तुझ्या नावाची लेबलं मारुन
डझनभर पोरं समाजात सोडलीस
तुकडाभर भाकरीसाठी
भिकेची पाळी आणलीस.

जन्म देवून
केवळ बा झालास
देव्हाऱ्यात बसून
देवा तू फक्त दगड झालास.

म्हणूनच माझ्या बा
तुला बा म्हणताना लाज वाटते
अन् देव्हाऱ्यातल्या देवाला
हात जोडताना शरम वाटते.

**पुष्पलता इळकर**
प्रथम वर्ष कला



# खंदक

ती रात्र संथ होती
गगनात तारे उदास होते
ओठातले शब्द माझ्या
ओठातच बंद होते.
नको कुणाची मला साथ
नको कुणाचा औदार्याचा हात
चालत राहीन मी एकटी
ओझं घेवून सुख-दुःखाचं
सरले ते मंतरलेले दिवस
वितळणाऱ्या बर्फाच्या वेगाने
आठवणींचे खंदक मी आज
बुझविले समोरच्या ........ भविष्याने.

**चेतना साटम**
तृतीय वर्ष वाणिज्य

# मी

आयुष्यांत मिळालेल्या दुःखातून
मी......सुखं वजा करत गेलो
शुन्य कधीच पार झाले नाही
अनांकित दुःखांच्या संख्या रेषेवर
मी लोंबकळत राहिलो
अपरिमेय संख्येसारखा.
माझं अस्तित्व कुणाला दिसलं नाही
मी होतो-आहे-राहीन
अनाठायी दुःखाच्या कोशांत
चिरंतन पहुडलेला.

**नामदेव पेडणेकर**
तृतीय वर्ष कला

## मी कधी

दाटून आला कंठ पुन्हा
मी तरी रडणार नाही
पाऊस झाला चिंब कितीही
मी कधी भिजणार नाही.

फुलले जरी वसंत दारी
मी तरी डुलणार नाही
आले कितीही गंध वारे
मी कधी झुलणार नाही.

बरसले आनंद तरीही
मी तिथे असणार नाही
सुख विखुरल्या वाटेवरी
मी कधी दिसणार नाही.

तू जरी आलीस पुन्हा
मी तरी हसणार नाही
चांदण्या वेचीत पुन्हा
मी कधी जाणार नाही.

**प्रकाश परब**

तृतीय वर्ष विज्ञान



## अबोली

हासून फूल पाही का हासलीस नाही
येऊनी मघाशी का बोललीस नाही.
मनात दर्पणाने मी पाहतो तुलाही
गाईन गीत मीही भाव तो तुझाही
उरले न काही माझे उरलो परी तुझाही.
सरुन काल जातो, मूक होतसे धरा ही
ती युगल जोडी हसते तूला मलाही
अबोल आज का तू अबोल आज मी ही.
एकांत हा दुजांचा ही गर्द आमराई
आसू पुसून आता, जरा वळून पाही
बकुळी सुगंधी आहे, तुटली प्रिती तरीही.

**मृणाल काळे**

द्वितीय वर्ष कला

## अस्तित्व

समुद्राच्या त्या शुभ्र लाटेतून येत असताना
दिसले मला अस्तित्व,
किनाऱ्यावर त्या वाळूत शोधत तुझी स्वप्ने.
स्वप्नांच्या पलीकडे होतो,......
वाळूत काढलेल्या त्या कल्पना
समुद्राच्या एकाच लाटेने गेल्या विस्कटून
आणि झाले कल्पनेचे रुपांतर वाळवंटात.
तुझ्या कल्पनेचे अस्तित्व; किनाऱ्यावर मी
तुझ्या नाकारलेल्या नजरा आजही
स्मरतात–आणि होतो मनाचा प्रलय
खवळलेल्या समुद्राला कसे थांबवावे ?
पण... . त्या ........
वाळवंटात आज शोधतो आहे अस्तित्व !

**विलास कदम**

द्वितीय वर्ष कला

# अजूनही येती

अजूनही येती अंबरी
ढग कोरडे,
खिन्न हताशलेले !
धुके पिंजून पाहतो
खुणा आर्द्र उदासलेल्या
डोळ्यात किनाऱ्याच्या पाहतो
संख्या लाटांची शिणलेल्या
तरीही उडती तुषार
मूक पाण्याचे,
धीट फेसाळलेले !
पोटात अंधाराच्या हसते
अंध भविष्य काळवंडलेले
ओठात गगनीच्या वसते
हास्य युगांचे निढावलेले
तरीही भारीती मनी
तेज क्षणांचे,
पंख विसावलेले !
